३१	१६ ब	म्हात्रे परशुराम पदमाकर			
३२	१५ अ	म्हात्रे मोहन गोपाळ			
३३	५ क	शाह राकेश रतिशचंद्र			
३४	१२ क	शेट्टी अरविंद आनंद			
३५	५ ड	सिंग श्रीप्रकाश जिलेदार (मुन्नासिंग)			
३६	१ क	तिवारी अशोक सूर्यदेव			
३७	८ क	अग्रवाल सुशील गोपीकिशन			
३८	७ ब	भूमाणी रक्षा सतीश (शाह)			

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
३९	२१ ब	शाह सीमाबेन कमलेश			
४०	८ ब	रकवी वैशाली गजेंद्र			
४१	२ क	कांगणे मीना यशवंत			
४२	२० अ	परमार हेतल रतिलाल			
४३	१७ ड	दळवी प्रशांत ज्ञानदेव			
~~४४~~	~~२३ ड~~	~~म्हात्रे विनोद काशिनाथ~~			
~~४५~~	~~२३ ब~~	~~म्हात्रे नयना गजानन~~			
४६	२३ अ	भोईर जयेश भानुदास			
~~४७~~	~~३ अ~~	~~शेट्टी गणेश गोपाळ~~			
४८	१३ ब	थेराडे संजय अनंत			
~~४९~~	~~१८ ड~~	~~राय विजयकुमार सिस्थन नारायण~~			
~~५०~~	~~६ ड~~	~~जैन राजेंद्र भवरलाल~~			
५१	२१ ड	विराणी अनिल रावजीभाई			
५२	२० ड	जैन दिनेश तेजराज			
५३	१८ अ	गजरे दौलत तुकाराम			
५४	१७ अ	मांजरेकर आनंद दत्ताराम			
५५	२० क	कासोदारिया अश्विन शामजीभाई			
५६	२१ क	दुबे मनोज रामनारायण			
५७	७ ड	व्यास रवि वासुदेव			
५८	८ ड	खंडेलवाल सुरेश जगदीश			
५९	१ ड	पांडेय पंकज सूर्यमणि			
~~६०~~	~~४ अ~~	~~भोईर गणेश गजानन~~			
६१	१४ ब	पारधी सुजाता यशवंत			

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. / /२०१८, प्रकरण क्र. , श्री. ----------यांच्या

ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ मतदान केलेल्या सदस्यांची यादी

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
१	१६ ड	भोईर राजू यशवंत			
२	१० ड	आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र			
३	११ ड	पाटील प्रविण मोरेश्वर			
४	३ ब	~~हवण निलम हरीश्चंद्र~~			
५	८ अ	परेरा केटलीन एन्थोनी			
६	३ ड	नलावडे दिनेश दगडु			
७	११ अ	शिर्के अनंत गेणू			
८	२२ ड	शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम			
९	१९ ड	मेहरा राजीव ओमप्रकाश			
१०	१९ क	सावंत अनिल दिवाकर			
११	२२ क	इनामदार जुबेर अब्दुल्ला			
१२	१० अ	पाटील जयंतीलाल गुरूनाथ			
१३	१० ब	घरत तारा विनायक			
१४	३ क	कदम अर्चना अरुण			
१५	१६ अ	~~पाटील अनिता जयवंत~~			
१६	१० क	पांडे स्नेहा शैलेश			
१७	२४ अ	गोविंद हेलन जॉर्जी			
१८	२० ब	~~भट डीसी शेखर~~			
१९	४ क	गुप्ता कुसुम संतोष			
२०	१६ क	भोईर भावना राजू			
२१	४ ड	~~पाटील धनेश परशुराम~~			
२२	१९ अ	शेख रुबीना फिरोझ			
२३	१९ ब	डिसा मर्लिन मर्विन			
२४	२२ अ	सपार उमा विश्वनाथ			
२५	९ अ	परदेशी गिता हरीश			
२६	९ क	~~सय्यद तुरजाहाँ नाझर हुसेन (मम्मी)~~			
२७	९ ब	पाटील नरेश तुकाराम			
२८	९ ड	शेख अमजद गफार			
२९	११ ब	~~पाटील वंदना विकास~~			
३०	११ क	पाटील संध्या प्रफुल्ल			
३१	१५ ड	~~भोईर कमलेश यशवंत~~			
३२	२२ ब	अहमद साराह अकरम			
३३	२४ ब	बगाजी शर्मिला विन्सन्ट			
३४	२४ क	बांड्या एलायस दुमिंग			

(१७)

सुचक श्री./श्रीम. मनोज दुबे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 43 विरोधात 24 तटस्थ 02 इतकी मते पडलेली आहेत. श्री./श्रीम. मनोज दुबे यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. 19/10/2018

प्रकरण क्र. 92 :- आस्थापनेवर ठोक मानधनावर कार्यरत संगणक चालक व लघुलेखक यांना समान काम समान वेतन लागू करणे.

ठराव क्र. ९७ :-

प्रशासनाने सदरचा विषय पुढील मा. महासभेत परिपूर्ण माहितीसह सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- (Rakesh Shah) श्री. राकेश शाह

अनुमोदन :- श्री. मनोजकुमार लाचमन दुबे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.19/10/2018

प्रकरण क्र.89 :- सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरिता डासनाशके, अळीनाशके खरेदी करणे कामाची निविदा मागविणेबाबत.

प्रस्तावना :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित 79 चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी / समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी / समुद्रात होत असतो. खाडी / समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठया प्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असतो. शहरातील मोकळया जागेत (ओपन प्लॉट) पावसाळया दरम्यान मोठया प्रमाणात पावसाचे पाणी जमा होऊन डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधणेकामी बांधकामे, भुयारी गटार योजना बांधकामे इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे / नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पूर्ण करण्यात येत असताल.

एकदंर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील वरील सर्व परिस्थितीमुळे मोठया प्रमाणावर डासांची उत्पत्ती होऊन डासांचा प्रादुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणेकामी शहरात डासनाशकाची व अळीनाशकांची मोठया प्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असून दरवर्षीप्रमाणे विविध कंपनीची डास नाशे व इतर डासनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे डासनाशके, अळीनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	डास नाशके, अळी नाशकांचे नाव	वार्षिक अंदाजित परिणाम
1	Alphacypermtrin 10% AC	2000 लिटर
2	Bacillus thurginsis var Israelensis 5% WP (TAC Approved)	1000 किलो
3	Bifenthrin 10% WP ISI mark	200 किलो
4	Cyfluthrin 5%EW	2000 लिटर
5	Deltamethrin 2.5% SC	2000 लिटर
6	Dichlorovos 76% EC	500 लिटर
7	Diflubenzeron 2% Tablet	200 किलो
8	Diflubenzeron 25%WP	200 किलो
9	Diflubenzuron 20% SC + Deltamethrin 2%	500 लिटर
10	Harbal Sanitizer	2000 लिटर
11	Jet Spray Machine	5
12	Lambda Cyhalothrin 9.7% CS	500 लिटर
13	M.L.O. Oil	10000 लिटर
14	Malathion 50% EC	500 लिटर
15	Novaluron 10% EC	200 लिटर
16	Polydimethylsioxane (PDMS) 70%	200 लिटर
17	Propoxure 2% Bait	100 किलो
18	Propoxure 20% E.C (ISI Mark)	500 लिटर

19	Pyrethrum 2% E.C (ISI Mark)	1000 लिटर
20	Pyrethrum 2% Ettract (ISI Mark)	1000 लिटर
21	Pyrosene Oil E ISI mark	5000 लिटर
22	Temephos 50% EC ISI mark	3000 लिटर
23	Spray Pump (Bronze - 12 Liter)	100 नग

ठराव क्र. ८० :-

उपरोक्त प्रस्तावित गोषवाऱ्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात फवारणी करणेकरीता वरीलप्रमाणे डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामी सन 2018-19 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात "एकात्मिक डास निर्मुलन योजना" या लेखाशिर्षाखाली रु. 3,00,00,000/- तरतूद शिल्लक आहे. उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेस अंदाजित रु. 2,00,00,000/- खर्च अपेक्षित असल्याने सदरचा प्रस्ताव इ-टेंडरव्दारे निविदा मागवून खरेदी करणेसाठी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर श्रीम. रक्षा भूपतानी

श्रीम. दिपाली भोईर ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा सभा दि.19/10/2018

प्रकरण क्र. 88 :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत "ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र" या संबंधि धोरण निश्चित करणेबाबत.

प्रस्तावना :-

1) विरंगुळा केंद्र :-

विरंगुळा केंद्र म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या व 60 वर्षावरील वयोगटातील नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक हित जपले जावे यासाठी व दिवसाच्या ठराविक कालावधीसाठी वापरात आणण्यासाठी महानगरपालिका किंवा स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने निर्माण करण्यात आलेले केंद्र.

2) विरंगुळा केंद्राचे बांधकाम :-

- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार विशेषत: "बगीचा" किंवा "करमणूकीची मैदाने" "आर.जी" यासाठी आरक्षित असलेल्या व महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर एकुण भुखंड क्षेत्राच्या तुलनेत 10% पेक्षा अधिक असणार नाही तथापि किमान 500 चौ.फुट बांधकाम उपलब्ध् होऊ शकेल अशा ठिकाणी विरंगुळा केंद्राचे बांधकाम करता येईल.
- सर्वसाधारणपणे दोन विरंगुळा केंद्रात किमान 2 किमी अंतर असावे.

3) विरंगुळा केंद्रात उपलब्ध करण्यात येणाऱ्या सोयी :-

- विरंगुळा केंद्रामध्ये खालील गोष्टी उपलब्ध करुन देण्यात येईल.

अ.क्र.	तपशिल	साहित्य (नग)
1	बुध्दीबळ	02
2	कॅरम	02
3	दुरदर्शन संच	01
4	सेमी एक्झिक्युटीव्ह खुर्ची	01
5	वृत्तपत्रे	03
6	कपाट (मोठे)	01
7	टेबल	01
8	प्लास्टिक खुर्ची	50
9	वजन मोजणी यंत्र	01
10	वाफ घेण्याचे इलेक्ट्रीक भांडे	01
11	शेकण्याची इलेक्ट्रीक बँग	01
12	सिलिंग फॅन	04
13	प्रथमोपचार पेटी	01
14	कचरा कुंडी	02
15	कॉम्प्युटर	01

16	प्रिंटर व स्कॅनर	01
17	कॉम्पयुटर टेबल	01
18	स्टॅण्ड फॅन	04
19	लाईटचे फोकस	06
20	दिवाळी अंक	कोणतेही 04
21	लायब्ररीसाठी पुस्तके	उपलब्धतेनुसार
22	वॉटर फिल्टर्	01
23	भजनासाठी वादवृंदासाठी हार्मोनियम, पखवाज, तबला-डगा	प्रत्येकी एक
24	शिसाचे टाळ	10 नग
25	साऊंड सिस्टिम Mixer 12 Channel, Ahuja 500W, Amplifier	प्रत्येकी 1 नग
26	Ahuja speaker	04 नग
27	योगा मॅटस	100 नग

- उदयानातील पाणी व विदयुत जोडणीमधुन विरंगुळा केंद्राकरीता पाणी जोडणी व विदयुत जोडणी देता येईल.
- सदर विरंगुळा केंद्र सुरु ठेवण्याची वेळ सकाळी 07.00ते 10.00 व संध्याकाळी 05.00 ते रात्री 09.00 वाजेपर्यंत असेल अपावादात्मक् परिस्थितीत वेळेत फेरबदल करण्याचा अधिकार संबंधित संस्थेस राहील.

4) विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी वितरीत करण्याची कार्यपध्दती :-

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) व (इ) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने विकसित केलेली विरंगुळा केंद्रे नोंदणीकृत ज्येष्ठ नागरीकांच्या स्थानिक संस्थाना जास्तीत जास्त् तीन वर्षाच्या कालावधीकरीता देता येतील.
- सदर विरंगुळा केंद्रे व्यवस्थापनासाठी देताना विरंगुळा क्षेत्राच्या 500 मीटर परीघात वास्तव्यात असणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.
- सदरची कार्यवाही महानगरपालिकेच्या धोरणानुसार अर्ज मागवून करण्यात येईल.
- सदर विरंगुळा केंद्र वितरीत करण्याबाबत आयुक्तांचा अधिकार अंतिम असेल.

5) विरंगुळा केंद्राच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक अटी व शर्ती :-

सदर विरंगुळा केंद्र व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती प्रस्तावित करण्यात येत असुन त्याबाबत संबंधित संस्थाना रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक असेल.

- विरंगुळा केंद्राचा व्यवस्थापन कालावधी सदर केंद्र वितरीत केल्याच्या दिनांकापासून तीन वर्ष असेल.
- विरंगुळा केंद्र व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस सदर केंद्र इतर व्यक्ती/संस्था/आस्थापना इत्यांदीनी हस्तांतरीत करता येणार नाही.
- विरंगुळा केंद्र हे केवळ ज्येष्ठ् नागरीकांना विरंगुळा मिळावा व त्यातुन त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य् विषयक हित साधले जातील यासाठीच वापरणे

अपेक्षित आहे. याव्यतीरीक्त इतर प्रयोजनासाठी त्याचा वापर करावयाचा झाल्यास त्याबाबत आयुक्त यांची लेखी पुर्वपरवानगी घेणे आवश्यक् राहील.

- सदर विरंगुळा केंद्रात परिसरातील ज्येष्ठ नागरीकांना कोणताही भेदभाव न करता प्राधान्याने प्रवेश असेल व सदर प्रवेश नि:शुल्क् असेल.
- विरंगुळा केंद्र इमारतीच्या संरचनेत (Structuer) महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही. जर संरचनेत काही बदल करण्यात आल्यास सदर विरंगुळा केंद्राच्या व्यवस्थापन करारपत्र रद्द करुन ते महानगरपालिका ताब्यात घेईल व इमारतीचे/केंद्राचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीत व्यवस्थापन संस्थेकडुन करुन घेण्यात येईल.
- विरंगुळा केंद्राची देखभाल, देखरेख व संरक्षण खर्च व्यवस्थापन संस्थेने करणे आवश्यक् असेल.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे विरंगुळा केंद्रात पुरविण्यात आलेले साहित्य् व फर्निचर यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी व्यवस्थापन संस्थेची राहील.
- विरंगुळा केद्राकरीता संस्थेस महानगरपालिकेकडुन कोणतेही अनुदान, कर्मचारी इत्यांदी उपलब्ध् करुन दिले जाणार नाहीत. सदर बाबी संस्थेने स्वखर्चाने उपलब्ध् करावयाच्या आहेत.
- व्यवस्थापन संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेमध्ये सामावुन घेतले जाणार नाही व तसा कोणताही हक्क् सदर कर्मचाऱ्यांना असणार नाही. सदर कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. त्यातुन कोणतेही कायदेशीर, आर्थिक इत्यादी वाद निर्माण झाल्यास त्या संस्था स्वखर्चाने स्वत:च्या जबाबदारीवर दूर करेल. महानगरपालिकेला अशा वादाची झळ लागू देणार नाही.
    - विरंगुळा केंद्र इमारतीची महानगरपालिकेस गरज भासल्यास संबंधित संस्थेस सदरचे केंद्राची इमारत महानगरपालिकेस तात्काळ उपलब्ध करुन दयावी लागेल.
    - दिलेल्या इमारतीच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवावा लागेल.
    - महानगरपालिकेसोबत संबंधित संस्थेने केलेल्या या करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग केल्यास महानगरपालिका करारनाम्याची मुदत पुर्ण होण्यापुर्वी अथवा महानगरपालिकेस वाटेल त्यावेळी कोणतेही कारण न देता केव्हाही विरंगुळा केंद्राचा ताबा काढुन घेता येईल.
    - कोणत्याही कारणास्तव सदर केंद्राचे व्यवस्थापक सोडावयाचे झाल्यास त्याबाबत 30 दिवस अगोदर महानगरपालिकेस लेखी कळवुन जागा सुस्थितीत ताब्यात देणे आवश्यक् असेल.
    - विरंगुळा केंद्राची संपुर्ण मालकी महानगरपालिकेची राहील या मालमत्तेवर महापालिका व्यतीरिक्त इतर कोणाचाही अधिकार राहणार नाही.
    - सदर विरंगुळा केंद्रात व्यवस्थापन संस्थाव्दोर कोणत्याही कार्यक्रमाकरीता शुल्क् प्रवेश फी इत्यादी जमा करीत असल्यास त्या कार्यक्रमासाठी महानगरपालिकेमार्फत फी/शुल्क्/भाडे आकरण्यात येईल व त्यासाठी संबंधित उप-आयुक्त (मुख्यालय) यांची लेखी परवानगी आवश्यक असेल.
    - सदर विरंगुळा केंद्रात मनोरंजनासाठी तसेच आरोग्य् विषयक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

- विरंगुळा केंद्राच्या बाबतीत कोणताही वाद झाल्यास आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

ज्येष्ठ नागरीकांसाठी काही नविन योजना राबवावयाच्या आहेत. सदर योजना खालीलप्रमाणे :-

1. ज्येष्ठ नागरीकांसाठी साहित्य् पुरवठा करणे.
   1) काठी, 2) वॉकर, 3) कमरेचा पट्टा, 4) मानेचा पट्टा,
2. ज्येष्ठ नागरीकांसाठी मनोरंजन कार्यक्रम आयोजित करणे.
3. ज्येष्ठ नागरीक दिन साजरा करणे.
4. ज्येष्ठ नागरीकांसाठी बैठे खेळाच्या स्पर्धांचे आयोजन करणे उदा. कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला, हस्तकला व इतर वेळोवळी ठरविण्यांत आलेल्या स्पर्धा.
5. ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्राकरीता किरकोळ खर्चासाठी दरमहा रु.2000/- आर्थिक मदत करणे.
6. ज्येष्ठ् नागरीक महिलांसाठी हळदीकुंकू व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.
7. ज्येष्ठ नागरीकांकरीता सहलीचे आयोजन करणे.

ठराव क्र. ८९ :-

प्रस्तावित गोषवाऱ्यातील नविन योजना क्र.5 मध्ये ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्राकरीता किरकोळ खर्चासाठी दरमहा रु.10,000/- आर्थिक मदत करण्यात यावी तसेच ज्येष्ठ नागरीक संघटनेच्या सर्व सदस्यांची नोंदणी क्रमांकासह त्यांचे निवासी पत्त्यांची माहिती महापालिकेने मागवून घ्यावी. यासह वरील प्रस्तावानुसार ठराव मंजुर करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- Ganesh Bhoir **अनुमोदक :-** Rakesh Shah

श्री. गणेश भोईर श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

D mehta

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.19/10/2018

प्रकरण क्र. (87) :- मोर्वा येथे जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देणे.

ठराव क्र. (८८)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोर्वा येथे नविन शाळा इमारत बांधलेली आहे. सदर शाळेत जागा रिकामी असुन सदर ठिकाणी जेष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्रासाठी जागा मागणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मोर्वा शाळा इमारतीत जेष्ठ नागरीकांना विरंगुळा केंद्रासाठी जागा व त्यासाठी लागणारे वस्तु व साहित्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर विरंगुळा केंद्राची जागा संचलन व देखभालीसाठी मोर्वा गाव वरिष्ठ नागरीक संघटना यांनी मागणी केली असून त्यानुसार सदर जागेचा ताबा संचलन व देखभालीसाठी मोर्वा गाव वरिष्ठ नागरीक संघटना यांना देण्यात यावा.

तसेच पुढील सर्व प्रशासकीय कामकाज व आवश्यक निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- जयेश भोईर

अनुमोदक :- नयना गजानन शेट्टे

श्री. जयेश भोईर

सौ. नयना शेट्टे

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.19/10/2018

प्रकरण क्रमांक (93) :- मतीमंद मुलांना शिकविणा-या व बालवाडी शिक्षकांना शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे.

ठराव क्रमांक (९२) :-

प्रशासनाने सदरचा विषय पुढील मा. महासभेत परिपूर्ण माहितीसह सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- **अनुमोदन** :- A S. Kasodariya

श्री. प्रशांत दळवी श्री. सुखिन कासोदरिया

ठराव सर्वानुमते मंजूर

Jmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/२०१८

प्रकरण क्र. ८६ :- **महापालिका क्षेत्रात साजरे करण्यात येणारे सण/उत्सवाकरिता बांधण्यात येणाऱ्या मंडपाजवळ जाहिरात फलक, बॅनर्स यांना परवानगी देणेबाबत.**

ठराव क्र. ८७ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज, कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त परवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा.आयुक्त सो. यांचेकडे दि.०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे. सदर टिपणीस मान्यता देऊन मा.आयुक्त सो. यांनी मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षतेखाली मा.पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते. याअनुषागाने आज दि. ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपाला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर/कटआउट साठी मा.स्थायी समिती सभा दि.२९/०२/२००८ ठराव क्र.४३ अन्वये व मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यांत यावी असे मा.महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची 'ड' प्रकरण क्र.२ मधील नियम 'र' नुसार पारीत केलेल्या ठरावात फेरबदल करता येण्याची तरतुद आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा.महासभा दि०५/०९/२०१८ ठराव क्र. ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यासाठी शिफारस आहे.

ठराव क्र. :-

शहरात महापालिकेचे जाहिराती बाबतचे दर यापूर्वीच निश्चित केलेले आहेत. त्या नियमानूसार यापूढे खालीलप्रमाणे जाहिराती लावणेकरीता परवानगी देण्यात यावी.

१) मिरा भाईंदर शहरात होणाऱ्या सार्वजनिक जागेवर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व क्रिडा विषयक कार्यक्रम महापालिकेने तात्पुरत्या स्वरुपात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

२) सदर कार्यक्रमाच्या निश्चित केलेल्या एक दिवस अगोदर, कार्यक्रमादिवशी व कार्यक्रमाच्या एक दिवसानंतर जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

३) कार्यक्रमाच्या प्रवेशद्वाराजवळ एकच बॅनर किंवा एकच कमान लावण्यास परवानगी देण्यात यावी.

४) सदर जाहिरातीवर महापालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

५) तसेच आरक्षित जागेवर कार्यक्रमास परवानगी दिल्यास त्यांचेकडून फक्त दर्शनी भागात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यांत यावी व त्यांचेकडून निश्चित केलेल्या दराप्रमाणे फी भरण्यात यावी. तसेच कार्यक्रमाच्या आतील भागात जाहिरात केल्यास त्याच्यावर जाहिरात कर लावण्यात येवू नये.

६) एखादा सार्वजनिक हिताचा खाजगी कार्यक्रम हाती घेतल्यास त्याला वरील अटीशर्तीवर परवानगी देण्यात यावी. तसेच सदर कार्यक्रमाचा दिशादर्शक व अतिमहत्वाचे व्यक्ती येणार असल्यास विशेष बाब म्हणून मा. आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदर कार्यक्रमाला परवानगी देण्यात यावी.

७) कार्यक्रमाचे विनापरवानगी जाहिरात केल्यास प्रती बॅनर वर रु.१०,०००/- दंडाची आकारणी करण्यात यावी तसेच सदर व्यक्तीने, संस्थेने दुसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्यावर देखील दंडाची कारवाई त्याच दराने करण्यात यावी व तिसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्याचे विरुध्द दंड व कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.

८) शहरात सार्वजनिक जागा, भिंती यावर स्टिकर लावणे, रंगकाम करणे यावर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच सार्वजनिक भिंती रंगविणे, स्टीकर लावणे याकरीता परवानगी देण्यात येवू नये.

९) खाजगी वाहने, रीक्षा या माध्यमातून जाहिरात होत असतील तर त्यावर मंजुर दराप्रमाणे जाहिरात कर आकारणी करून फी वसुल करणे बंधनकारक राहिल.

१०) शाळा, कॉलेज, कंपनीची खाजगी वाहने यांना जाहिराती मधून वगळण्यात येत आहे.

११) खाजगी जागेत होर्डींग्ज, बॅनर, फलक लावले असतील त्यांना हे नियम लागू होणार नाहीत. मात्र रस्त्याच्या बाजूला दर्शनी भागात जाहिरात केल्यास त्याला जाहिरात फी लागू होईल.

१२) खाजगी संकुलने, खाजगी जागा यामधील जाहिरातींना कोणतीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही मात्र रोडच्या दर्शनी बाजूला जाहिरात केल्यास त्यांना जाहिरात फी लागू होईल.

१३) जी खाजगी आरक्षणे, आरक्षित उद्याने महापालिकेच्या ताब्यात असतील व त्यांच्या सोयी सुविधा महापालिका पुरवित असेल व ती खाजगी संकुले असतील तरी त्यांना जाहिरात दर लागु होणार.

१४) कार्यक्रमाच्या मुख्य प्रवेशद्वारावर रस्ता सोडून कार्यक्रमाच्या प्रवेशद्वारावर नियमानूसार कमानीची परवानगी देण्यात यावी.

१५) वरील जाहिरातीचे धोरण प्रामाणिक व कडक अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेस मनुष्य बळ कमी पडणार आहे. त्यासाठी मा. आयुक्त यांनी साधन सामुग्री मनुष्यबळासह निविदा काढावी तसेच मा. आयुक्त यांनी दंडात्मक रक्कम वसुल झालेल्या रक्कमेतून ठेकेदारास ५० टक्के रक्कम प्रोत्साहनार्थ (इंन्सेटीव्ह) देण्यात येईल अशा प्रकारे ३ वर्षाकरीता निविदा काढण्यात यावी.

१६) नागरीकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी ठेकेदारास प्राप्त झाल्यावर त्यांनी त्यांचेवर कारवाई न केल्यास त्यांचेवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

१७) वरील सर्व अटीशर्तीचे कठोरपणे कारवाई करावी.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी **अनुमोदक :- श्री. मनोज रामनारायण दुबे**

अ.क्र.	ठरावाच्या बाजूने	अ.क्र.	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१	मेहता डिंपल विनोद	१	भोईर राजू यशवंत	१.जैन गीता भरत
२	वैती चंद्रकांत सिताराम	२	आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र	
३	पाटील रोहिदास शंकर	३	पाटील प्रविण मोरेश्वर	
४	पाटील ध्रुवकिशोर मन्साराम	४	परेरा कॅटलीन एन्थोनी	
५	पाटील प्रभात प्रकाश	५	नलावडे दिनेश दगडु	
६	सिंह मदन उदितनारायण	६	शिर्के अनंत गेणू	
७	भानुशाली वर्षा गिरधर	७	शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम	
८	यादव मिरादेवी रामलाल	८	मेहरा राजीव ओमप्रकाश	
९	हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर	९	सावंत अनिल दिवाकर	
१०	गोहिल शानू जोरावर सिंह	१०	इनामदार जुबेर अब्दुल्ला	
११	डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश	११	पाटील जयंतीलाल गुरूनाथ	
१२	सोंस निला बर्नाड	१२	घरत तारा विनायक	
१३	रावल मेघना दिपक	१३	कदम अर्चना अरुण	
१४	मोकाशी दिपाली आनंदराव	१४	पांडे स्नेहा शैलेश	
१५	जैन सुनिता रमेश	१५	गोविंद हेलन जॉर्जी	
१६	अरोरा दीपिका पंकज	१६	गुप्ता कुसुम संतोष	
१७	नाईक विविता विवेक	१७	भोईर भावना राजू	
१८	भावसार वंदना संजय	१८	शेख रुबीना फिरोझ	
१९	बेलानी हेमा राजेश	१९	डिसा मर्लिन मर्विन	
२०	भोईर विणा सुर्यकांत	२०	परदेशी गिता हरीश	
२१	सोनार सुरेखा प्रकाश	२१	पाटील नरेश तुकाराम	
२२	शिंदे रुपाली वसंत (मोदी)	२२	पाटील वंदना विकास	
२३	शाह राकेश रतिशचंद्र	२३	पाटील संध्या प्रफुल्ल	
२४	शेट्टी अरविंद आनंद	२४	अहमद साराह अकरम	

२५	सिंग श्रीप्रकाश जिलेदार	२५	बगाजी शर्मिला विन्सन्ट	
२६	तिवारी अशोक सूर्यदेव	२६	बांड्या एलायस दुमिंग	
२७	भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)			
२८	शाह सीमाबेन कमलेश			
२९	रकवी वैशाली गजेंद्र			
३०	कांगणे मीना यशवंत			
३१	परमार हेतल रतिलाल			
३२	दळवी प्रशांत ज्ञानदेव			
३३	म्हात्रे नयना गजानन			
३४	भोईर जयेश भानुदास			
३५	थेराडे संजय अनंत			
३६	विराणी अनिल रावजीभाई			
३७	जैन दिनेश तेजराज			
३८	गजरे दौलत तुकाराम			
३९	मांजरेकर आनंद दत्ताराम			
४०	कासोदारिया अश्विन शामजीभाई			
४१	दुबे मनोज रामनारायण			
४२	व्यास रवि वासुदेव			
४३	खंडेलवाल सुरेश जगदीश			
४४	पांडेय पंकज सूर्यमणि			
४५	भोईर गणेश गजानन			
४६	पारधी सुजाता यशवंत			

ठराव बहुमताने मंजूर

Jmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका
मा.महासभा दि.१९/१०/२०१८

प्रकरण क्र. ८६ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साजरे करण्यांत येणारे सार्वजनिक उत्सव, सणाकरीता बांधण्यांत येणाऱ्या मंडपाशेजारी जाहिरात फलक, बॅनर्स, लावण्यास परवानगी देणे.

प्रस्तावना :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज, कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त परवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा.आयुक्त सो. यांचेकडे दि.०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे. सदर टिपणीस मान्यता देऊन मा.आयुक्त सो. यांनी मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षतेखाली मा.पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते. याअनुषागाने आज दि. ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपाला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर/कटआउट साठी मा.स्थायी समिती सभा दि.२९/०२/२००८ ठराव क्र.४३ अन्वये व मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यांत यावी असे मा.महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची 'ड' प्रकरण क्र.२ मधील नियम 'र' नुसार पारीत केलेल्या ठरावात फेरबदल करता येण्याची तरतुद आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा.महासभा दि०५/०९/२०१८ ठराव क्र. ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यासाठी शिफारस आहे.

ठराव क्र. :-

शहरात महापालिकेचे जाहिराती बाबतचे दर यापूर्वीच निश्चित केलेले आहेत. त्या नियमानूसार यापूढे खालीलप्रमाणे जाहिराती लावणेकरीता परवानगी देण्यात यावी.

१) मिरा भाईंदर शहरात होणाऱ्या सार्वजनिक जागेवर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व क्रिडा विषयक कार्यक्रम महापालिकेने तात्पुरत्या स्वरुपात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

२) सदर कार्यक्रमाच्या निश्चित केलेल्या एक दिवस अगोदर, कार्यक्रमादिवशी व कार्यक्रमाच्या एक दिवसानंतर जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

३) कार्यक्रमाच्या प्रवेशद्वाराजवळ एकच बॅनर किंवा एकच कमान लावण्यास परवानगी देण्यात यावी.

४) सदर जाहिरातीवर महापालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

५) तसेच आरक्षित जागेवर कार्यक्रमास परवानगी दिल्यास त्यांचेकडून फक्त दर्शनी भागात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी व त्यांचेकडून निश्चित केलेल्या दराप्रमाणे फी भरण्यात यावी. तसेच कार्यक्रमाच्या आतील भागात जाहिरात केल्यास त्याच्यावर जाहिरात कर लावण्यात येवू नये.

६) एखादा सार्वजनिक हिताचा खाजगी कार्यक्रम हाती घेतल्यास त्याला वरील अटीशर्तीवर परवानगी देण्यात यावी. तसेच सदर कार्यक्रमाचा दिशादर्शक व अतिमहत्त्वाचे व्यक्ती येणार असल्यास विशेष बाब म्हणून मा. आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदर कार्यक्रमाला परवानगी देण्यात यावी.

७) कार्यक्रमाचे विनापरवानगी जाहिरात केल्यास प्रती बॅनर वर रु.१०,०००/- दंडाची आकारणी करण्यात यावी तसेच सदर व्यक्तीने, संस्थेने दुसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्यावर देखील दंडाची कारवाई त्याच दराने करण्यात यावी व तिसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्याचे विरुध्द दंड व कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.

८) शहरात सार्वजनिक जागा, भिंती यावर स्टिकर लावणे, रंगकाम करणे यावर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच सार्वजनिक भिंती रंगविणे, स्टीकर लावणे याकरीता परवानगी देण्यात येवू नये.

९) खाजगी वाहने, रीक्षा या माध्यमातून जाहिरात होत असतील तर त्यावर मंजुर दराप्रमाणे जाहिरात कर आकारणी करून फी वसुल करणे बंधनकारक राहिल.

१०) शाळा, कॉलेज, कंपनीची खाजगी वाहने यांना जाहिराती मधून वगळण्यात येत आहे.

११) खाजगी जागेत होर्डींग्ज, बॅनर, फलक लावले असतील त्यांना हे नियम लागू होणार नाहीत. मात्र रस्त्याच्या बाजूला दर्शनी भागात जाहिरात केल्यास त्याला जाहिरात फी लागू होईल.

१२) खाजगी संकुलने, खाजगी जागा यामधील जाहिरातींना कोणतीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही मात्र रोडच्या दर्शनी बाजूला जाहिरात केल्यास त्यांना जाहिरात फी लागू होईल.

१३) जी खाजगी आरक्षणे, आरक्षित उद्याने महापालिकेच्या ताब्यात असतील व त्यांच्या सोयी सुविधा महापालिका पुरवित असेल व ती खाजगी संकुले असतील तरी त्यांना जाहिरात दर लागु होणार.

१४) कार्यक्रमाच्या मुख्य प्रवेशद्वारावर रस्ता सोडून कार्यक्रमाच्या प्रवेशद्वारावर नियमानूसार कमानीची परवानगी देण्यात यावी.

१५) वरील जाहिरातीचे धोरण प्रामाणिक व कडक अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेस मनुष्य बळ कमी पडणार आहे. त्यासाठी मा. आयुक्त यांनी साधन सामुग्री मनुष्यबळासह निविदा काढावी तसेच मा. आयुक्त यांनी दंडात्मक रक्कम वसुल झालेल्या रक्कमेतून ठेकेदारास ५० टक्के रक्कम प्रोत्साहनार्थ (इंन्सेटीव्ह) देण्यात येईल अशा प्रकारे ३ वर्षाकरीता निविदा काढण्यात यावी.

१६) नागरीकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी ठेकेदारास प्राप्त झाल्यावर त्यांनी त्यांचेवर कारवाई न केल्यास त्यांचेवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

१७) वरील सर्व अटीशर्तीचे कठोरपणे कारवाई करावी.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी

अनुमोदक :- श्री. मनोज रामनारायण गुप्ता

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका
मा.महासभा दि. १९/१०/२०१८

//गोषवारा//

प्रकरण क्र. ८६ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साजरे करण्यांत येणारे सार्वजनिक उत्सव, सणाकरीता बांधण्यांत येणाऱ्या मंडपाशेजारी जाहिरात फलक, बॅनर्स, लावण्यास परवानगी देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज, कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त परवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा.आयुक्त सो. यांचेकडे दि.०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे. सदर टिपणीस मान्यता देऊन मा.आयुक्त सो. यांनी मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षतेखाली मा.पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते. याअनुषंगाने आज दि. ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपाला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर/कटआउट साठी मा.स्थायी समिती सभा दि.२९/०२/२००८ ठराव क्र.४३ अन्वये व मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यात यावी असे मा.महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल ~~करणे आवश्यक आहे~~. करण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे ~~महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची 'ह' प्रकरण क्र.२ मधील नियम 'ए' नुसार फायीत केलेल्या ठरावात फेरबदल~~ करता येण्याची तरतुद आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा.महासभा दि०५/०९/२०१८ ठराव क्र. ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यासाठी ~~विनंती~~ ठराव करणेत आहे.

सिध्द उच्च न्यायालय च्या निर्णयाचे सुप्रीमकोर्टकोर च्या अपिलबाबतची करणात घ्यावे

(आनंद लिमये)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

अनुमोदन

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. / /२०१८, प्रकरण क्र. (६), श्री. ----------यांच्या ठरावाच्या

बाजुने / विरोधात / तटस्थ मतदान केलेल्या सदस्यांची यादी

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
१	१२ ब	मेहता डिंपल विनोद			
२	१३ ड	वैती चंद्रकांत सिताराम			
३	२ अ	पाटील रोहिदास शंकर			
४	६ अ	पाटील ध्रुवकिशोर मन्साराम			
~~५~~	~~१२ ड~~	~~मेहतमेत हसमुख मोहनलाल~~			
६	६ ब	जैन गीता भरत			
७	४ ब	पाटील प्रभात प्रकाश			
~~८~~	~~७ अ~~	~~रॉड्रीकस मोरसे जोसेफ~~			
९	२ ड	सिंह मदन उदितनारायण			
१०	२३ क	भानुशाली वर्षा गिरधर			
११	१४ ड	यादव मिरादेवी रामलाल			
~~१२~~	~~१ ब~~	~~शाह रिटा सुभाष~~			
१३	१४ अ	हसनाळे ज्योत्सना जालींदर			
१४	२ ब	गोहिल शानू जोरावर सिंह			
१५	१२ अ	डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश			
~~१६~~	~~१ अ~~	~~भोईर सुनिता शशिकांत~~			
~~१७~~	~~५ अ~~	~~पाटील वंदना मंगेश~~			
१८	१८ क	सोंस नीला बर्नाड			
१९	५ ब	रावल मेघना दिपक			
२०	७ क	मोकाशी दिपाली आनंदराव			
२१	६ क	जैन सुनिता रमेश			
२२	१७ ब	अरोरा दीपिका पंकज			
२३	१८ ब	नाईक विविता विवेक			
२४	२१ अ	भावसार वंदना संजय			
२५	१७ क	बेलानी हेमा राजेश			
२६	१५ क	भोईर विणा सुर्यकांत			
२७	१५ ब	सोनार सुरेखा प्रकाश			
~~२८~~	~~१३ क~~	~~मुखर्जी अनिता बबलू~~			
२९	१३ अ	शिंदे रुपाली वसंत (मोदी)			
~~३०~~	~~१४ क~~	~~म्हात्रे सचिन केसरीनाथ~~			
~~३१~~	~~१६ ब~~	~~म्हात्रे परशुराम पद्माकर~~			
~~३२~~	~~१५ अ~~	~~म्हात्रे मोहन गोपाळ~~			
३३	५ क	शाह राकेश रतिशचंद्र			
३४	१२ क	शेट्टी अरविंद आनंद			
३५	५ ड	सिंग श्रीप्रकाश जिलेदार (मुन्नासिंग)			
३६	१ क	तिवारी अशोक सूर्यदेव			
~~३७~~	~~८ क~~	~~अग्रवाल सुशील गोपीकिशन~~			
३८	७ ब	भूमाणी रक्षा सतीश (शाह)			

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
३९	२१ ब	शाह सीमाबेन कमलेश			
४०	८ ब	रकवी वैशाली गजेंद्र			
४१	२ क	कांगणे मीना यशवंत			
४२	२० अ	परमार हेतल रतिलाल			
४३	१७ ड	दळवी प्रशांत ज्ञानदेव			
४४	२३ ड	म्हात्रे विनोद काशिनाथ			
४५	२३ ब	म्हात्रे नयना गजानन			
४६	२३ अ	भोईर जयेश भानुदास			
४७	३ अ	शेट्टी गणेश गोपाळ			
४८	१३ ब	थेराडे संजय अनंत			
४९	१८ ड	राय विजयकुमार सिस्थन नारायण			
५०	६ ड	जैन राजेंद्र भवरलाल			
५१	२१ ड	विराणी अनिल रावजीभाई			
५२	२० ड	जैन दिनेश तेजराज			
५३	१८ अ	गजरे दौलत तुकाराम			
५४	१७ अ	मांजरेकर आनंद दत्ताराम			
५५	२० क	कासोदारिया अश्विन शामजीभाई			
५६	२१ क	दुबे मनोज रामनारायण			
५७	७ ड	व्यास रवि वासुदेव			
५८	८ ड	खंडेलवाल सुरेश जगदीश			
५९	१ ड	पांडेय पंकज सूर्यमणि			
६०	४ अ	भोईर गणेश गजानन			
६१	१४ ब	पारधी सुजाता यशवंत			

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. / /२०१८, प्रकरण क्र. , श्री. ----------यांच्या

ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ मतदान केलेल्या सदस्यांची यादी

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
१	१६ ड	भोईर राजू यशवंत			
२	१० ड	आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र			
३	११ ड	पाटील प्रविण मोरेश्वर			
४	३ ब	डवण जिलम हरीश्चंद्र			
५	८ अ	परेरा कॅटलीन एन्थोनी			
६	३ ड	नलावडे दिनेश दगडु			
७	११ अ	शिर्के अनंत गेणू			
८	२२ ड	शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम			
९	१९ ड	मेहरा राजीव ओमप्रकाश			
१०	१९ क	सावंत अनिल दिवाकर			
११	२२ क	इनामदार जुबेर अब्दुल्ला			
१२	१० अ	पाटील जयंतीलाल गुरुनाथ			
१३	१० ब	घरत तारा विनायक			
१४	३ क	कदम अर्चना अरुण			
१५	१६ अ	पाटील अनिता जयवंत			
१६	१० क	पांडे स्नेहा शैलेश			
१७	२४ अ	गोविंद हेलन जॉर्जी			
१८	२० ब	भट दीप्ती शेखर			
१९	४ क	गुप्ता कुसुम संतोष			
२०	१६ क	भोईर भावना राजू			
२१	४ ड	पाटील धनेश परशुराम			
२२	१९ अ	शेख रुबीना फिरोझ			
२३	१९ ब	डिसा मर्लिन मर्विन			
२४	२२ अ	सपार उमा विश्वनाथ			
२५	९ अ	परदेशी गिता हरीश			
२६	९ क	सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन (मम्मी)			
२७	९ ब	पाटील नरेश तुकाराम			
२८	९ ड	शेख अमजद गफार			
२९	११ ब	पाटील वंदना विकास			
३०	११ क	पाटील संध्या प्रफुल्ल			
३१	१५ ड	भोईर कमलेश यशवंत			
३२	२२ ब	अहमद साराह अकरम			
३३	२४ ब	बगाजी शर्मिला विन्सन्ट			
३४	२४ क	बांड्या एलायस दुमिंग			

26

सुचक श्री./श्रीम. प्रशांत ढवळे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६ विरोधात २६ तटस्थ ०१ इतकी मते पडलेली आहेत. श्री./श्रीम. प्रशांत ढवळे यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.19/10/2018

प्रकरण क्र. (84) - मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) या शासकीय जागा Bus Bay साठी 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्याच्या आखणीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार विकास योजनेत फेरबदल करणेबाबत मा. महासभेत गोषवारा सादर करणेबाबत.

ठराव क्र. (८५) -

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) सह इतर सार्वजनिक उपक्रमासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालयात दि.01/10/2018 रोजी बैठक पार पडलेली आहे. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) ही दि.14/05/1997 रोजी मंजूर होवून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले असून वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर होवून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास योजनेनुसार मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन) ही जागा भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा रहिवास विभागात सामाविष्ट आहे. तसेच स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) ही जागा मंजूर विकास योजनेनुसार भागशः 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरीत जागा वाणिज्य विभागात (C-2) मध्ये सामाविष्ट आहे.

सदर जागा 45.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यालगत असल्याने तसेच सदर जागेची मालकी सरकारी असल्याने या जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करून घेऊन 45.0 मी. रूंद रस्त्यालगत सार्वजनिक वाहतुकीच्या बस सेवेस चालना मिळणेस व वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून Bus Bay साठी उपयोगात येऊ शकणार असल्याची मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे समक्ष मा.आ.श्री. नरेंद्र मेहता, मा.आयुक्त सो., यांचे उपस्थितीत चर्चा होवून याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचा अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार विकास योजनेमध्ये 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्यासाठी फेरबदल करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीने शासनास सादर करणेबाबत चर्चा झालेली आहे.

सबब 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्या लगतच्या स.क्र. मौजे भाईंदर, स.क्र. 771 (जुना), 81 (नविन), स.क्र. 772 (जुना), 111 (नविन) या जागा Bus Bay साठी 45.0 मी. रूंद विकास योजना रस्त्याच्या आखणीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसारे फेरबदल करणेसाठी हि सभा मंजुरी देत असून त्या अनुषंगीक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अंतीम मंजुरीसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी मा. आयुक्त सो., मिरा भाईंदर महानगरपालिका यांना हि महासभा अधिकार देत आहे.

सुचक :- अनुमोदक :- वैशाली गजेंद्र रकवी

श्री. सुरेश खंडेलवाल ठराव सर्वानुमते मंजूर सौ. वैशाली ग. रकवी

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.19/10/2018

बांधकाम विभाग

प्रकरण क्रमांक (82) :- भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन व मिरारोड रेल्वे स्टेशन मधील रेल्वे उड्डाणपुल, फुट ओव्हर ब्रिजवर शेड बांधणे व दुरुस्ती करणेसाठी रेल्वे प्रशासनास रक्कम प्रदान करणेबाबत.

प्रस्तावना :-

भाईंदर रेल्वे स्टेशन व मिरारोड रेल्वे स्टेशन दरम्यान भाईंदर रेल्वे स्टेशन नंतर महानगरपालिकेचे रेल्वे प्रशासनामार्फत Deposit Work नुसार दोन फुट ओव्हर ब्रिज व एक उड्डाणपुल बांधण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रिजवर शेड बांधणे व फुट ओव्हर ब्रिजची दुरुस्ती तसेच उड्डाणपुलाची दुरुस्ती करणेची आवश्यकता असल्याने रेल्वे प्रशासनाकडे अंदाजपत्रक तयार करुन देण्याची विनंती केली होती. सदर दोन्ही कामे रेल्वेच्या अंतर्गत असल्याने रेल्वेमार्फत Deposit Work नुसार कामे करणे आवश्यक आहे. रेल्वे प्रशासनाने सदर दोन्ही फुट ओव्हर ब्रिजसाठी रु.2,40,83,000/- रक्कमेची मागणी केली आहे. उपरोक्त कामासाठी लागणारी रु.2,40,83,000/- इतक्या रक्कमेची तरतुद सन 2018-19 च्या अर्थसंकल्पात करावयाची आहे व सदर रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट Sr. Divisional Finance Manager, Western Railway Mumbai Central यांचे नावे काढणेबाबत रेल्वे प्रशासनाने कळविले आहे. रेल्वे प्रशासनामार्फत सदर रक्कमेसाठी पाठपुरावा होत असून सदर पुल दुरुस्ती न केल्यास काही दुर्घटना होवू शकते. सदर खर्चासाठी पुर्न:विनीयोजनाद्वारे तरतुद उपलब्ध करुन रेल्वे प्रशासनास रक्कम भरावी लागेल.

तरी सदर प्रस्तावास मान्यता देण्यास शिफारस आहे.

ठराव क्र. 63 :-

सदर कामाकरीता चालू वर्षाच्या आर्थिक संकल्पात तरतुद करण्यात आलेली नाही. तथापि रेल्वे हद्दीत घडणाऱ्या दुर्घटना पाहता आवश्यक दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करुन सदर पुलांची अत्यावश्यक दुरुस्ती कामे करण्याचे अंदाजपत्रक उपलब्ध करुन घेण्यात यावे. सदर दुरुस्ती कामांकरीता आवश्यक तरतुद करुन सदर रक्कम रेल्वे प्रशासनाकडे जमा करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक:- Rohan (Rahul Shah) श्री. राकेश शाह

अनुमोदन :- A. S. Kasudariya श्री. अरविन्द कासोदरिया

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव वाचुन कायम करण्यात आला

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-4/2018-19/DK/MT-10

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१९/१०/२०१८

प्रकरण क्रमांक (८१) :- "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" अंतर्गत वितरीत केलेल्या अनुदानातून करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत.

ठराव क्रमांक. ((२) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पायाभूत सोई सुविधा अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरीता रस्ते त्याखालील पुल याकरीता रु.४.०० कोटी व स्मशानभूमी नुतनीकरणासाठी रु.१.०० कोटी असे रु.५.०० कोटीच्या मर्यादेत कामे घेण्यास व जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी नगरविकास विभागाने दि.१२ सप्टेंबर २०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविलेले आहे.

मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.१२/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कामांचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, मा. महासभेचा ठराव, काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करण्यास तयार असल्याचे प्रमाणपत्र, शासन अनुदानापेक्षा अधिकचा खर्च लागल्यास तो मनपा करण्यास तयार असल्याबाबतचे प्रमाणपत्र, सदर काम अन्य कोणत्याही योजनेतून हाती घेतलेले नाही व प्रस्तावित नाही असे प्रमाणपत्र, सदरचे काम विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीनूसार असलेल्याचे प्रमाणपत्र, सदर कामाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची ताब्यातील व सार्वजनिक वापराची असल्याचे प्रमाणपत्र व विभागीय आयुक्त यांनी पुरविलेल्या छाननी पत्रकानूसार सादर करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार शहरातील रस्ते, पुल व स्मशान भुमी यांची आवश्यकता पाहता खालील कामे घेण्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

अ.क्र.	कामे	रक्कम
१)	उत्तन गोठणी येथे पुल पुर्नबांधणी करणे.	रु. ३८,६१,६५०/-
२)	उत्तन नवी खाडी येथे पुल पुर्नबांधणी करणे.	रु. ३८,६१,६५०/-
३)	राष्ट्रीय महामार्गालगत वॉर्ड क्र.१४ वर्सोवा, दाचकुल पाडा येथे स्मशान भुमी बांधणे	रु.५०,००,०००/-
४)	भाईंदर पुर्व रेल्वे फाटक ते गोडदेव नाका कॉंक्रिट रस्ता करणे	रु.३,२४,००,०००/-
५)	मिरारोड स्मशान भुमी विकसीत करणे	रु.५०,००,०००/-

सुचक :- श्री. रोहिदास पाटील

अनुमोदक :- सौ. दिपीका अरोरा

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MT -15

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.१९/१०/२०१८

प्रकरण क्रमांक (८०) :- राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पायथ्या समातंर ३० मीटर रुंद विकास योजनेतील रस्ता विकसित करणे व नाला बांधणे कामाला सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देणे.

ठराव क्रमांक. (८९) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या पुर्वेस संजय गांधी राष्ट्रीय उदयान (नॅशनल पार्क) असून सदर भागातील डोंगर दऱ्यातुन वाहणारे पावसाचे पाणी महानगरपालिका क्षेत्रात येत असल्याने सदर पाण्याचे नियोजन करण्यासाठी सल्लागार नेमणेस मा. महासभा दि.१६/१०/२०१७ ठराव क्र.०६ अन्वये मान्यता दिल्यानुसार सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन राष्ट्रीय महामार्ग क्र.८ जात असून महामार्गाच्या दुतर्फा इमारती असल्याने व सदर रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ असल्याने रस्त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे दहिसर चेकनाका ते साई पॅलेस हॉटेल पर्यंत जाणारा ३० मी. रुंदीचा अहमदाबादहुन मुंबईकडे जाण्याकरीता पर्यायी रस्ता उपलब्ध होणार आहे. सदर रस्त्यालगत नाला बांधल्यास महापालिका क्षेत्रात येणारे पावसाचे पाणी देखील साई पॅलेस हॉटेल ते घोडबंदर खाडीकडे निघून जाईल.

मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे झालेल्या बैठकीत दहीसर चेक नाका ते साई पॅलेस हॉटेल घोडबंदर या राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ या रस्त्यास ३० मीटर रुंदीचा समांतर रस्ता तयार करणे व रस्त्यालगत नाला बांधण्याचे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महानगरपालिकेने सादर केल्यास प्राधिकरणामार्फत सदर काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. त्या अनुशंगाने सदर कामाचा मे. ५ इलेमेन्ट डीझाईन सेल मार्फत रु.१२४.११ कोटीचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्रीमती. सुजाता प. पारधी

अनुमोदक :- श्रीमा. मिराताई यादव

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MT -13

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.१९/१०/२०१८

प्रकरण क्रमांक (७९) :-मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र.१३ मध्ये गटारे इतर आवश्यक कामे करणे.

ठराव क्रमांक. (८०) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभूमीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र.१३ मध्ये गटारे इतर कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाची मागणी मा. उप महापौर, श्री. चंद्रकांत वैती यांनी केलेली असून सदर काम त्यांच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी अंतर्गत करणेबाबत मागणी केलेली आहे. सदर कामाचे रु.१,५०,००,०००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर कामी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या "उप-महापौर स्वेच्छा निर्णय निधी" या रु.१५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :-

श्रीमती. कृपाली शिंदे (मोहिते)

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

Sanjay Thorade

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2018-19/MT -14

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.19/10/2018

प्रकरण क्र. (78) :- सिल्वर पार्क येथील साईबाबा मंदिरा समोरील चौकास नाव देणे.

ठराव क्रमांक (७९) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिल्वर पार्क, साईधाम मंदीर, चंद्रेश ॲकॉर्ड, आचार्य विनोबा भावे मार्ग येथे संघवी साकलचंद चुन्नीलाल तातडे ट्रस्ट यांनी स्वखर्चानी चौक बांधून सदर चौकास "साईबाबा धाम चौक" असे नामकरण करणेबाबत पत्रान्वये विनंती अर्ज केलेला आहे. सदरच्या मंदीराला यावर्षी 25 वर्षे देखील पुर्ण होत आहेत, या वर्षी रजत महोत्सव असल्याने सदर चौकास **"साईबाबा धाम चौक"** असे नामकरण करण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

सदर रस्ता हा मुख्य रस्ता असून सदर रस्त्यावरुन मेट्रो रेल्वे व उड्डाण पुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामास अडथळा न होता भविष्यात चौक बांधणे शक्य असल्यास संघवी साकलचंद चुन्नीलाल तातडे ट्रस्ट, खाजगी संस्था, यांना व ते तयार नसल्यास महानगरपालिकेमार्फत चौक बांधण्यास व मा.आयुक्त यांना अटीशर्ती ठरविण्यास ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक:- DPAhuja

सौ. दीपिका अरोरा

अनुमोदन :- Dalvi

श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

Jmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि.१९/१०/२०१८

प्रकरण क्र (७६) :- आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीमधील हायलँड रस्त्यावरील बी.एम.सी. पाईपलाईन छेदून १५०० एम.एम. व्यासाची जलवाहिनी ट्रेंचलेस पध्दतीने ठाणे महानगरपालिकेमार्फत पूर्णठेव तत्वावर अंथरणे.

प्रस्तावना :-

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत ते पाटलीपाडा दरम्यान १५९० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणेचे काम बाळकुम येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या ट्रेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणे व्यतिरिक्त पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ६०० मि.मी व्यासाची जलवाहिनी रस्त्यालगतच्या पदपथावरुन अंथरुन अंशत: पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस आवश्यक असणारा १२५ द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी सदर ठिकाणी जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या टेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी प्राप्त आहे. सदर परवानगीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अस्तित्वातील १८०० मि.मी. ते २७५० मि.मी. व्यासाच्या ५ जलवाहिन्या सुमारे ८ ते ९ मिटर खोलीवर छेदून मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रस्तावीत जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. तसेच सदर ठिकाणी सुमारे ४.५ मिटर खोलीवर कठीण दगडाचा स्थर लागलेला आहे. यास्तव ठेकेदाराने सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने अतिरिक्त बाबीची मागणी केलेली होती. याअनुषंगाने याबाबत मे. वाप्कोस लि. तसेच आय.आय.टी. मुंबई यांनी देखील सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असून अदयावत पध्दतीचा वापर करणे आवश्यक असल्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

सबब सदर ठिकाणी अदयावत पध्दतीचा वापर करुन जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी तसेच कमी परीमाणाच्या लांबीसाठी त्याक्षेत्रातील तज्ञ ठेकेदार सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. तसेच सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने त्यासाठी आवश्यक असणारी योग्य त्या व्यासाची मॅक्रोटंनलींग मशिन तसेच याकामाचा अनुभव असणारे ठेकेदार फारच कमी आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात भुयारी गटार योजने अंतर्गत मॅक्रोटंनलींग पध्दतीचा वापर करुन १५०० मि.मी. व्यासापर्यंतच्या मलवाहिन्या अंथरण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. सदरच्या कामांतर्गत अतिरिक्त बाब म्हणून / स्वतंत्र निविदेद्वारे विषयांकीत कामातील फक्त मॅक्रोटंनलींगचे काम पूर्णठेव तत्त्वावर करुन देणेबाबत ठाणे महानगरपालिकेस विनंती केली होती. त्यास अनुसरुन त्यानी सदरचे काम करुन देणेस सहमती दर्शविलेली आहे.

या कामासाठी लागणारे १५०० मि.मी. व्यासाचे केसिंग पाईप मिरा भाईंदर महानगरपालिका उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच सदरच्या केसिंग पाईपमधून १३५० मि.मी. व्यासाची कॅरिंग पाईप अंथरण्याचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

ठाणे महानगरपालिकेने सदरच्या कामाबाबतची निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी कामाचा अपेक्षीत खर्च रु. १.९८ कोटी पैकी ५० टक्के रक्कम रु. ९९.०० लक्ष निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी व उर्वरीत ५० टक्के रक्कम काम सुरु करण्यापूर्वी अपेक्षीलेली आहे.

सदरच्या कामासाठीची अंदाजपत्रकीय किंमत रु.२,२०,६०,२२३/- इतकी आहे. सदर काम ठाणे महानगरपालिके कडून पूर्णठेव तत्त्वावर करुन घेणे आवश्यक असून त्याकरीता एकूण रु.१.९८/- कोटी इतका

खर्च अपेक्षित असून सदर खर्चास व काम करुन घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव क्र. ७८ :-

सदरच्या कामासाठी रु. २,२०,६०,२२३/- इतक्या रक्कमेस हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचे काम महापालिकेमार्फत करण्यात यावे गरज भासल्यास ठाणे महापालिकांच्या तज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच अतिरीक्त ७५ द.ल.ली. पाणीपुरवठा योजनेतील निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त असल्याने तसेच वस्तु व सेवा कर लागु झाल्याने व इतर खर्च वाढल्याने योजनेवरील खर्च रु.३०० कोटी इतका अपेक्षित आहे. सदर खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

श्री. मनोहर नारायण डुंबरे

सुचक :-

श्री. प्रशांत दळवी

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि.१९/१०/२०१८

।। ठराव ।।

प्रकरण क्र. ७५ :- भाईंदर (प) शिवसेना गल्ली येथिल स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

ठराव क्र. ७५ :-

भाईंदर (प) शिवसेना गल्ली येथिल स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत महानगरपालिकेची मुख्य जलवाहिनी १५ ते २० वर्ष जुनी असुन बऱ्याच इमारतींच्या खालून गेलेली आहे. तसेच सदर जलवाहिनी ७ ते ८ फुट खोलवर असून जीर्ण झालेली आहे. त्याकरीता दुरुस्तीचे काम करण्यास त्रासदायक होत आहे. सदर परिसरात जलवाहिनी टाकणे गरजेचे आहे. सदर कामास मा. विशेष महासभा दि.०२/०३/२०१७, ठराव क्र.१०६ अन्वये रु.१,१४,५३,९००/- इतक्या रकमेस मान्यता दिलेली होती. त्यानुसार सदर कामाची निविदा मागविण्यात आलेली होती. परंतु सदर निविदेस कमी प्रतिसाद तसेच जास्त दराची प्राप्त होत आहेत.

सदर कामाचे अंदाजपत्रक नव्याने सन २०१६-१७ च्या महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या दरसुचीनुसार सदर कामाची किंमत अंदाजित खर्च रक्कम रु.१,७७,९९,८९६/- इतकी आहे.

सदर कामी सुधारीत रु.१,७७,९९,८९६/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

सुचक :- अॅड. रवि व्यास

अनुमोदन :- अशोक तिवारी
श्री. अशोक तिवारी

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/२०१८

प्रकरण क्र. ७४ :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

ठराव क्र. ७६ :-

प्रस्तावना :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व आस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण् कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात येते यावर्षी ही मीरा भाईंदर कामगार सेना, श्रमिक जनरल कामगार संघटना व झुंज जनरल कामगार युनियन यांचेकडुन सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे.

अटलबिहारी वाजपेयी आणि रामभाऊ म्हाळगी यांचे नाते अतूट आहे. २००३ मध्ये पंतप्रधान असताना अटलजींच्या हस्ते रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे लोकार्पण करण्यात आले होते. त्याचप्रमाणे २००४ मध्ये भारतीय जनता पक्षातर्फे राष्ट्रीय चिंतन बैठक आयोजित करण्यात आली होती.

अटलबिहारी वाजपेयी केवळ प्रखर आणि ओजस्वी वक्ताच नव्हे तर मोठ्या मनाचे व्यक्तीमत्व होते. राजकारणात त्यांची संवेदनशीलता व्यक्त होत असे. जेव्हा ते विरोधी पक्षात होते तेव्हा सरकारच्या जनहिताच्या कामांची प्रशंसा करण्यात त्यांना मुळीच संकोच वाटत नसे. त्यांनी विरोधही रचनात्मक पद्धतीने केला. त्यांच्या या गुणांमुळेच ते पक्षांची बंधने ओलांडून सर्वप्रिय राजकीय नेता म्हणून प्रस्थापित झाले होते.

आयुष्यभर संसदीय परंपरांचे पालन करून त्यांनी भारताच्या संसदीय लोकशाहीला समृद्ध केले होते. पंडित दिनदयाळ उपाध्याय यांना अटलजींमध्ये भारताचे भवितव्य दिसले होते. पंडित जवाहरलाल

नेहरू यांनी अटलजींची क्षमता ओळखून असे म्हटले होते की, ते एक दिवस भारताचे नेतृत्व करतील. राम मनोहर लोहिया त्यांच्या हिंदीप्रेमाची प्रशंसा करत. माजी पंतप्रधान चंद्रशेखर त्यांना संसदेत 'गुरुदेव' म्हणून संबोधित करत असत. अटलबिहारी वाजपेयी यांना सर्वोत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कारही देण्यात आला होता.

त्यांच्यासाठी देशहित सर्वात महत्त्वाचे होते. १९९३ साली विरोधी पक्षनेता असूनही मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत भारताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याचा सरकारचा प्रस्ताव स्वीकारला आणि जिनेव्हात आयोगाच्या बैठकीत भारताची बाजू अत्यंत प्रभावीपणे मांडली.

त्यांच्या निधनाने केवळ भारतच नाही तर संपूर्ण जगातून एक दूरदृष्टी, परिपक्व, संवेदनशील, मोठ्या मनाचा, दृढ निश्चयी असा अटल नेता गेला. त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून चालत भारताला एक महान राष्ट्र करण्याचा त्यांचा संकल्प पूर्ण करण्यात आम्ही सहभागी होऊ.

अटलबिहारी वाजपेयीजी यांच्या निधनाबद्दल ही सभा तीव्र शोक व्यक्त करत आहे तसेच त्यांच्या शोकाकुल आपली संवेदना व्यक्त करत आहे. कृतज्ञ राष्ट्रातर्फे अटलजींना शत-शत नमन.

श्री. अनिल दिवाकर सावंत (कॉंग्रेस लोकशाही आघाडी) :-

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांचे दिर्घ आजाराने दि. १६/०८/२०१८ रोजी दुखःद निधन झाले. तीन वेळा भारताचे पंतप्रधान होण्याचा मान त्यांनी मिळविला. कवी मनाच्या वाजपेयींची १०० पेक्षा जास्त पुस्तके प्रसिध्द झाली ते उत्कृष्ठ कवी होते. १० वेळा ते लोकसभेवर व २ वेळा राज्यसभेवर निवडून गेले. भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी पंतप्रधान असतेवेळी वाजपेयी विरोधी पक्षनेता होते. त्यावेळी न्युयॉर्क यथे झालेल्या संयुक्त राष्ट्राच्या परिषदेसाठी जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळात त्यांचा समावेश करण्यात आला यावरुन त्यांची योग्यता दिसून येते. ते आजतशत्रु होते. आपल्या शांत व सौम्य स्वभावामुळे, व घेतलेल्या कणखर भुमिकेमुळे केवळ देशातच नव्हे, तर जगभरात त्यांनी आदराचे स्थान मिळविलेले आहे. त्यांचे व्यक्तीमत्वच बहुआयामी होते. त्यांचा राजकीय प्रवास आदर्शवत होता. भारताच्या सर्वाधीक लोकप्रिय पंतप्रधानांमध्ये त्यांचा समावेश होतो. भारतीय आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करुन देण्यात आणि जगावर भारताचा ठसा उमटविण्यात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांनी घेतलेला अण्वस्त्र चाचणीचा निर्णय, कारगील युध्दात पाकीस्तानला दिलेला शह आणि आर्थिक सुधारणांचा पाया मजबुत करण्यासाठी त्यांनी सुरु ठेवलेल्या उपाययोजना भारतासाठी आजही फायद्याच्या ठरत आहेत. लालकृष्ण अडवाणी आणि भैरोसिंग शेखावत आणि त्यांनी १९८० साली भाजपाची स्थापना केली. प्रमुख विरोधी पक्ष म्हणून सरकारला जेरीस आणणाऱ्या भाजपाचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचा मानही त्यांना मिळाला होता. एवढ्या मोठ्या पक्षाची सुरुवात सुरुवात केवळ दोन खासदारांनी झाली. तरीही भाजपा हा देशाच्या मुख्य प्रवाहात राहिला आणि वाजपेयी हेच पक्षाच्या केंद्रस्थानी राहिले. त्यांच्या कवितेप्रमाणे त्यांचे व्यक्तीमत्वदेखील तितकेच प्रभावी होते. आयुष्यभर सर्वसामान्यत्व त्यांनी जपले. "साधे जीवन,

उच्च विचार" हे त्यांच्या जीवनाचे सार होते. जिभेवर सरस्वती अन् मनात भारतमाता घेवून जगणारे ते अलौकिकच होते. अशा या महान नेत्याला, भारत मातेच्या सुपुत्राला भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांना या सभागृहाची भावपूर्ण श्रध्दांजली.

श्री. हरिश्चंद्र आमगांवकर (गटनेता - शिवसेना पक्ष):-

स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयीजी यांना शिवसेना पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

Dmehta

(डिंम्पल विनोद मेहता)
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

-: स्व. करुणानिधी यांना भावपूर्ण श्रध्दांजली :-

श्री. रोहिदास शंकर पाटील (सभागृहनेता - भारतीय जनता पार्टी) :-

तामिळनाडू राज्याचे डि.एम.के पक्षाचे प्रमुख कै. करुणानिधी यांचे दि. ०७/०८/२०१८ रोजी निधन झाले. ते पाच वेळा तामिळनाडू राज्याचे मुख्यमंत्री होते. ६० वर्षे ते राजकारणात सक्रीय होते. दर निवडणूकीमध्ये ते निवडणूक येण्याचा त्यांनी विक्रम केलेला आहे. ते राजकारणाबरोबर एक नाटककार, एक कथाकार म्हणून प्रसिध्द होते.

त्यांच्या दि. ०७/०८/२०१८ रोजी अल्पशा आजाराने निधन झालेबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांना श्रंध्दाजली अर्पण करीत आहे.

श्री. हरिश्चंद्र आमगांवकर (गटनेता - शिवसेना पक्ष):-

स्वर्गीय करुणानिधी यांना शिवसेना पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

Dmehta

(डिंम्पल विनोद मेहता)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

-: स्व. गुरुदास कामत वाजपेयी यांना भावपूर्ण श्रध्दांजली :-

श्री. रोहिदास शंकर पाटील (सभागृहनेता - भारतीय जनता पार्टी) :-

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुरुदास कामत हे दिल्लीत कामानिमित्त आले असताना त्यांना हार्ट अटॅक आल्याने दि. २२/०८/२०१८ रोजी त्यांचे अकस्मात निधन झाले. हॉस्पीटलमध्ये पोहोचेपर्यंत त्यांनी अखेरचा श्वास घेतला होता. ६३ वर्षाचे कामत हे आयुष्यभर मुंबई काँग्रेसमध्ये सक्रिय होते. सतरच्या दशकात त्यांनी विद्यार्थी चळवळीतून राजकारणात प्रवेश केला. १९७६ साली ते NSUI चे अध्यक्ष होते. १९८४ ला ते पहिल्यांदा मुंबईतून लोकसभेवर निवडून गेले. २००३ ते २००८ ते मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष होते. २००९ ते २०११ या काळात ते UPA सरकारमध्ये राज्यमंत्री होते. त्यांनी वेळोवेळी पक्षाची इतर राज्यातील जबाबदारीही स्वीकारली होती.

"शिवसेनेचा झंझावात असतानाही काँग्रेस पक्ष जनतेपर्यंत नेण्यात गुरुदास कामतांचं योगदान मोलाचं होतं. त्यांच्या कार्यकर्त्यांची फळी मोठी होती,". कै. श्री. गुरुदास कामत यांच्या दि.22/08/2018 अस्कमात निधनाबद्दल ही सभा तीव्र शोक व्यक्त करत आहे तसेच त्यांच्या शोकाकुल आपली संवेदना व्यक्त करत आहे.

श्री. अनिल दिवाकर सावंत (काँग्रेस लोकशाही आघाडी) :-

काँग्रेसचे जेष्ठ नेते गुरुदास कामत यांचे अल्पशा आजाराने दि. २०/०८/२०१८ रोजी दु:खद निधन झाले. उत्तर-पश्चिम मुंबई मतदार संघातून ते चार वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. केंद्रीय मंत्री मंडळात राज्य मंत्री म्हणून त्यांनी महत्वाची भुमिका निभावली होती. पेशाने वकील असलेल्या स्व. गुरुदास कामत यांचा जनसंपर्क दांडगा होता व संघटनेवर सुध्दा त्यांची पकड घट्ट होती. मुंबई प्रदेश अध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाल उज्वल होता. स्व. गुरुदास कामत यांना या सभागृहाची भावपूर्ण श्रध्दांजली.

श्री. हरिश्चंद्र आमगांवकर (गटनेता - शिवसेना पक्ष):-

स्वर्गीय गुरुदास कामत यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

Dmehta

(डिंम्पल विनोद मेहता)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

-: स्व. अजित वाडेकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली :-

श्री. रोहिदास शंकर पाटील (सभागृहनेता - भारतीय जनता पार्टी) :-

दि. ०१ एप्रिल १९४१ रोजी अजित वाडेकर यांना जन्म झाला होता. अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारताला परदेशात पहिली कसोटी मालिका जिंकून दिली. १९७१ मध्ये वाडेकरांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं वेस्ट इंडिज आणि इंग्लंड या बलाढ्य संघांचा त्यांच्याच मायदेशात पराभव केला. १९५८ पासून प्रथम श्रेणी क्रिकेट खेळण्यास सुरुवात करणाऱ्या वाडेकरांनी १९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. १९६६ ते १९७४ या कालावधीत वाडेकर भारतीय संघाकडून खेळले. आंतरराष्ट्रीय स्तरावर ते एकूण ३७ कसोटी सामने खेळले. यामध्ये त्यांनी एक शतक आणि चौदा अर्धशतकं झळकावली.

अजित वाडेकर हे गॅरी सोबर्स यांचेप्रमाणे डावखुरे आक्रमक फलंदाज आणि स्लिपमधील सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणूनही ते ओळखले जायचे. बहुतेकदा तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करायला येणाऱ्या वाडेकर यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३७ कसोटी सामन्यांमध्ये २ हजार ११३ धावा केल्या. भारत सरकारनं १९६७ मध्ये अर्जुन पुरस्कारानं त्यांचा गौरव केला होता. तर १९७२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. त्यांच्या निधनानं क्रिकेट विश्वातील मोठा तारा निखळला अशी हळहळ सर्वत्र व्यक्त होत आहे.

परदेशी भूमीवर भारताला विजयाची सवय लावून देणारा कर्णधार अजित वाडेकर यांना श्रध्दांजली अर्पण करत आहे.

श्री. हरिश्चंद्र आमगांवकर (गटनेता - शिवसेना पक्ष):-

स्वर्गीय अजित वाडेकर यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

Dmehta

(डिंम्पल विनोद मेहता)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

-: स्व. विजय चव्हाण यांना भावपूर्ण श्रध्दांजली :-

श्री. रोहिदास शंकर पाटील (सभागृहनेता - भारतीय जनता पार्टी) :-

अस्सल विनोदांमधून रसिकांना खळखळून हसवणारे ज्येष्ठ अभिनेते विजय चव्हाण त्यांच्या निधनाने मराठी चित्रपटसृष्टीतील तारा निखळल्याची भावना व्यक्त होत आहेत. **विजय चव्हाण** यांनी अनेक नाटकांत आणि चित्रपटांत कामे केलेली असून, प्रल्हाद केशव अत्रे यांनी लिहिलेल्या मोरूची मावशी या नाटकातील मावशीच्या स्त्री-भूमिकेसाठी ते विशेष ओळखले जातात.

विजय चव्हाण यांना काही महिन्यांपूर्वीच चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कारने सन्मानित करण्यात आलं होतं. 'अशी असावी सासू'मधल्या भूमिकेसाठी त्यांना राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. याशिवाय, त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं होतं.

विजय चव्हाण यांच्या निधनाने चित्रपट आणि नाटक क्षेत्राची मोठी हानी झाली असून महाराष्ट्राच्या अशा अष्टपैलू अभिनेत्यास ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

श्री. हरिश्चंद्र आमगांवकर (गटनेता - शिवसेना पक्ष):-

स्वर्गीय विजय चव्हाण यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

Dmehta

(डिंम्पल विनोद मेहता)

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

-: स्व. जैन दिगंबर मुनी यांना भावपूर्ण श्रध्दांजली :-

श्री. रोहिदास शंकर पाटील (सभागृहनेता - भारतीय जनता पार्टी) :-

मध्य प्रदेश मध्ये १९६७ मध्ये दिगंबर जैन मुनी त्यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव पवन कुमार जैन असे होते. जैन संत बनण्याकरीता त्यांनी दि. ८ मार्च १९८१ मध्ये घराचा त्याग केला होता. दिगंबर जैन मुनी हे त्यांच्या प्रवचनाकरीता प्रसिध्द होते. "कडवे प्रवचन" या नावाने ते समाजाला संदेश देत. ते समाज आणि राष्ट्र जीवनाच्या मुख्य मुद्दयांवर त्यांचे सल्ले देत. मुनी तरुण सागरजी महाराज यांच्या अकाली निधनामुळे अतिशय दु:ख झाले असून त्यांचे विचार लोकांना प्रेरणा देत राहतील.

त्यांच्या अकाली झालेल्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांना श्रंध्दाजली अर्पण करीत आहे.

श्री. हरिश्चंद्र आमगांवकर (गटनेता - शिवसेना पक्ष):-

स्वर्गीय जैन दिगंबर मुनी यांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

Dmehta

(डिंम्पल विनोद मेहता)
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०४/०९/२०१८

-: स्व. अतिवृष्टीमुळे मृत्यू झालेल्या विवीध राज्यातील नागरीकांना भावपूर्ण श्रध्दांजली :-

श्री. रोहिदास शंकर पाटील (सभागृहनेता - भारतीय जनता पार्टी) :-

तसेच आपल्या देशातील केरळ, उत्तराखंड, कर्नाटक, व देशातील अनेक ठिकाणी महाभयंकर पूर आलेला असून, त्या त्या ठिकाणी मुसळधार पावसाने तेथील जनजीवन मोडीत काढले आहे. सध्याच्या स्थितीला देशात सुमारे हजारो कोटींच्या मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. लाखांहून अधिक नागरिक पुरामुळे बेघर झाल्याचेही त्यांनी सांगितलं. भूस्खलनामुळे मातीखाली दबून व प्रवाहात वाहून गेल्याने अनेकांचा मृत्यू झालेले आहेत.

अस्मानी संकटामुळे उध्दभवलेल्या या आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या मृत नागरीकांच्या आत्म्यास श्रध्दांजली अर्पण करीत आहे व केरळ, उत्तराखंड, कर्नाटक, व देशातील अनेक ठिकाणी नागरीकांचे विस्कळीत जनजीवन सुस्थितीत येणेस ईश्वर बळ देवो.

श्री. हरिश्चंद्र आमगांवकर (गटनेता - शिवसेना पक्ष):-

केरळ, उत्तराखंड, कर्नाटक, व देशातील अनेक ठिकाणी महाभयंकर पुरस्थितीमुळे मृत्यू पडलेल्या नागरीकांना शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

Dmehta

(डिंम्पल विनोद मेहता)
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

Anil D. Sawant

Corporator - Mira-Bhaindar Municipal Corporation
President - Mira-Bhainder (City) Dist. Congress Committee
Special Executive Officer - Maharashtra State

Mob.: 9323226295 / 9594996295, E-mail : sawant07meera@gmail.com
H.O. : 1, Asmita Ascon Acres, Naya Nagar, Mira Road (E), Thane - 401107.
Res.: B-52, Punarvasu, Shrishti Complex, Sec.-3, Mira Road (E), Thane - 401107.

मा.महासभा- ४.०९.२०१८

शोक प्रस्ताव

भारताचे माजी पंतप्रधान भारत रत्न स्व.अटल बिहारी वाजपेयी यांचे दीर्घ आजाराने दि.१६.८.२०१८ रोजी दुख:द निधन झाले.तीन वेळा भारताचे पंतप्रधान होण्याचा मान त्यांनी मिळविला.कवी मनाच्या वाजपेयींची १० पेक्षा जास्त पुस्तके प्रसिध्द झाली.ते उत्कृष्ठ कवी होते.१० वेळा ते लोकसभेवर व २ वेळा राज्यसभेवर निवडून गेले.भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी पंतप्रधान असतेवेळी वाजपेयी विरोधीपक्ष नेते होते त्यावेळी नुयार्क येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेसाठी जाणा-या प्रतिनिधी मंडळात त्यांचा समावेश करण्यात आला यावरून त्यांची योग्यता दिसून येते.ते अजात शत्रू होते. आपल्या शांत व सौम्य स्वभावामुळे, व घेतलेल्या कणखर भूमिकेमुळे केवळ देशातच नव्हे, तर जगभरात त्यांनी आदराचे स्थान मिळविलेले आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्वच बहुआयामी होते. त्यांचा राजकीय प्रवास आदर्शवत होता. भारताच्या सर्वाधिक लोकप्रिय पंतप्रधानाम्ध्ये त्यांचा समावेश होतो.भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करून देण्यात आणि जगावर भारताचा ठसा उमटविण्यात माजी पंतप्रधानअटलबिहारी वाजपेयी यांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांनी घेतलेला अण्वस्त्र चाचणीचा निर्णय, कारगिल युद्धात पाकिस्तानला दिलेला शह आणि आर्थिक सुधारणांचा पाया मजबूत करण्यासाठी त्यांनी सुरू ठेवलेल्या उपाययोजना भारतासाठी आजही फायद्याच्या ठरत आहेत. लालकृष्ण आडवाणी आणि भैरोसिंग शेखावत आणि त्यांनी १९८० साली भाजपाची स्थापना केली. प्रमुख विरोधी पक्ष म्हणून सरकारला जेरीस आणणाऱ्या भाजपाचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचा मानही त्यांना मिळाला होता. एवढ्या मोठ्या पक्षाची सुरुवात केवळ दोन खासदारांनी झाली, तरीही भाजपा हा देशाच्या मुख्य प्रवाहात राहिला आणि वाजपेयी हेच पक्षाच्या केंद्रस्थानी राहिले .त्यांच्या कवितेप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्त्वदेखील तितकेच प्रभावी होते. आयुष्यभर सर्वसामान्यत्व त्यांनी जपले. 'साधे जीवन, उच्च विचार' हे त्यांच्या जीवनाचे सार होते .जिभेवर सरस्वती अन् मनात भारतमाता घेऊन जगणारे ते अलौकिकच होते. अशा या महान नेत्याला ,भारत मातेच्या सुपुत्राला भारत रत्न स्व.अटल बिहारी वाजपेयी यांना या सभागृहाची भावपूर्ण श्रद्धांजली.

अनिल सावंत

Anil D. Sawant

Corporator - Mira-Bhaindar Municipal Corporation
President - Mira-Bhainder (City) Dist. Congress Committee
Special Executive Officer - Maharashtra State

Mob.: 9323226295 / 9594996295, E-mail : sawant07meera@gmail.com
H.O. : 1, Asmita Ascon Acres, Naya Nagar, Mira Road (E), Thane - 401107.
Res.: B-52, Punarvasu, Shrishti Complex, Sec.-3, Mira Road (E), Thane - 401107.

मा.महासभा- ४.०९.२०१८

शोक प्रस्ताव

काँग्रेस चे जेष्ठ नेते गुरुदास कामत यांचे अल्पशा आजाराने २०.८.२०१८ रोजी दु:खद निधन झाले.उत्तर-पश्चिम मुंबई मतदार संघातून ते चार वेळा लोकसभेवर निवडून गेले होते.केंद्रीय मंत्री मंडळात राज्य मंत्री म्हणून त्यांनी महत्वाची भूमिका निभावली होती.पेशाने वकील असलेल्या स्व.गुरुदास कामत यांचा जनसंपर्क दांडगा होता व संघटनेवर सुद्धा त्यांची पकड घट्ट होती. मुंबई प्रदेश काँग्रेस अध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाल उज्वल होता. स्व.गुरुदास कामत यांना या सभागृहाची भावपूर्ण श्रद्धांजली.

अनिल सावंत

Anil D. Sawant

Corporator - Mira-Bhaindar Municipal Corporation
President - Mira-Bhainder (City) Dist. Congress Committee
Special Executive Officer - Maharashtra State

Mob.: 9323226295 / 9594996295, E-mail : sawant07meera@gmail.com
H.O. : 1, Asmita Ascon Acres, Naya Nagar, Mira Road (E), Thane - 401107.
Res.: B-52, Punarvasu, Shrishti Complex, Sec.-3, Mira Road (E), Thane - 401107.

मा.महासभा- ४.०९.२०१८

शोक प्रस्ताव

पाकिस्तानातून भारताच्या हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करणा-या दहशतवाद्यांचा प्रयत्न मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांच्या नेतृतवाखाली भारतीय जवानांनी उत्तर काश्मीर मधील बांदीपोरा जिल्ह्यातील गुरेज सेक्टर मध्ये हाणून पडला. या धाडसी कारवाईत मंगळवार दि.७.८.२०१८ रोजी चार अतिरेकी ठार झाले असले तरी ,मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांच्या सह तीन जवानांना वीरमरण आले.यामध्ये मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे,हवालदार जमी सिंग,हवालदार विक्रमजीत व रायफलमन मनदीप यांचा समावेश होता.

मीरा रोडच्या शीतल नगरमधील हिरलसागर इमारतीत राणे कुटुंब राहते. ते मूळचे कोकणातील वैभववाडीतील सडूरे गावाचे आहेत. १९८७ पासून ते मीरा रोडमध्ये स्थायिक झाले. मेजर कौस्तुभ याच भागात लहानाचे मोठे झाले. येथील होली क्रॉस शाळा व रावल विध्यालया मध्ये त्यांनी आपले शिक्षण पुरे केले होते.

मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे भारतीय सीमारेषेवर कार्यरत असताना दाखविलेल्या असाधारण शौर्याबद्दल दि.२६ जानेवरी २०१८ रोजी भारताचे माननीय राष्ट्रपती यांचे हस्ते "सेना मेडल"प्रदान करण्यात आले होते.मेजर कौस्तुभ हे या शहराचे सुपुत्र असून शीतल नगर,रूम नं.९,हिरल सागर मीरा रोड-पूर्व,ठाणे-४०११०७ येथे रहात होते.२०१० साली कम्बाईन डिफेन्स सर्विस परीक्षा उतीर्ण झाल्यानंतर त्यांनी ऑफिसर्स ट्रेनिंग चेन्नई येथे पूर्ण केले.ऑक्टोबर २०११ मध्ये ते लेफ्टनंट पदावर रुजू झाले,२०१३ साली ते कॅप्टन झाले व २०१८ साली मेजर पदावर कार्यरत झाले.36वी बटालियन दि राष्ट्रीय रायफल्स मध्ये भारताच्या सीमेवर देशाचे रक्षण करण्याचे महान कार्य करत होते.याबद्दल याच सभागृहाने अभिनंदनाचा ठराव केला होता.

गुरुवार दि.९.८.२०१८ रोजी मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे यांच्या अंतिम यात्रेवेळी शहरातील जमलेला प्रचंड जनसमुदाय हि मेजरांना खरी मानवंदना होती.या वेळी त्यांच्या कुटुंबीयांनी दाखविलेले धैर्य अतुलनीय होते.अशा वेळी ईश्वर या कुटुंबाला या दु:खातून बाहेर पडायची शक्ती देवो. मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे,हवालदार जमी सिंग,हवालदार विक्रमजीत व रायफलमन मनदीप यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून हे सभागृह मानवंदना देत आहे.

अनिल दि.सावंत

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०५/०९/२०१८

(दि. ०४/०९/२०१८ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ५५ :- *महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.*

ठराव क्र. ५६ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक असुन, महानगरपालिकेतील गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची तरतुद आहे. माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन योजना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यन्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.

महानगरपालिका सभा कामकाज नियमचे कलम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. मा. महासभा दि. १६/१०/२०१७, ठराव क्र. ०२ अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यांची संख्या १५ इतकी निश्चित करण्यात आली आहे.

सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार महिला व बालकल्याण समितीवर खालील 15 सदस्यांची 1 वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	सदस्याचे नांव	पक्ष
1	श्रीम. दिपिका अरोरा	भारतीय जनता पार्टी
2	श्रीम. वंदना भावसार	भारतीय जनता पार्टी
3	श्रीम. मेघना रावल	भारतीय जनता पार्टी
4	श्रीम. सुनिता जैन	भारतीय जनता पार्टी
5	श्रीम. शिंदे रुपाली वसंत (मोदी)	भारतीय जनता पार्टी
6	श्रीम. विणा भोईर	भारतीय जनता पार्टी
7	श्रीम. विविता नाईक	भारतीय जनता पार्टी
8	श्रीम. हेतल परमार	भारतीय जनता पार्टी
9	श्रीम. मीना कांगणे	भारतीय जनता पार्टी
10	श्रीम. सुजाता पारधी	भारतीय जनता पार्टी
11	श्रीम. अर्चना कदम	शिवसेना
12	श्रीम. कुसुम गुप्ता	शिवसेना
13	श्रीम. हेलन गोविंद	शिवसेना
14	श्रीम. गिता ह. परदेशी	कॉंग्रेस लोकशाही आघाडी
15	श्रीम. उमा वि. सपार	कॉंग्रेस लोकशाही आघाडी

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०५/०९/२०१८

(दि. ०४/०९/२०१८ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ५६ :- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

ठराव क्र. ५७ :-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

तसेच प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करुन घेता येईल. हे सदस्य वृक्षप्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे. प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील अशी तरतुद आहे.

तरी वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून 9 सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून 2 सदस्य संख्या निश्चित करुन वृक्ष प्राधिकरण समिती तसेच प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील अशी 12 सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी व तौलानिक संख्येप्रमाणे पक्षाच्या संख्याबळाप्रमाणे समितीवर सदस्यांची नावे देण्यांत यावी. बिन सरकारी संघटनेचे सदस्य नियुक्तीची कारवाई होईपर्यंत शहरातील शासकीय संस्था उदा. जिल्हा वनअधिक्षक, वनपाल या कार्यातील वृक्ष संर्वधन झांडाचे आरक्षण व जतन या संबधिचे ज्ञान असलेले सदस्यांची नियुक्ती करावी. जस-जसे बिन सरकारी संघटनेतून सदस्य नियुक्त होतील तस-तसे शासकीय सदस्य कमी करावेत असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत

सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची 1 वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	सदस्याचे नांव	पक्ष
1	श्रीम. शानु जोरावर गोहिल	भारतीय जनता पार्टी
2	श्री. विजयकुमार सिस्थन नारायण राय	भारतीय जनता पार्टी
3	श्री. दिनेश तेजराज जैन	भारतीय जनता पार्टी
4	श्री. संजय अनंत थेराडे	भारतीय जनता पार्टी
5	श्री. दौलत तुकाराम गजरे	भारतीय जनता पार्टी
6	श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी	भारतीय जनता पार्टी
7	श्री. कमलेश यशवंत भोईर	शिवसेना
8	श्री. अनंत गेणू शिर्के	शिवसेना
9	श्री. नरेश तुकाराम पाटील	काँग्रेस लोकशाही आघाडी

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिळकत विभाग

मा. महासभा दि.05/09/2018

(तहकुब सभा दि.04/09/2018)

(के अन्वये प्रस्ताव)

प्रकरण क्रमांक (७२) :- मा. महासभा दि.26/02/2018 ठराव क्र.90 अन्वये उत्सवासाठी ठरविलेल्या मंडप परवानगी दराबाबत फेरविचार करणे.

ठराव क्रमांक (७३) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि.30/11/2011 ठराव क्र.87 अन्वये उत्सवासाठी मंडप घालण्यासाठी परवानगी करीता 0.50 प्रति चौ.फुट दर प्रतिदिन दर निश्चित केलेले आहेत. सदर दर कमी असल्याने सदर दरासह मालमत्ता भाड्याने देण्याचे दर वाढविणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाकडुन मा. महासभेसाठी देण्यात आला होता. मा. महासभा दि.26/02/2018 ठराव क्र.90 अन्वये उत्सवासाठी 0.50 प्रति चौ.फुट / दिन ऐवजी रु.1.00 प्रति चौ.फुट / दिन व रु.1000/- / प्रति गेट प्रतिदिन हे दर मंजुर करण्यात येऊन सदर दर लागु करण्यात आलेले आहेत.

सदर दर हे इतर महानगरपालिकेपेक्षा जास्त असल्याने मंडप परवानगीसाठी दर कमी करण्याबाबत निवेदन प्राप्त झालेले आहे. तरी सार्वजनिक उत्सावासाठी मा. महासभा दि.30/11/2018 ठराव क्र.87 नुसार रु.0.50 प्रति चौ. फुट प्रतिदिन प्रमाणे व कमानीसाठी रु.1000/- प्रति गेट प्रतिदिन तसेच सुका कचरा व ओला कचरा वेगवेगळा करणेबाबत जनजागृती बाबत 8 x 6 चे बॅनर्स लावणेची विनंती करणेस ही मा. महासभा मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. अनिल विराणी

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

PC-4/2018-19/DK/MT-8

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.05/09/2018

(तहकुब सभा दि.04/09/2018)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्र.७१ :- बोर्ड/बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबविणेबाबत.

ठराव क्र. ७२ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दितील अनधिकृत पणे उभारण्यांत येणा-या जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ.द्वारे प्रसिध्द होणा-या जाहिरात विरुध्द संबंधित प्राधिकरण प्रभावीपण कारवाई करीत नसल्याने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे जनहीत जाचिका १५५/२०११ दाखल करण्यांत आली. सदर याचीकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०६/०८/२०१४ रोजी पारीत केलेल्या निर्णयानुसार अनधिकृत जाहिरातींवर प्रभावीपणे कारवाई करणेकरीता सविस्तर आदेश पारीत केलेला आहे. व प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ यांना नोडल ऑफिसर म्हणुन नियुक्त करण्यांत आले होते व त्यांना खालीलप्रमाणे कामाचे स्वरुप देण्यांत आले होते.

1. शुभेच्छांचे तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. यांचे आकारमान ६ x ४ कमाल चौ.फुटापर्यंत असणे बंधनकारक करावे तसेच एकाच वेळी एकाच अर्जदारास एका जाहिरातीकरीता फक्त ५ बॅनरची परवानगी देण्यांत यावी.
२ तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स/कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. करीता परवानगी फक्त ५ दिवसांकरीता देण्यांत यावी.
३ तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. करीता परवानगी देते वेळी अर्जदाराकडून जाहिरात फी करीता होणा-या शुल्काच्या १० पट अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी व मुदतीत जाहिरातीचे फलक न काढल्यास अनामत रक्कम जप्त करावी. तसेच अनामत रक्कमेकरीता संबंधितांनी सर्व फलक स्वत: काढून टाकलेबाबतचे छायाचित्रासह अर्ज करणे बंधनकारक करावे तद्नंतर अनामत रक्कम अदा करण्यांत यावी.
४) जाहिरात फलकावर मुद्रक, प्रकाशक यांचे नाव, जावक क्र. व परवानगीचा कालावधी नमुद करणे बंधनकारक करावे ज्या फलकांवर असे नमुद नसल्यास सदरचे फलक त्वरीत काढण्यांत यावेत व संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यांत यावेत.

परंतु दि.०१/०३/२०१८ रोजीच्या आदेशानुसार उपआयुक्त (जाहिरात) यांना नोडल ऑफिसर म्हणुन नियुक्त करण्यांत आले आहे. त्याअनुषंगाने सर्व प्रभाग अधिका-यांमार्फत निश्चित केलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे उभारलेल्या जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ.वर नियमीत कारवाई करण्यांत येते. त्यावर उपआयुकत (जाहिरात) यांचे नियंत्रण आहे.

यासर्व बाबी करीत असताना महानगरपालिका क्षेत्रात विविध राजकीय पक्ष, राजकीय कार्यकर्ते, शैक्षणीक संस्था व वैयक्तीक स्वरुपात विविध ठिकाणी छोट्या मोठया प्रमाणात बोर्ड बॅनर उभारले जातात त्यापैकी परवानगी घेतलेल्या असल्या तरी परवानगी नंतरही जाहिरात प्रसिध्द होत असते. यावर प्रभाग कार्यालयामार्फत नियमीत कारवाई करण्यांत येते परंतु अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने ब-याच ठिकाणी छोट्या मोठया जाहिराती काढण्याचे राहून जाते त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असते. यासर्व बाबींचा विचार करता यापूढे कोणत्याही प्रकारची पोस्टर्स/बॅनर इ. प्रसिध्द करण्यास मज्जाव केल्यास यासर्व विद्रुपीकरणास चाप बसु शकेल.

ज्याठिकाणी महानगरपालिकेने २४६ होर्डिंग उभारण्यास परवानगी देण्यांत आली होती. त्यापैकी १४८ होर्डिंगचा ठेका कालावधी चालु आहे. उर्वरीत ९८ होर्डिंगचा ठेक्याचा कालावधी संपला असुन निविदा प्रक्रीया प्रस्तावित आहे अशा एकुण २४६ होर्डिंग महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर आहेत तसेच बी.ओ.टी. तत्वावर

२१ कॅन्टीलीवर यांची उभारणी केली असुन करारनाम्यानुसार संबंधितांना १५ वर्षांकरीता असुन प्रत्येक वर्षी परवानगी देण्यांत येते. तसेच मे.जी.सी.सी. क्लब यांनी ४ होर्डिंग उभारलेल्या आहेत. (अशा एकुण महानगरपालिकेच्या जागेवर २७१ होर्डिंग आहेत) या व्यतीरीक्त शहरात खाजगी जागांवर ८२ होर्डिंग उभारणेस परवानगी देण्यांत आलेली आहे. (एकुण एकत्रीत ३५३ ठिकाण)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फक्त अधिकृत होर्डिंगवर जाहिरात होणे आवश्यक असुन त्यासाठी सार्वजनिक जागांवर होर्डिंग व रस्त्याच्या दुभाजकांच्या ठिकाणी कॅन्टीलीवर महानगरपालिकेमार्फत उभारल्यास महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर कायमस्वरुपी उत्पन्न मिळु शकेल. सदर होर्डिंग या टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेमार्फत शासन अनुदानातुन व महानगरपालिका निधितुन बांधता येतील. महानगरपालिकेच्या स्वत:च्या होर्डिंग बांधेपर्यंत कंत्राट पध्दतीने दिलेल्या होर्डिंगवरील जाहिराती सुरु ठेवण्यांत येतील व तद्नंतर टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेच्या स्थायी होर्डिंग/कमानी/कॅन्टीलीवर इ. एम.एस.स्ट्रक्चरवर तयार करुन सदर कंत्राट रद्द करण्यांत येईल. यासाठी आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी. महानगरपालिकेमार्फत टप्प्याटप्प्याने सर्व ठिकाणी होर्डिंग उभारणेकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत आवश्यक प्रक्रिया करावी.

संपूर्ण शहरात विविध प्रकारचे तसेच विविध आकारमानाचे जाहिराती अस्ताव्यस्तपणे खांबावर, झाडांवर व इतरस्त्र लटकवलेल्या स्थितीत असतात त्यामुळे शहर विद्रुप दिसत असल्याने त्यावर कारवाई करताना अपु-या मनुष्यबळामुळे विलंब होतो. त्यामुळे यापूढे अधिकृत स्थायी होर्डिंग/कमानी/कॅन्टीलीवर इ. (एम.एस.स्ट्रक्चरवरील) व्यतीरीक्त कोणत्याही ठिकाणी जाहिरातीसाठी परवानगी देण्यांत येऊ नये तसेच शहरात कोणत्याही जागेवर तात्पुरत्या स्वरुपाचे बॅनर/बोर्ड/फलक/कमानी/फ्लॅक्स इत्यादींना परवानगी देण्यांत येऊ नये व अनधिकृतपणे जाहिरातीं करणा-यांवर कायदेशिर कारवाई करण्यांत यावी. यापुढे मा. आयुक्त यांनी खाजगी ठेकेदार नेमून दि.०१/१०/२०१८ पासून अनधिकृतपणे जाहिराती निष्कासीत करण्याची कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :-
श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :-
श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यांत आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०५/०९/२०१८

(दि. ०४/०९/२०१८ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ७०:- अग्निशमन विभागाच्या बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर रुजू करुन घेणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ७१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात सन २००९ मध्ये भरती करीता वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देवून रितसर मुलाखती घेवून व त्यांची मिरा भाईंदर महापालिकेच्या निवड समिती मार्फत लेखी, तोंडी व ग्राऊंड इ. चाचणी घेवून गुणानुक्रमे उमेदवारी निश्चित करण्यात आल्या होत्या. निवड झालेल्या कर्मचाऱ्यांची फायरमन, यंत्रचालक, लिडींग फायरमन या पदावर त्यांच्या नेमणूका करण्यात आल्या. तद्नंतर सदर कर्मचाऱ्यांनी ज्या संस्थेमार्फत अग्निशमन प्रशिक्षण घेतले त्या संस्थेस एमएसबीटीई ची मान्यता नसल्याचे लक्षात आल्याने त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून दि.०८/१२/२०११ रोजी बडतर्फ करण्यात आले होते. कर्मचाऱ्यांनी सदर आदेशास औद्योगिक न्यायालयात आव्हान दिले होते. दि.२५/०५/२०१७ रोजी मा. औद्योगिक न्यायालयाने सदर कर्मचाऱ्यांचा इंटरीम रिलीफ (Interim relief) नामंजुर केल्याने त्यांना दि.०५/०६/२०१७ रोजी सेवा समाप्तीचे आदेश देण्यात आले होते.

सदर बडतर्फी कार्यवाही विरोधात सदर कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे धाव घेतली असता मा. उच्च न्यायालय दिलेल्या परवानगी नुसार महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९५६ अन्वये मा. स्थायी समितीकडे अपिल अर्ज दाखल करता येईल असे निर्देश दिले होते. त्यानुसार १) श्री. विठठल भाबल, २) श्री. सचिन टेळे, ३) श्री. विष्णु कवटे, ४) श्री. प्रशांत निरभवणे, ५) श्री. पॅरेल बोर्जिस, ६) श्री. सतिश गांगुर्डे, ७) श्री. विनायक पाटील, ८) श्री. महादेव नाईक, ९) श्री. मलगौंडा नागोडा, १०) श्री. संतोष संखेश्वरी, ११) श्री. शिवाजी सावंत, १२) श्री. हमीद पाटील, १३) श्री.भिमाप्पा दावणे १४) श्री. युवराज गोडे या कर्मचाऱ्यांनी स्थायी समिती पुढे अपिल दाखल केले व स्थायी समिती दि.१४/०६/२०१७ प्रकरण क्र.३२ ठराव क्र.३४ नुसार सेवा समाप्तीचे व बडतर्फीचे आदेश रद्द केले व एक वर्षाच्या मुदतीत अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण करुन घेण्यात यावे असा आदेश पारित केला.

तसेच १)श्री.डॉसन ढोल्या- दावा क्र.११२८१/२०१७, २)श्री.अल्पेश संख्ये- दावा क्र ११३००/२०१७, ३)श्री.सदानंद विष्णू- दावा क्र ११३०२/२०१७, या तिघांची देखील शैक्षणिक पात्रता योग्य नसल्यामुळे प्रशासनाने त्यांना दि.२०/०९/२०११ ने कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्या आदेशाच्या विरोधात हे उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. सदर दाव्यात दि.०४/०६/२०१८ रोजी इंटरिम रिलीफ (Interim relief) मा. उच्च न्यायालयाने मान्य करुन त्यांना सेवेत पुन्हा घेणेबाबत आदेश पारित केलेले आहेत.

वरील एकूण १७ कर्मचा-यांची नियुक्ती करणेपुर्वी महापालिकेने जाहीर प्रसिध्दी देऊन अर्ज मागविले होते. त्या जाहिरातीमध्ये दिलेली शैक्षणिक पात्रता मुलाखातीच्या वेळी त्यांनी धारण केली होती, म्हणून त्यांची त्या वेळी निवड केली होती. तसेच कोणतेही प्रशिक्षण एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे असते त्या कोर्सला राज्य शासनाची मान्यता लागते याचाच अर्थ एक वर्षापेक्षा कमी असलेल्या कोर्सला राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही अशी आमची धारणा आहे.

तरी वरील सर्व कर्मचा-यांचा महापालिकेत केलेल्या सात वर्ष सेवेचा अनुभव तसेच त्यांच्या वाढत्या वयाचा व भविष्याचा विचार करता नवीन कर्मचारी भरती केल्यास त्यांनाही कामाचा अनुभव नसणार व त्यांनाही प्रशिक्षण देणेबाबत लागणारा कालावधी यामुळे अग्निशमन विभागात कर्मचा-यांच्या कमतरतेमुळे होणारी गैरसोय व वाढत्या लागणाऱ्या आगीचा व आपत्तीचा विचार करता वरील सर्व १७ कर्मचा-यांना दोन्ही प्रकरणी न्यायालयात तडजोड करुन मा.स्थायी समिती यांचे निर्णयानुसार सदर कर्मचाऱ्यांचा सेवासमाप्ती व बडतर्फीचा आदेश रद्द करुन त्यांची सेवा नियमित करण्यात यावी तसेच त्यांना तीन महिन्याच्या पुरस्कृत अग्निशमन प्रशिक्षणास पाठविण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. सिमा शाह **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

अ.क्र.	ठरावाच्या बाजूने	अ.क्र.	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१	मेहता डिंपल विनोद	१	ओईर राजू यशवंत	
२	वैती चंद्रकांत सिताराम	२	आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र	
३	पाटील ध्रुवकिशोर मन्साराम	३	पाटील प्रविण मोरेश्वर	

४	गेहलोत हसमुख मोहनलाल	४	ढवण निलम हरिश्चंद्र	निरंक
५	पाटील प्रभात प्रकाश	५	नलावडे दिनेश दगडु	
६	सिंह मदन उदितनारायण	६	शिर्के अनंत गेणू	
७	यादव मिरादेवी रामलाल	७	शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम	
८	शाह रिटा सुभाष	८	मेहरा राजीव ओमप्रकाश	
९	गोहिल शानू जोरावर सिंह	९	सावंत अनिल दिवाकर	
१०	भोईर सुनिता शशिकांत	१०	इनामदार जुबेर अब्दुल्ला	
११	पाटील वंदना मंगेश	११	पाटील जयंतीलाल गुरुनाथ	
१२	सोंस निला बर्नाड	१२	पाटील अनिता जयवंत	
१३	रावल मेघना दिपक	१३	पांडे स्नेहा शैलेश	
१४	मोकाशी दिपाली आनंदराव	१४	भट दिप्ती शेखर	
१५	जैन सुनिता रमेश	१५	भोईर भावना राजू	
१६	अरोरा दीपिका पंकज	१६	शेख रुबीना फिरोझ	
१७	नाईक विविता विवेक	१७	सपार उमा विश्वनाथ	
१८	भावसार वंदना संजय	१८	परदेशी गिता हरीश	
१९	बेलानी हेमा राजेश	१९	पाटील नरेश तुकाराम	
२०	भोईर विणा सुर्यकांत	२०	पाटील वंदना विकास	
२१	सोनार सुरेखा प्रकाश	२१	अहमद साराह अकरम	
२२	शिंदे रुपाली वसंत (मोदी)	२२	बगाजी शर्मिला विन्सन्ट	
२३	म्हात्रे सचिन केसरीनाथ			
२४	म्हात्रे परशुराम पदमाकर			
२५	शाह राकेश रतिशचंद्र			
२६	भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)			
२७	शाह सीमाबेन कमलेश			
२८	रकवी वैशाली गजेंद्र			
२९	कांगणे मीना यशवंत			
३०	दळवी प्रशांत ज्ञानदेव			
३१	म्हात्रे नयना गजानन			
३२	भोईर जयेश भानुदास			
३३	शेट्टी गणेश गोपाळ			
३४	थेराडे संजय अनंत			
३५	विराणी अनिल रावजीभाई			
३६	जैन दिनेश तेजराज			
३७	गजरे दौलत तुकाराम			
३८	मांजरेकर आनंद दत्ताराम			
३९	कासोदारिया अश्विन शामजीभाई			
४०	व्यास रवि वासुदेव			
४१	खंडेलवाल सुरेश जगदीश			
४२	पांडेय पंकज सूर्यमणि			
४३	भोईर गणेश गजानन			

ठराव बहुमताने मंजूर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.05/09/2018

(तहकुब सभा दि.04/09/2018)

प्रकरण क्र.७० :- अग्निशमन विभागाच्या बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर रुजू करुन घेणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात सन २००९ मध्ये भरती करीता वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देवून रितसर मुलाखती घेवून व त्यांची मिरा भाईंदर महापालिकेच्या निवड समिती मार्फत लेखी, तोंडी व ग्राऊंड इ. चाचणी घेवून गुणानुक्रमे उमेदवारी निश्चित करण्यात आल्या होत्या. निवड झालेल्या कर्मचाऱ्यांची फायरमन, यंत्रचालक, लिडींग फायरमन या पदावर त्यांच्या नेमणूका करण्यात आल्या. तद्नंतर सदर कर्मचाऱ्यांनी ज्या संस्थेमार्फत अग्निशमन प्रशिक्षण घेतले त्या संस्थेस एमएसबीटीई ची मान्यता नसल्याचे लक्षात आल्याने त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून दि.०८/१२/२०११ रोजी बडतर्फ करण्यात आले होते. कर्मचाऱ्यांनी सदर आदेशास औद्योगिक न्यायालयात आव्हान दिले होते. दि.२५/०५/२०१७ रोजी मा. औद्योगिक न्यायालयाने सदर कर्मचाऱ्यांचा इंटरीम रिलीफ (Interim relief) नामंजुर केल्याने त्यांना दि.०५/०६/२०१७ रोजी सेवा समाप्तीचे आदेश देण्यात आले होते.

सदर बडतर्फी कार्यवाही विरोधात सदर कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे धाव घेतली असता मा. उच्च न्यायालय दिलेल्या परवानगी नुसार **महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९५६ अन्वये** मा. स्थायी समितीकडे अपिल अर्ज दाखल करता येईल असे निर्देश दिले होते. त्यानुसार १) **श्री. विठठल भाबल**, २) **श्री. सचिन टेळे**, ३) **श्री. विष्णु कंवटे**, ४) **श्री. प्रशांत निरभवणे**, ५) **श्री. पॅरेल बोर्जिस**, ६) **श्री. सतिश गांगुर्डे**, ७) **श्री. विनायक पाटील**, ८) **श्री. महादेव नाईक**, ९) **श्री. मलगौंडा नागोडा**, १०) **श्री. संतोष संखेश्वरी**, ११) **श्री. शिवाजी सावंत**, १२) **श्री. हमीद पाटील**, १३) **श्री.भिमाप्पा दावणे** १४) **श्री. युवराज गोडे** या कर्मचाऱ्यांनी स्थायी समिती पुढे अपिल दाखल केले व स्थायी समिती दि.१४/०६/२०१७ प्रकरण क्र.३२ ठराव क्र.३४ नुसार सेवा समाप्तीचे व बडतर्फीचे आदेश रद्द केले व एक वर्षाच्या मुदतीत अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण करुन घेण्यात यावे असा आदेश पारित केला.

तसेच १)**श्री.डॉसन ढोल्या- दावा क्र.**११२८१/२०१७, २)**श्री.अल्पेश संख्ये- दावा क्र** ११३००/२०१७, ३)**श्री.सदानंद विष्णू- दावा क्र** ११३०२/२०१७, या तिघांची देखील शैक्षणिक पात्रता योग्य नसल्यामुळे प्रशासनाने त्यांना दि.२०/०९/२०११ ने कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्या आदेशाच्या विरोधात हे उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. सदर दाव्यात दि.०४/०६/२०१८ रोजी इंटरिम रिलीफ (Interim relief) मा. उच्च न्यायालयाने मान्य करुन त्यांना सेवेत पुन्हा घेणेबाबत आदेश पारित केलेले आहेत.

वरील एकूण १७ कर्मचा-यांची नियुक्ती करणेपुर्वी महापालिकेने जाहीर प्रसिध्दी देऊन अर्ज मागविले होते. त्या जाहिरातीमध्ये दिलेली शैक्षणिक पात्रता मुलाखातीच्या वेळी त्यांनी धारण केली होती, म्हणून त्यांची त्या वेळी निवड केली होती. तसेच कोणतेही प्रशिक्षण एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे असते त्या कोर्सला राज्य शासनाची मान्यता लागते याचाच अर्थ एक वर्षापेक्षा कमी असलेल्या कोर्सला राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही अशी आमची धारणा आहे.

तरी वरील सर्व कर्मचा-यांचा महापालिकेत केलेल्या सात वर्ष सेवेचा अनुभव तसेच त्यांच्या वाढत्या वयाचा व भविष्याचा विचार करता नवीन कर्मचारी भरती केल्यास त्यांनाही कामाचा अनुभव नसणार व त्यांनाही प्रशिक्षण देणेबाबत लागणारा कालावधी यामुळे अग्निशमन विभागात कर्मचा-यांच्या कमतरतेमुळे होणारी गैरसोय व वाढत्या लागणाऱ्या आगीचा व आपत्तीचा विचार करता वरील सर्व १७ कर्मचा-यांना दोन्ही प्रकरणी न्यायालयात तडजोड करुन **मा.स्थायी समिती** यांचे निर्णयानुसार सदर कर्मचाऱ्यांचा सेवासमाप्ती व बडतर्फीचा आदेश रद्द करुन त्यांची सेवा नियमित करण्यात यावी तसेच त्यांना **तीन महिन्याच्या पुरस्कृत अग्निशमन प्रशिक्षणास** पाठविण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सूचक :- Seema Shah
श्रीम. सिमा शाह

अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. ०४/०९/२०१८ तहकुब महासभा दि. ०५/०९/२०१८

प्रकरण क्र (७०) :

अग्निशमन विभागाच्या बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर रुजु करुन घेणेबाबत विचारविनीमय करुन निर्णय घेणे.

ठराव :

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि.०४/०९/२०१८ तहकुब महासभा दि.०५/०९/२०१८ प्रकरण क्र. (७०) अग्निशमन विभागाच्या बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर रुजु करुन घेणेबाबत विचारविनीमय करुन निर्णय घेण्याचा विषयपत्रीकेवर प्रस्तावीत केले आहे. परंतु प्रशासनाने सदर विषयी बाबतचा गोषवारा दिलेला नाही. त्याअर्थी प्रशासनाची भुमीका या विषयावर स्पष्ट होत नाही. २५६२ विषय निर्णय प्रशासनाला घ्यायचा असल्यास.

~~तरी सदरचा विषय प्रशासनाचा गोषवारा नसल्याचे अभावी फेटाळण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.~~ आयुक्त मिरा भाईंदर यांचे आपल्या २५२१७२. निर्णय घ्यावे. असा मी ठराव मांडत आहे

सुचक :

अनुमोदक :

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ५ / ९ /२०१८, प्रकरण क्र. ७० , श्री/. मिरा रोड ----------यांच्या ठरावाच्या

बाजुने / विरोधात / तटस्थ मतदान केलेल्या सदस्यांची यादी

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
१	१२ ब	मेहता डिंपल विनोद			
२	१३ ड	वैती चंद्रकांत सिताराम			
३	२ अ	पाटील रोहिदास शंकर			
४	६ अ	पाटील ध्रुवकिशोर मन्साराम			
५	१२ ड	गेहलोत हसमुख मोहनलाल			
६	६ ब	जैन गीता भरत			
७	४ ब	पाटील प्रभात प्रकाश			
८	७ अ	सॅंड्रीकस मोरस जोसेफ			
९	२ ड	सिंह मदन उदितनारायण			
१०	२३ क	भानुशाली वर्षा गिरधर			
११	१४ ड	यादव मिरादेवी रामलाल			
१२	१ ब	शाह रिटा सुभाष			
१३	१४ अ	हसवाळे ज्योत्सना जावींदर			
१४	२ ब	गोहिल शानू जोरावर सिंह			
१५	१२ अ	डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश			
१६	१ अ	भोईर सुनिता शशिकांत			
१७	५ अ	पाटील वंदना मंगेश			
१८	१८ क	सोंस नीला बर्नाड			
१९	५ ब	रावल मेघना दिपक			
२०	७ क	मोकाशी दिपाली आनंदराव			
२१	६ क	जैन सुनिता रमेश			
२२	१७ ब	अरोरा दीपिका पंकज			
२३	१८ ब	नाईक विविता विवेक			
२४	२१ अ	भावसार वंदना संजय			
२५	१७ क	बेलानी हेमा राजेश			
२६	१५ क	भोईर विणा सुर्यकांत			
२७	१५ ब	सोनार सुरेखा प्रकाश			
२८	१३ क	मुखर्जी अनिता बबलू			
२९	१३ अ	शिंदे रुपाली वसंत (मोदी)			
३०	१४ क	म्हात्रे सचिन केसरीनाथ			
३१	१६ ब	म्हात्रे परशुराम पदमाकर			
३२	१५ अ	म्हात्रे मोहन गोपाळ			
३३	५ क	शाह राकेश रतिशचंद्र			
३४	१२ क	शेट्टी अरविंद आनंद			
३५	५ ड	सिंग श्रीप्रकाश जिलेदार (गुल्लासिंग)			
३६	१ क	तिवारी अशोक सुर्यदेव			
३७	८ क	अग्रवाल सुशील गोपीकिशन			
३८	७ ब	भूमाणी रक्षा सतीश (शाह)			
३९	२१ ब	शाह सीमाबेन कमलेश			
४०	८ ब	रकवी वैशाली गजेंद्र			
४१	२ क	कांगणे मीना यशवंत			

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
४२	२० अ	परमार हेतल रतिलाल			
४३	१७ ड	दळवी प्रशांत ज्ञानदेव			
४४	२३ ड	म्हात्रे विनोद काशिनाथ			
४५	२३ ब	म्हात्रे नयना गजानन			
४६	२३ अ	भोईर जयेश भानुदास			
४७	३ अ	शेट्टी गणेश गोपाळ			
४८	१३ ब	थेराडे संजय अनंत			
४९	१८ ड	राय विजयकुमार सिस्थन नारायण			
५०	६ ड	जैन सर्जेंद्र भवरलाल			
५१	२१ ड	बिसणी अनिल रावजीभाई			
५२	२० ड	जैन दिनेश तेजराज			
५३	१८ अ	गजरे दौलत तुकाराम			
५४	१७ अ	मांजरेकर आनंद दत्ताराम			
५५	२० क	कासोदारिया अश्विन शामजीभाई			
५६	२१ क	दुबे मनोज रामनारायण			
५७	७ ड	व्यास रवि वासुदेव			
५८	८ ड	खंडेलवाल सुरेश जगदीश			
५९	१ ड	पांडेय पंकज सूर्यमणि			
६०	४ अ	भोईर गणेश गजानन			
६१	१४ ब	पारधी सुजाता यशवंत			

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. / /२०१८, प्रकरण क्र. , श्री. ----------यांच्या

ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ मतदान केलेल्या सदस्यांची यादी

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
१	१६ ड	भोईर राजू यशवंत			
२	१० ड	आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र			
३	११ ड	पाटील प्रविण मोरेश्वर			
४	३ ब	ढवण निलम हरीश्चंद्र			
५	८ अ	परेरा कॅटलीन एन्थोनी			
६	३ ड	नलावडे दिनेश दगडु			
७	११ अ	शिर्के अनंत गेणू			
८	२२ ड	शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम			
९	१९ ड	मेहरा राजीव ओमप्रकाश			
१०	१९ क	सावंत अनिल दिवाकर			
११	२२ क	इनामदार जुबेर अब्दुल्ला			
१२	१० अ	पाटील जयंतीलाल गुरूनाथ			
१३	१० ब	घरत तारा विनायक			
१४	३ क	कदम अर्चना अरुण			
१५	१६ अ	पाटील अनिता जयवंत			
१६	१० क	पांडे स्नेहा शैलेश			
१७	२४ अ	गोविंद हेलन जॉर्जी			
१८	२० ब	भट दीप्ती शेखर			
१९	४ क	गुप्ता कुसुम संतोष			
२०	१६ क	भोईर भावना राजू			
२१	४ ड	पाटील धनेश परशुराम			
२२	१९ अ	शेख रुबीना फिरोझ			
२३	१९ ब	डिसा मर्लिन मर्विन			
२४	२२ अ	सपार उमा विश्वनाथ			
२५	९ अ	परदेशी गिता हरीश			
२६	९ क	सय्यद नुरजहाँ नाझर हुसेन (मम्मी)			
२७	९ ब	पाटील नरेश तुकाराम			
२८	९ ड	शेख अमजद गफार			
२९	११ ब	पाटील वंदना विकास			
३०	११ क	पाटील संध्या प्रफुल्ल			
३१	१५ ड	भोईर कमलेश यशवंत			
३२	२२ ब	अहमद साराह अकरम			
३३	२४ ब	बगाजी शर्मिला विन्सन्ट			
३४	२४ क	बांड्या एलायस दुमिंग			

सुचक श्री./श्रीम. सिमा शाह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४३ विरोधात २२ तटस्थ 0 इतकी मते पडलेली आहेत. श्री./श्रीम. सिमा शाह यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.०५/०९/२०१८

(तहकुब सभा दि.०४/०९/२०१८)

प्रकरण क्रमांक (६७) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत.

ठराव क्रमांक. (६८) :-

मिरा भाईंदर शहरात एल.ई.डी. दिवे लावणेबाबत प्रस्तावावर मा. पदाधिकारी, मा. आयुक्त, गटनेते यांची बैठक आयोजित करून त्या बैठकीमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीचे अधिकारी, EESL कंपनीचे अधिकारी व इतर इच्छुक कंपन्याचे अधिकारी यांची महापौरांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करून समितीच्या निर्णयानूसार पुढील सर्व कार्यवाहीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

Naik.

सुचक :- श्रीम. विनीता नाईक

Bhavsar

अनुमोदक :- श्रीम. वंदना भावसार

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

Mehta

पिठासन अधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.०५/०९/२०१८

(तहकुब सभा दि.०४/०९/२०१८)

प्रकरण क्रमांक (६७) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत.

ठराव क्रमांक. (६८) :-

मिरा भाईंदर शहरात एल.ई.डी. दिवे लावणेबाबत प्रस्तावावर मा. पदाधिकारी, मा. आयुक्त, गटनेते यांची बैठक आयोजित करून त्या बैठकीमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीचे अधिकारी, EESL कंपनीचे अधिकारी व इतर इच्छुक कंपन्याचे अधिकारी यांची महापौरांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करून समितीच्या निर्णयानूसार पुढील सर्व कार्यवाहीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्रीम. विचीता नाईक

अनुमोदक :- श्रीम. वंदना भावसार

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

PC-3/DK/2018-19/MT -12

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.05/09/2018

(तहकुब सभा दि.04/09/2018)

बांधकाम विभाग

प्रकरण क्रमांक (६६) :- बी.एस.यु.पी.प्रकल्पातंर्गत जनतानगर येथील इमारत क्र.01 येथील गृहनिर्माण संस्थेस नाव देणेबाबत..

ठराव क्रमांक. (६७)

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जनतानगर येथे बी.एस.यु.पी. प्रकल्पाचे काम सुरु असून सदर प्रकल्पाची जे-3 पॅकेजमधील इमारत क्र.01 चे काम पुर्ण झालेले आहे. सदर इमारतीमध्ये 179 सदनिका व 21 दुकाने आहेत. सदर सदनिका मध्ये लाभार्थ्यांना स्थलांतरीत करण्यात आले आहे.

सदर इमारतीतील लाभार्थ्यांना गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करुन द्यावयाची आहे. तरी सदर गृहनिर्माण संस्थेस **जनता नगर इमारत क्र.01** असे नाव देण्यात यावे तसेच भविष्यात होणाऱ्या सर्व इमारतींना जनता नगर असे नाव देवून इमारत क्रमांक देण्यात यावे अशी ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- Raunale

श्रीमती ज्योत्स्ना एस.नाळे

अनुमोदक :- [illegible]

सौ. मिरादेवी [illegible]

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

Dmehta

पिठासन अधिकारी

PC-09/VP/DK/2018-19/MT -01

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ०५/०९/२०१८

(दि. ०४/०९/२०१८ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ५९ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मंजूर केलेली जैसलपार्क घोडबंदर रस्ता व भाईंदर उत्तन रस्ता यामधील टप्पा-२ कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविणेबाबत.

ठराव क्र. ६० :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत "विस्तारीत पायभुत सुविधा प्रकल्पांतर्गत" खालील रस्त्यांची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.

1) भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन गांव रस्त्याचे रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.
2) भाईंदर (पुर्व) जैसलपार्क ते घोडबंदर रस्ता तयार करणे.
3) भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते दहिसर (पश्चिम) जोडणारा लिंक रस्ता तयार करणे.

उपरोक्त रस्त्याच्या कामापैकी अ.क्र.1 व 2 मधील कामातील टप्पा-1 च्या कामाच्या निविदा प्राधिकरणामार्फत मंजुर केल्या आहेत, त्यापैकी घोडबंदर वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदरकडे जाणाऱ्या 60 मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरु देखील करण्यात आलेले आहे. उपरोक्त नमुद अ.क्र.1 व 2 मधील प्राधिकरणाने टप्पा-2 मध्ये खालील कामे केलेली आहेत.

1) राई गांव ते उत्तन रस्ता रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.
2) घोडबंदर गांव पाठीमागुन जैसलपार्क कडे येणारा 30 मीटर व 18 मीटर रुंदीचा रस्ता कॉक्रिटीकरणासह तयार करणे.

उपरोक्त कामांना सी.आर.झेड प्राधिकरणाच्या दृष्टीने मान्यता प्राप्त झालेली असुन वन विभागाची परवानगी घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. तद्नंतर सदर रस्त्याखालील जागा विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात घेता येणार आहे. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे दि.03/08/2018 रोजी झालेल्या बैठकीत तसेच सदर कामे करण्यासाठी प्राधिकरणामार्फत महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देऊन सदर कामाची पुढील सर्व अंमलबजावणी करण्यासंबंधी मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी मौखिक निवेदन केले होते. सदर कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत केल्यास रस्त्यातील मुर्धा ते उत्तन पर्यंत जिथे जुनी गावकऱ्यांची घरे रस्त्यामध्ये येत आहेत त्यांचेशी विचार विनीमय करुन त्यांना योग्य मोबदला दिल्यास सदर रस्त्यामधील अतिक्रमणे हटवून महापालिकेस मार्किंग करणे सोयीचे होईल. स्थानिक नागरीकांचे नुकसान होणार नाही व ते स्वखुशीने जागा देण्यास तयार होतील. सदर अतिक्रमणे हटवून व त्यांची पर्यायी व्यवस्था करुन सदर दुसऱ्या टप्प्याची कामे ही जलदगतीने होतील. तसेच भाईंदर उत्तन रस्ता टप्पा - 1 मधील कामाचे देखील प्राधिकरणाने कार्यादेश दिलेले नसल्याने व सदर कामातील अतिक्रमण, बांधकामे इ. मनपामार्फत काढण्याची कामे प्रचलित कार्यपध्दतीनुसार मनपाकडे काम सोपविल्यास सदर काम मनपामार्फत करता येईल.

तरी अ.क्र.01 च्या कामातील टप्पा-1 व टप्पा -2 तसेच अ.क्र.02 च्या कामातील टप्पा-2 या कामाची व अ.क्र.3 च्या कामाची अंमलबजावणी करण्याचे काम महानगरपालिकेस देण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- सौ. रुपाली वसंत शिंदे (मोदी) अनुमोदक :- श्री. संजय थेराडे

अ.क्र.	ठरावाच्या बाजूने	अ.क्र.	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१	मेहता डिंपल विनोद	१	भोईर राजू यशवंत	
२	वैती चंद्रकांत सिताराम	२	आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र	
३	पाटील रोहिदास शंकर	३	पाटील प्रविण मोरेश्वर	
४	पाटील धृवकिशोर मन्साराम	४	ढवण निलम हरिश्चंद्र	

५	गेहलोत हसमुख मोहनलाल	५	नलावडे दिनेश दगडु	निरंक
६	जैन गीता भरत	६	शिर्के अनंत गेंणू	
७	पाटील प्रभात प्रकाश	७	शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम	
८	सिंह मदन उदितनारायण	८	मेहरा राजीव ओमप्रकाश	
९	भानुशाली वर्षा गिरधर	९	सावंत अनिल दिवाकर	
१०	यादव मिरादेवी रामलाल	१०	इनामदार जुबेर अब्दुल्ला	
११	शाह रिटा सुभाष	११	पाटील जयंतीलाल गुरूनाथ	
१२	हसनाळे ज्योत्सना जालींदर	१२	पाटील अनिता जयवंत	
१३	गोहिल शानू जोरावर सिंह	१३	पांडे स्नेहा शैलेश	
१४	डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश	१४	गोविंद हेलन जॉर्जी	
१५	ओईर सुनिता शशिकांत	१५	भट दिप्ती शेखर	
१६	पाटील वंदना मंगेश	१६	गुप्ता कुसुम संतोष	
१७	रावल मेघना दिपक	१७	ओईर भावना राजू	
१८	जैन सुनिता रमेश	१८	शेख रुबीना फिरोझ	
१९	अरोरा दीपिका पंकज	१९	सपार उमा विश्वनाथ	
२०	नाईक विविता विवेक	२०	परदेशी गिता हरीश	
२१	भावसार वंदना संजय	२१	पाटील नरेश तुकाराम	
२२	बेलानी हेमा राजेश	२२	शेख अमजद गफार	
२३	ओईर विणा सुर्यकांत	२३	पाटील वंदना विकास	
२४	सोनार सुरेखा प्रकाश	२४	पाटील संध्या प्रफुल्ल	
२५	मुखर्जी अनिता बबलू	२५	अहमद साराह अकरम	
२६	शिंदे रुपाली वसंत (मोदी)	२६	बगाजी शर्मिला विन्सन्ट	
२७	म्हात्रे सचिन केसरीनाथ			
२८	म्हात्रे परशुराम पदमाकर			
२९	शाह राकेश रतिशचंद्र			
३०	सिंग श्रीप्रकाश जिलेदार			
३१	तिवारी अशोक सूर्यदेव			
३२	अग्रवाल सुशील गोपीकिशन			
३३	भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)			
३४	शाह सीमाबेन कमलेश			
३५	रकवी वैशाली गजेंद्र			
३६	कांगणे मीना यशवंत			
३७	परमार हेतल रतिलाल			
३८	दळवी प्रशांत ज्ञानदेव			
३९	म्हात्रे विनोद काशिनाथ			
४०	म्हात्रे नयना गजानन			
४१	ओईर जयेश भानुदास			
४२	शेट्टी गणेश गोपाळ			
४३	थेराडे संजय अनंत			
४४	जैन राजेंद्र भवरलाल			
४५	विराणी अनिल रावजीभाई			
४६	जैन दिनेश तेजराज			
४७	गजरे दौलत तुकाराम			
४८	मांजरेकर आनंद दत्ताराम			
४९	कासोदारिया अश्विन शामजीभाई			
५०	दुबे मनोज रामनारायण			

५१	व्यास रवि वासुदेव			
५२	खंडेलवाल सुरेश जगदीश			
५३	पांडेय पंकज सूर्यमणि			
५४	भोईर गणेश गजानन			
५५	पारधी सुजाता यशवंत			

ठराव बहुमताने मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.05/09/2018

(तहकुब सभा दि.04/09/2018)

प्रकरण क्रमांक (59) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मंजुर केलेली जैसलपार्क, घोडबंदर रस्ता व भाईंदर उत्तन रस्ता या मधील टप्पा-2 कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविणेबाबत.

ठराव क्रमांक ( ) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत "विस्तारीत पायभुत सुविधा प्रकल्पांतर्गत" खालील रस्त्यांची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.

1) भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन गांव रस्त्याचे रुंदीकरण व कॉंक्रिटीकरण करणे.
2) भाईंदर (पुर्व) जैसलपार्क ते घोडबंदर रस्ता तयार करणे.
3) भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते दहिसर (पश्चिम) जोडणारा लिंक रस्ता तयार करणे.

उपरोक्त रस्त्याच्या कामापैकी अ.क्र.1 व 2 मधील कामातील टप्पा-1 च्या कामाच्या निविदा प्राधिकरणामार्फत मंजुर केल्या आहेत, त्यापैकी घोडबंदर वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदरकडे जाणाऱ्या 60 मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरु देखील करण्यात आलेले आहे. उपरोक्त नमुद अ.क्र.1 व 2 मधील प्राधिकरणाने टप्पा-2 मध्ये खालील कामे केलेली आहेत.

1) राई गांव ते उत्तन रस्ता रुंदीकरण व कॉंक्रिटीकरण करणे.
2) घोडबंदर गांव पाठीमागुन जैसलपार्क कडे येणारा 30 मीटर व 18 मीटर रुंदीचा रस्ता कॉंक्रिटीकरणासह तयार करणे.

1) महानगरपालिका अधिकारितेच्या क्षेत्रांमधील पथ विक्रेते शोधून काढण्यासाठी सर्व्हेक्षण आयोजित करणे आणि तिच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये मानके, नियोजन आणि त्यांना धारण क्षमता यानुसार त्याच्या जागेची सुनिश्चिती करणे.
2) पथ विक्री प्रमाणपत्र देण्याकरीता ते पथ विक्री प्रमाणपत्र ज्या अटी व शर्तीच्या अधीनतेने देण्यात येते, त्या अटी व शर्तीचे तो पालन करीत असे वचन त्यांच्याकडुन घेतल्यानंतर पात्र पथ विक्रेत्यास, पथ विक्रीचे प्रमाणपत्र देण्यासाठी पथ विक्रेता समिती, अधिनियमाच्या कलम 38 च्या पोट-कलम (1) अन्वये तयार केलेल्या योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले निकष अनुसरील.
3) ज्या पथ विक्रेत्याने अधिनियमान्वये किंवा नियमांन्वये किंवा अधिनियामान्वये केलेल्या योजनेअन्वये, पथ विक्रीचे विनियमन करण्यासाठी विनिर्दिष्ठ केलेल्या, त्याच्या कोणत्याही शर्तीचा किंवा इतर कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केला असेल किंवा पथ विक्रीचे असे प्रमाणपत्र, पथ विक्रेत्यांने अपवेदन किंवा लबाडी करुन मिळवलेले आहे अशी नगर पथ विक्रेता समितीची खात्री पटली असेल तर, त्या पथ विक्रेत्याचे पथ विक्रीचे प्रमाणपत्र रद्द करणे किंवा निलंबित करणे.
   परंतु, नगर पथ विक्रेता समिती, पथ विक्रेत्याला कळविलेल्या लेखी आदेशामध्ये पथ विक्री प्रमाणपत्र रद्द किंवा निलंबित करण्याच्या कारणांचा विनिर्देश करील.

4) महानगरपालिकेच्या अधिकारतेमधील क्षेत्र हे पथ विक्री-मुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी, स्थानिक प्राधिकरणास शिफारस करणे.

5) विक्रीकरीता ठिकाणे आणि जागा निश्चित करणे.

6) सार्वजनिक जागांमध्ये गर्दी होणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी पथ विक्रीच्या वेळी विनियमित करणे.

7) पथ विक्रेत्यांकडून होणाऱ्या विरोधाविरुध्द सुधारात्मक यंत्रणेच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे.

8) तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (अध्यक्ष-मा. दिवाणी न्यायाधिश किंवा मा. न्यायदंडाधिकारी असलेली व्यक्ती व सदस्य म्हणुन दोन व्यवसायिक व्यक्ती) आणि स्थानिक प्राधिकरण यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विवादांच्या प्रकरणांचा पाठपुरावा करणे.

9) पथ विक्रेत्यांच्या व्यावसायिक प्रचालनासाठी योजना तयार करण्यासंबंधात स्थानिक प्राधिकरणाला शिफारशी सादर करणे.

10)समितीची कार्ये प्रभावीरीत्या पार पाडण्याची सुनिश्चित करण्यासाठी, समितीच्या बैठका घेणे व यथोचित निर्णय घेणे.

11)अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी पार पाडताना सहाय्य किंवा सल्ला मिळविण्याकरीता शासन किंवा तात्पुरत्या तत्त्वावर असलेल्या इतर अशासकीय संघटना यांच्याकडील तांत्रिक आणि व्यावसायिक व्यक्तीची मदत घेणे.

12)पथ विक्रेत्याला ज्या वेळी पथ विक्रीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे ती वेळ आणि अशा पथ विक्रीच्या प्रमाणपत्राचे केव्हा नूतनीकरण करण्यात यावे, ती वेळ आणि विहित कालमर्यादेत पार पाडावयाचे उपक्रम यांचा समावेश असलेली सनद किमान एका स्थानिक भाषेत हिंदी व इंग्रजीमधील नामांकित वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करणे आणि नगर पथ विक्रेता समितीच्या कार्यालयात आणि नागरी स्थानिक संस्थांच्या इतर कार्यालयांमध्ये, आवश्यकतेनुसार प्रदर्शित करणे.

13)नोंदणीकृत पथ विक्रेत्यांचा आणि अधिनियमाच्या तरतुदीनुसार ज्या कोणाला विक्रीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्यांच्या अद्ययावत नोंदी ठेवणे आणि असल्यास संकेतस्थळावर प्रसिध्द करणे.

14) अधिनियमाखाली किंवा नियमाखाली अथवा त्या अन्वये केलेल्या योजनेअन्वये केलेल्या कामकाजांचे सामाजिक लेखापरिक्षण करणे.

15)अधिनियमान्वये आणि या नियमान्वये विहित केलेली अशी विवरणे शासनास व स्थानिक प्राधिकरणास वेळोवेळी पुरविणे.

16)पथ विक्रेत्यांकरीता, पतपुरवठा करणे, विमा उपलब्ध करुन देणे आणि सामाजिक सुरक्षेच्या इतर कल्याणकारी योजना तयार करण्यासाठी प्रचालनात्मक उपाय हाती घेण्याकरीता शासनाकडे टिपणी सादर करणे.

17)अर्थव्यवस्थेमधील पथ विक्रेत्यांच्या भूमिकेसंबंधात जनतेमध्ये जाणीव जागृती करण्यासाठी शासनास सहाय्य करणे.

18)स्थानिक प्राधिकरणाद्वारे आणि शासनाद्वारे नगर पथ विक्रेता समितीला सोपविण्यात येतील अशी अधिनियमाच्या व या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी असतील अशी अधिनियमाच्या व या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी असतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

उक्त नमुद समितीच्या कार्यानुसार पथविक्रेते सर्व्हेक्षण तसेच पथविक्री मुक्त क्षेत्र घोषित करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणास शिफारस करणे ही जबाबदारी "नगरपथ विक्रेता समितीची" आहे. तसेच नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.बीएमसी-2516/प्र.क्र.1599/2016/नवि-21 दि.9 जानेवारी 2017 **प्रकरण 7.1, विक्री प्रक्षेत्रे निर्धारित करण्याची तत्वे-** नगरविक्री समिती या योजनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या कालावधीत विक्री प्रक्षेत्रे, रस्त्यावरील विक्रीसाठी निर्बंधित विक्री प्रक्षेत्रे आणि ना-विक्री प्रक्षेत्रे निश्चित करील आणि त्याचा तपशिल स्थानिक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर, संचालनालय नगरपरिषद यांच्या स्थानिक प्राधिकरणाकरीता असलेल्या संकेतस्थळावर, स्थानिक प्राधिकरणाच्या सुचना फलकावर तसेच स्थानिक भाषेतील वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करील असे शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत "शहरी पथविक्रेत्यांच्या अधिकारांचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्याचे नियमन 2010 च्या अनुषंगाने शासन निर्णय महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग राफेधो-2013/प्र.क्रं.39/नवि-20 दि..21 ऑक्टोबर 2013 अन्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 लागु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणेबाबत निर्देश प्राप्त आहेत.

तसेच मा. उच्च न्यायालय (Writ Petition No.652 of 2017) यांनी याचिकेवर दिलेल्या आदेशाप्रमाणे "शहर फेरीवाला समिती सदस्य् नियुक्ती करिता इच्छुक प्रतिनिधी कडुन अर्ज मागविण्याकरीता 6 आठवडयांची मुदत देण्यात आली होती.

मा. महासभा विषय क्रं.50 नुसार मा. महासभेसमोर फेरीवाला धोरण बाबत माहिती माहितीस्तव सादर करण्यात आली होती परंतु मा. महासभेने दि.08/12/2017 प्रकरण क्रं.50, ठराव क्रं.47 अन्वये फेरीवाला/ना फेरीवाला क्षेत्राचे पुर्नविलोकन करणे व धोरण ठरविणेबाबत मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली एकुण 6 सदस्य असणारी पदाधिकारी यांची समिती तयार करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	नावे	पद
1	महापौर	अध्यक्ष
2	उप-महापौर	सदस्य
3	स्थायी समिती सभापती	सदस्य
4	सभागृहनेते	सदस्य
5	विरोधी पक्षनेते	सदस्य
6	गटनेते	सदस्य

परंतु शासनाने "शहरी पथविक्रेत्यांच्या अधिकाराचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियमन 2014 च्या अनुषंगाने शासन निर्णय महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग राफेधो/2013/प्र.क्रं.39/नवि-24 दि.21 ऑक्टोबर 2013 अन्वये "राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009" लागु करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी मा. महासभा प्रकरण क्र.50, ठराव क्र.47 अन्वये तयार केलेली समिती व मा. महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेली समितीची रचना यामध्ये तफावत दिसून येत आहे. तरी सदस्य नेमणूकीबाबतची सद्यस्थिती तसेच सदर ठरावावर पुर्नविचाराकरीता व ठरावामध्ये शासनाचे धोरणानुसार योग्य बदल करणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव क्र. :-

मा. उच्च न्यायालय (Writ Petition No.652 of 2017) यांनी याचिकेवर दिलेल्या आदेशाप्रमाणे "शहर फेरीवाला समिती सदस्य् नियुक्ती करिता इच्छुक प्रतिनिधी कडुन अर्ज मागविण्याची माहिती प्रशासनाने कोणत्याही सदस्यांना व पदाधिका-यांना दिली नसल्याने सदस्यांना शहर फेरीवाला सदस्या समितीत सदस्याची नावे देणे माहिती नव्हते. प्रशासनाने पुन्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सर्व सन्मा.सदस्य व पदाधिका-यांना अवगत करुन इच्छुक प्रतिनिधीकडून अर्ज मागवुन नव्याने समिती गठीत करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- सुरेश खंडेलवाल

अनुमोदन :- श्री. विनोद म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. / /२०१८, प्रकरण क्र. , श्री. ----------यांच्या ठरावाच्या

बाजुने / विरोधात / तटस्थ मतदान केलेल्या सदस्यांची यादी

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
१	१२ ब	मेहता डिंपल विनोद			
२	१३ ड	वैती चंद्रकांत सिताराम			
~~३~~	~~२ अ~~	~~पाटील सेहिदास शंकर~~			
४	६ अ	पाटील धृवकिशोर मन्साराम			
५	१२ ड	गेहलोत हसमुख मोहनलाल			
६	६ ब	जैन गीता भरत			
७	४ ब	पाटील प्रभात प्रकाश			
~~८~~	~~७ अ~~	~~रॉड्रीकस मोरस जोसेफ~~			
९	२ ड	सिंह मदन उदितनारायण			
~~१०~~	~~२३ क~~	~~भानुशाली वर्षा भिस्कर~~			
११	१४ ड	यादव मिरादेवी रामलाल			
~~१२~~	~~१ ब~~	~~शाह रिटा सुभाष~~			
१३	१४ अ	हसनाळे ज्योत्सना जालींदर			
१४	२ ब	गोहिल शानू जोरावर सिंह			
१५	१२ अ	डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश			
१६	१ अ	भोईर सुनिता शशिकांत			
१७	५ अ	पाटील वंदना मंगेश			
~~१८~~	~~१८ क~~	~~सोंस नीला बर्नाड~~			
~~१९~~	~~५ ब~~	~~रावल मेघना दिपक~~			
२०	७ क	मोकाशी दिपाली आनंदराव			
२१	६ क	जैन सुनिता रमेश			
२२	१७ ब	अरोरा दीपिका पंकज			
२३	१८ ब	नाईक विविता विवेक			
२४	२१ अ	भावसार वंदना संजय			
२५	१७ क	बेलानी हेमा राजेश			
२६	१५ क	भोईर विणा सुर्यकांत			
२७	१५ ब	सोनार सुरेखा प्रकाश			
२८	१३ क	मुखर्जी अनिता बबलू			
२९	१३ अ	शिंदे रुपाली वसंत (मोदी)			
~~३०~~	~~१४ क~~	~~म्हात्रे सचिन केसरीनाथ~~			
३१	१६ ब	म्हात्रे परशुराम पदमाकर			
३२	१५ अ	म्हात्रे मोहन गोपाळ			
३३	५ क	शाह राकेश रतिशचंद्र			
३४	१२ क	शेट्टी अरविंद आनंद			
३५	५ ड	सिंग श्रीप्रकाश जिलेदार (मुन्नासिंग)			
३६	१ क	तिवारी अशोक सूर्यदेव			
३७	८ क	अग्रवाल सुशील गोपीकिशन			
३८	७ ब	भूताणी रक्षा सतीश (शाह)			
३९	२१ ब	शाह सीमाबेन कमलेश			
४०	८ ब	रकवी वैशाली गजेंद्र			
४१	२ क	कांगणे मीना यशवंत			

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
४२	२० अ	परमार हेतल रतिलाल			
४३	१७ ड	दळवी प्रशांत ज्ञानदेव			
४४	२३ ड	म्हात्रे विनोद काशिनाथ			
~~४५~~	~~२३ ब~~	~~म्हात्रे नयना गजानन~~			
४६	२३ अ	भोईर जयेश भानुदास			
४७	३ अ	शेट्टी गणेश गोपाळ			
४८	१३ ब	थेराडे संजय अनंत			
४९	१८ ड	राय विजयकुमार सिस्थन नारायण			
~~५०~~	~~६ ड~~	~~जैन सजेंद्र भवरलाल~~			
५१	२१ ड	विराणी अनिल रावजीभाई			
५२	२० ड	जैन दिनेश तेजराज			
५३	१८ अ	गजरे दौलत तुकाराम			
५४	१७ अ	मांजरेकर आनंद दत्ताराम			
५५	२० क	कासोदारिया अश्विन शामजीभाई			
५६	२१ क	दुबे मनोज रामनारायण			
~~५७~~	~~७ ड~~	~~व्यास रवि वासुदेव~~			
५८	८ ड	खंडेलवाल सुरेश जगदीश			
~~५९~~	~~१ ड~~	~~पांडेय पंकज सूर्यमणि~~			
~~६०~~	~~४ अ~~	~~भोईर मगेश गजानन~~			
६१	१४ ब	पारधी सुजाता यशवंत			

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २६/७/२०१८, प्रकरण क्र. ४८, श्री. सुरेश खेमवाल यांच्या

ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ मतदान केलेल्या सदस्यांची यादी

अ.क्र.	जागा क्रमांक	सदस्याचे नाव	बाजुने	विरोधात	तटस्थ
१	१६ ड	भोईर राजू यशवंत			
२	१० ड	आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र			
३	११ ड	पाटील प्रविण मोरेश्वर			
४	३ ब	ढवण निलम हरीचंद्र			
५	८ अ	परेरा कॅटलीन एन्थोनी			
६	३ ड	नलावडे दिनेश दगडु			
७	११ अ	शिर्के अनंत गेणू			
८	२२ ड	शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम			
९	१९ ड	मेहरा राजीव ओमप्रकाश			
१०	१९ क	सावंत अनिल दिवाकर			
११	२२ क	इनामदार जुबेर अब्दुल्ला			
१२	१० अ	पाटील जयंतीलाल गुरूनाथ			
१३	१० ब	घरत तारा विनायक			
१४	३ क	कदम अर्चना अरुण			
१५	१६ अ	पाटील अनिता जयवंत			
१६	१० क	पांडे रजेश शैलेश			
१७	२४ अ	गोविंद हेलन जॉर्जी			
१८	२० ब	भट दीप्ती शेखर			
१९	४ क	गुप्ता कुसुम संतोष			
२०	१६ क	भोईर भावना राजू			
२१	४ ड	पाटील धन्नेश परशुराम			
२२	१९ अ	शेख रुबीना फिरोझ			
२३	१९ ब	डिसा मर्लिन मर्विन			
२४	२२ अ	सपार उमा विश्वनाथ			
२५	९ अ	परदेशी गिता हरीश			
२६	९ क	सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन (मम्मी)			
२७	९ ब	पाटील नरेश तुकाराम			
२८	९ ड	शेख अमजद गफार			
२९	११ ब	पाटील वंदना विकास			
३०	११ क	पाटील संध्या प्रफुल्ल			
३१	१५ ड	भोईर कमलेश यशवंत			
३२	२२ ब	अहमद साराह अकरम			
३३	२४ ब	बगाजी शर्मिला विन्सन्ट			
३४	२४ क	बांड्या एलायस दुमिंग			

सुचक श्री./श्रीमती. सुरेश खडेलवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५० विरोधात २५ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री./श्रीमती. सुरेश खडेलवाल यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि.२६/०७/२०१८

प्रकरण क्र.४७ :- महापालिका औषध फवारणी करणेकरिता ठेकेदारामार्फत कर्मचारी घेणेबाबत.

ठराव क्र. :- ४७

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात डास नियंत्रणाखाली औषध, धुर फवारणी केली जाते. त्याकरीता ठेक्याने कर्मचारी घेतले जातात. सदरचे कर्मचारी ठेकेदाराच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे त्यांचेकडून नगरसेवकांच्या व नागरीकांच्या मागणी प्रमाणे औषध, धुर फवारणी केली जात नाही त्यामुळे वारंवार तक्रारी महापालिका प्रशासनास प्राप्त होत असतात या बाबींचा विचार करता प्रायोगिक तत्वावर यावर्षी सेवाभावी संस्थांकडून डास निर्मुलनाचे काम करुन घेण्याच्या दृष्टीने निविदा प्रक्रिया करण्यात यावी. त्यामध्ये सेवाभावी संस्थाना मानधन किंवा ठेका पध्दतीने कर्मचारी घेऊन औषध/धुर फवारणी करणेची कामे देण्यात यावीत व त्यामध्ये प्रत्येक वॉर्डामध्ये ४ कर्मचारी व ज्या प्रभागाचे भौगोलिक क्षेत्र मोठे आहे अशा प्रभागात आयुक्तांनी वाढीव कर्मचारी देण्यात यावे. ठेकेदाराकडुन फक्त मजुर उपलब्ध करुन घेवून त्यासाठी लागणारे आवश्यक यंत्र सामुग्री इ. महापालिकेने पुरवठा करावयाचा आहे. सदरचा ठेका ३ वर्षाकरीता द्यावयाचा आहे. त्याकरीता "आरोग्य साफसफाई" या लेखाशिर्षाखालून निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा. भविष्यात त्या लेखाशिर्षाखाली निधी कमी पडत असेल तर पुर्नविनीयोजन करुन निधी उपलब्ध करुन घ्यावा. याकरीता सुमारे ५ कोटी खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक : Mahesh

श्री० महेश सिंह

अनुमोदन : Seema Shah

श्रीमती सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचुन कायम करण्यात आला

Jmehta

पिठासन अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि. २६/०७/२०१८

प्रकरण क्र. ४६:- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये गोरगरीबांवर मोफत उपचार करणेबाबत.

ठराव क्र. ४६ :-

मिरा भाईंदर शहरातील रुग्णालय/दवाखाने, आरक्षणे विकसित करणेकरिता विकासकाला महानगरपालिकेने व राज्य शासनाने विकासकाला व संस्थाना अटीशर्ती टाकून बांधकाम परवानगी देताना कोणकोणत्या रुग्णालय/दवाखान्यात, संस्थाना व विकासकाला नागरीकांवर मोफत उपचार करणे तसेच कोणकोणत्या रुग्णालयामध्ये किती खाटा राखीव ठेवणे या अटीवर परवानगी दिलेली आहे. याबाबत सविस्तर माहिती घेवून प्रशासनाने पुढील मा. महासभेत सदरचा प्रस्ताव फेरसादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :-
डॉ. राजेंद्र जैन

अनुमोदन :-
श्री. जयेश भोईर

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. विशेष महासभा दि.26/07/2018

प्रकरण क्र. (45) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आजी माजी सैनिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणेबाबत.

ठराव क्र. (४५)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आजी-माजी सैनिक वास्तव्यास असून सदर सैनिकामार्फत त्यांच्या कार्यालयासाठी जागेची मागणी करण्यात आलेली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध भागात जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर महानगरपालिका क्षेत्रातील आजी-माजी सैनिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करुन त्यांच्या संस्थेस हस्तांतरीत केल्यास त्याचा लाभ त्यांना होऊन महानगरपालिकेस देखिल त्यांच्या अनुभवाचा प्रशासकीय कामकाजात फायदा होऊ शकेल. त्याकरीता त्यांना स्वामी विवेकानंद भवन, पुनम गार्डन येथील महापालिका इमारतीमधील तळ मजल्यावर जागा देण्यात यावी तसेच इंद्रलोक या भागात ज्येष्ठ नागरीकांनी वारंवार, प्रत्यक्ष भेटून व अर्जाद्वारे विरंगुळा केंद्रासाठी मागणी केलेली आहे. त्यांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.226 या ठिकाणी विरंगुळा केंद्र बांधून मा. स्थायी समितीची मान्यता घेवून त्या भागातील ज्येष्ठ नागरीकांच्या संस्थेला देण्यात यावी.

सदर कामाच्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात "जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणे" या लेखाशिर्षाखाली रु.150.00 लक्ष एवढी तरतुद आहे. तसेच पुढील सर्व प्रशासकीय कामकाज व आवश्यक निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :

श्री. अरविंद शेट्टी

अनुमोदक :

श्रीमती दिपीका अरोरा

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि. २६/०७/२०१८

बांधकाम विभाग

प्रकरण क्रमांक. (44) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या बी.एस.यु.पी. योजनेतील कामे प्रधानमंत्री आवास योजनेत घेऊन पुर्ण करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्रमांक. (४४)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या बी.एस.यु.पी. योजनेबाबत खालीलप्रमाणे विस्तृत माहिती सादर करण्यात आलेली आहे.

१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरींबांना मुलभूत सुविधा पुरविणे" (BSUP) या उपकार्यक्रम अंमलबजावणी बाबत महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग यांनी दि. २५ जून २००७ शासन निर्णय अन्वये सुचना निर्गमित केल्या आहेत.

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचना

सन २००१ च्या जनगणेनुसार देशात सुमारे २८५.३५ दशलक्ष म्हणजे देशाच्या एकुण लोकसंखेच्या २७.८ टक्के लोक शहरात राहात आहेत. स्वातंत्र्यानंतर देशाच्या लोकसंखेत तिप्पट वाढ झालेली असुन शहरी भागातील लोकसंखेत पांचपट वाढ करणा-या गरीब जनतेच्या लोकसंख्येत सुध्दा वाढ झालेली आहे. सन२००१ च्या जनगणेनुसार देशातील झोपडपट्टीवासीयांची एकुण लोकसंख्या ६१.८ दशलक्ष इतकी झालेली इतकी झालेली आहे.

शहरातील झोपड्पट्टीवासीयांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील मुलभुत सोयी व सुविधावर अतोनात ताण पडत आहे. यानुसार केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरींबांना मुलभूत सुविधा पुरविणे" (BSUP) या उपकार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

कार्यक्रमाची उदिष्ठ्ये

१) कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या सहरातील गरिब जनतेसाठी पुरविण्यात येणा-या मुलभुत सुविधाचा एकात्मीकत विकास करण्यावर लक्ष केंद्रीत करणे.

२) शिक्षण,आरोग्य,व सामाजिक सुरक्षा पुरविणे.

३) मालमत्तेची निर्मीती व मालमत्तेचे व्यवस्थापन.

४) आवश्यक तेवढ्या निधीची गुंतवणुक करणे.

५) नागरी सुविधा व सोयी पुरविणे.

कार्यक्रमाचा कालावधी.

सन.-२००५-२००६ पासुन ७ वर्ष.(प्रकल्पास मुदतवाढ ३१ मार्च २०१७)

निधी उपलब्धता

केंद्र शासनाचा वाटा एकुण प्रकल्प खर्चाच्या ५०%

मागासवर्गिय/ सर्वसाधारण १० ते १२ %

उर्वरीत राज्य शासन व स्थानीक स्वराज्य संस्था.

अंमलबजावणी रुपरेषा

दि.०१/०१/१९९५ च्या लाभार्थीना प्राधान्याने सहभागी करुन घेणे.

प्रस्तावाची अंमलबजावणी अ) निव्वळ पायाभुत सुविधा पुरविणे ब)गहनिर्माण प्रकल्प लाभार्थ्यांचे अंशदान वसुल करण्याची जबाबदारी स्थानीक स्वराज्य संस्थाची असेल.

निवासी झोपडीधारकांना किमान २६९ चा.फु. बांधकाम क्षेत्रफळाइतका (२२५ चा.फु.चटई क्षत्र) गाळा देण्यात येईल.

शासकीय जमिनीवरिल झोपड्याच्या जागेवर घरे बांधण्यासाठी अकषीक परवानगी आवश्यक नाही.

नोंदणी फी पुर्णपणे माफ करणे.

२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रकल्प राबविणेस मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्रदान केली.

३) त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे" हा उपक्रम हाती घेण्याचे ठरविले. महानगरपालिका क्षेत्रातील बहुताशः झोपडया या खाजगी जागेवर व सी.आर.झेड ने बाधीत असल्याने शासकीय जागेवर वसलेल्या जनतानगर व काशी चर्च या फक्त दोनच झोपडपट्टया अस्तित्वात होत्या. त्यामुळे सदर दोन झोपडपट्टयांची निवड सदर उपक्रमासाठी करण्यात आली.

४) मा. स्थायी समिती ठराव क्र. ११८ दि. १७/०२/२००९ नुसार दि.२६/०९/२००९ च्या कार्यादेशानुसार मे. पुनित आर्किटेक्ट, ठाणे यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक करण्यात आली. सदर सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन म्हाडा मार्फत केंद्रशासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. सदर प्रकल्प हा जिल्हाधिकारी यांच्या मालकिच्या जागेवर असल्याचे नमुद करुनच प्रकल्प सादर करण्यात आला होता.

सदर रु. २७९.५५ कोटी किंमतीच्या प्रकल्पास दि. ११/११/२००९ रोजी केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली. सदर योजनेचा मंजूर वित्तीय आकृती बंध खालील प्रमाणे होता.

अ.क्र.	तपशिल	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	मनपा हिस्सा	लाभार्थी हिस्सा	एकूण
१)	घराची किंमत	६५२१.५९ (५० %)	३९१२.९६ (३० %)	११७३.८८ (९%)	१४३४.७५ (११ %)	१३०४३.१८
२)	मुलभूत सुविधा	४९०८.४० (५०%)	रु.२४५४.१९ (२५ %)	२४५४.१९ (२५ %)	-	९८१६.७८
३)	संक्रमण शिबीर	-	१४८८.९६ (५० %)	१०६५.०८ (५० %)	-	५०९५.४४
४)	इतर	-	-	२५४१.४०	-	
	एकूण	११४२९.९९	७८५६.१२	७२३४.५६	१४३४.७५	२७९५५.४२

प्रकल्पाचे उपांगे खालील प्रमाणे आहे.

१	एकूण झोपडपट्टी	-	दोन (१) जनतानगर (२) काशीचर्च
२	लाभार्थ्यांची संख्या	-	४१३६ (१) जनतानगर ३६६५ (२) काशीचर्च ४७१
३	पुरविण्यात येणाऱ्या सदानिकेचे स्वरुप	-	सदनिका 1 BHK स्वरुपाची असूनत्यामध्ये Living in Room, Bedroom, Kitchen, W.C. Bath, Passage, Balcony. यांचा समावेश आहे
४	चटई क्षेत्र	-	२५ चौ.मी (२६९ चौ.फुट)/प्रति लाभार्थी

५ पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा

i. अंतर्गत रस्ते
ii. पाणीपुरवठा व मलनिःस्सारण
iii. पथदिवे
iv. बालवाडी (७)
v. समाजमंदिर (६)

६ घराच्या किंमती

प्रत्यक्ष घराची किंमत - रु. ३.४६ लक्ष प्रती घर

पायाभूत सुविधा किंमत - रु. ३.३० लक्ष प्रती घर

एकूण घराची किंमत (पायाभूत सुविधांसह) - रु. ६.७६ लक्ष प्रती घर

अ.क्र.	निधीचा स्त्रोत	केंद्र शासना प्रमाणे मंजूर निधी	प्राप्त निधी	
			दिनांक	रक्कम
१	केंद्र शासन	११,४२९.९९	नोव्हे.२०१०	२८५६.००
			जुले २०१५	११७०.०८
२	राज्य शासन	७,८५६.१२	एप्रिल २०११	१९६४.०३
			जुले २०१५	८०४.०३
३	मिरा भाईंदर मनपा	७,२३४.५६	-	-
४	लाभार्थी	१,४३४.७५	-	-
	एकूण	**२७,९५५.४२**		**६७९४.१४**

सदर योजनेकरीता केंद्र व राज्य शासनाकडून रू.६७.९४ कोटी एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. आजपावेतो रक्कम रू.७२.०८ कोटी एवढा खर्च महानगरपालिकेमार्फत पुढील प्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

प्राप्त अनुदान व झालेला खर्च

अ.क्र.	केंद्रशासन व राज्य शासन यांच्याकडून आलेला निधी	इमारत क्र.01 चे काम पुर्ण व त्यावरील झालेला खर्च	इमारत क्र.01 सोडून प्रकल्पावरील झालेला खर्च	एकुण खर्च
1	रु. 67.94 कोटी	रु.8.34 कोटी	रु.63.74 कोटी	रू. ७२.०८ कोटी

अंमलबजावणी यंत्रणा.

१)महानगरपालिका

सदर प्रकल्पासाठी महाराष्ट शासन, केंद्र शासन यांच्याशी समन्वय साधुन प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी) व पॅकेजनिहाय ठेकेदार यांच्याकडुन सदर प्रकल्पातील काम करुन घेणे,पाठपुरावा करणे व शासनास वेळोवेळी अहवाल पाठविणे.

२)प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार

सदर प्रकल्पासाठी मे. पुनीत आर्किटेक्ट यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आलेली असुन त्यांची खालीलप्रमाणे जबाबदारी आहे.

अ)सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक तयार करणे, राज्य व केंद्र शासनाची मान्यता घेणे.

ब)सविस्तर निविदा फॉर्म, कागदपत्र तयार करणे, सुपरव्हिजन करणे.

३)प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी)

सदर प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी तपासणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे. टेक्नो कंन्सल्टंट, नवी-मुंबई यांची विहीत कार्यवाही करून मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१३९, दि.२५/०२/२०१० च्या मंजुरीने दि. २६/०३/२०१० रोजीच्या कार्यादेशान्वये नेमणुक करण्यात आली आहे. त्यांची खालीलप्रमाणे जबाबदारी आहे.

अ)प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार

ब)प्रकल्प अंतर्गत तांत्रिक सल्ला देणे, कागदपत्र छाणणी, प्रकल्पाअंतर्गत तांत्रिक व इतर व्यवस्थापन करणे, सुपरव्हिजन करणे.

४)प्रकल्पातील कंत्राटदार

सदर कामाच्या निविदा मागवुन मा. स्थायी समिती सभा दि.०५/०८/२०१० ठराव क्र. ३६ अन्वये कंत्राटदार यांना खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात आले. प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याच्या उद्दीष्टाने प्रकल्पाचे काम चार पॅकेजमध्ये विभागून खालीलप्रमाणे देण्यात आले आहे.

(रुपये कोटीत)

पॅकेज	नेमलेला कंत्राटदार	निविदा किंमत (कोटीत)	सदनिका	कार्यादेश व दिनांक
जनता नगर जे १	मे. शायनो कार्पोरेशन - टोस्कॉनो इन्फ्रास्टक्चर प्रा.लि. (जे.व्ही)	१०६.७३	१३३६	दि.२८/१२/२०१०
जनता नगर जे २	मे. डिव्हीनिटी (जे.व्ही)	९३.३०	११५६	दि.२४/११/२०११
जनता नगर जे ३	मे.श्रीजी कन्ट्रक्शन व बिटकॉन इंडीया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हर्ल्पस प्रा.लि. (जे.व्ही)	९३.२८	११७३	दि.२७/१२/२०१०
काशीचर्च	मे. डी. के. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,सुमेर कार्पोरेशन, एस.व्ही. जिवानी, स्ट्रेक्रिट. लि. (जे.व्ही)	३७.२४	४७१	दि.२८/१२/२०१०

इतर विभागाची परवानगी

१) पर्यावरण विभाग

सदर प्रकल्पास पर्यावरणाच्या दृष्टीने पर्यावरण विभागाची आवश्यकता असल्याने सदर विभागाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करुन दि.२५/०१/२०११ रोजी मान्यता प्राप्त करून घेण्यात आली.सदर मान्यता ५ वर्षासाठी होती. पर्यावरण विभागाची वाढीव मान्यता प्राप्त नसल्याने प्रकल्पाचे काम सुरु ठेवता येणार नाही.

२) राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

सदर प्रकल्पास दि.२८/०७/२०१० च्या पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण परवानगी प्राप्त आहे.

३) जमीन विक्रीची परवानगी

सदर प्रकल्पामध्ये शासनाच्या निकषानुसार महानगरपालिकेस हिश्याची रक्कम रुपये ७२.३४ कोटी उभारावयाची होती. तसेच प्रकल्प वर्धनक्षम (Viable) होण्यासाठी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.टिपीएस ११०७/अनौ.३६/प्र.क्र.१३५/०८/नवि-५ दि. २४ डिसेंबर २००८ मधील तरतुदीनुसार २.५ चटईक्षेत्र निर्देशांक लागू करुन त्यातील २५ %चटईक्षेत्र विक्री घटकासाठी वापरुन अतिरिक्त निधीची उभारणी करण्यात येणार होती. त्यानुसार महानगरपालिकेच्या प्रस्तावास मा. मुख्य अभियंता म्हाडा यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक जा.क्र.२/उमुअ/ जेएनएनयु आरएम/६८९/१० दि.३०/०९/२०१० अन्वये मंजुरी दिलेली असून जमीन विक्रीची परवानगी दिलेली आहे.

शासनाची जबाबदारी

सदर प्रकल्पातील कामाचा पाठपुरावा करणे. स्थानिक स्वराज्य संस्थाना सदर प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देणे. सदर प्रकल्प कालमर्यादीत असल्यामुळे कामासाठी पाठपुरावा करणे. प्रकल्पातील कामाबाबत महाराष्ट शासन व केंद्रशासनास अहवाल देणे.

महानगरपालिकेची जबाबदारी

पॅकेजनिहाय ठेकेदार यांच्याकडुन सदर प्रकल्पातील इमारतीचे बांधकामाचे काम पुर्ण करुन घेणे,पाठपुरावा करणे व शासनास वेळोवेळी अहवाल पाठविणे.

कंत्राटदाराची जबाबदारी

निवीदा मंजुरी नुसार प्रकल्पातील पॅकेजनिहाय इमारतीचे काम पुर्ण करणे, प्रकल्पातील प्रत्यक्ष जागेवरील झोपड्या हटविणे, संक्रमण शिबीराचे बांधकाम करणे,लाभार्थीना संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत करणे, भाडेतत्वावरील लाभार्थीना भाडेचे धनादेश देऊन स्थलांतरीत करणे.

म्हाडाची भुमिका

महाराष्ट शासनाने बि.एस.यु.पी प्रकल्पासाठी म्हाडाची नोडल एजन्सी म्हणुन नियुक्ती केलेली आहे. सदर प्रकल्पातील कामाचा आढावा घेणे, निधी वितरण करणे व केंद्रशासनास प्रकल्पाच्या कामाचा अहवाल पाठविणे.

शासनाचे मार्गदर्शन

Cost Escalation

(गहनिर्माण विभागाचे दि.११/०६/२०१५ चे पत्र)

शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे या कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रकल्पात अनुज्ञेय नाही. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा व त्यासाठी महानगरपालिकेस कराव्या लागणा-या अतिरीक्त खर्चाची कोणतीही रक्कम बी.एस.यु.पी.कार्यक्रमातुन केंद्र व राज्यशासन देऊ शकणार नाही.

प्रकल्पास मुदतवाढ

(गहनिर्माण विभागाचे दि.१९/११/२०१६ चे पत्र)

केंद्र शासनाच्या सुचनेनुसार बी.एस.यु.पी. प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण करणे आवश्यक आहे. सबब आपली मुदतवाढीची विनंती अमान्य करण्यात येत असुन सदर प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी.

(गहनिर्माण विभागाचे दि.१७/११/२०१६ चे पत्र)

प्रकल्पाच्या मुदतवाढीसाठी आपण केलेली विनंती मान्य करता येणार नाही. सबब सदर प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी.सबब दि. १९/११/२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आलेले उत्तर अंतिम असुन त्यामध्ये निश्चीत केलेला प्रकल्प पुर्ण करणे केंद्र शासनाच्या कार्यक्रमानुसार आवश्यक आहे.

सदर प्रकल्पास ३१ मार्च २०१७ पर्यंत केंद्र शासनाने मुदवाढ दिलेली होती. प्रकल्पातील इमारतीचे काम पाहता इमारतीचे काम पुर्ण करण्यास पुढील २-३ वर्षाचा कालावधी लागणार आहे. परंतु शासनाने प्रकल्पास मुदतवाढ दिलेली नाही. सदर प्रकल्पाबाबत मा. मुख्यमंत्री ,महाराष्ट राज्य यानी दि.१४ जु २०१७ रोजी सदर प्रकल्पाचे काम प्रधानमंत्री आवास योजनेमधुन पुर्ण करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

CSMC बैठक

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाद्वारे दि. २०/०३/२०१५ रोजीच्य सी.एस.एम.सी.च्या बैठकीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बी.एस.यु.पी. प्रकल्पाबाबत चच करण्यात आली होती. सदर बैठकीत त्यावेळी सुरु असलेल्या २३५१ घरकुल पुर्ण करणेबाबत निर्णय घेण्यात आला असून योजना बंद झाल्यामुळे निधी मिरा भाईंदर महानगरपालिकेस मिळणार नाही. तसेच

उर्वरित १७८५ घरकुलांसाठी महानगरपालिकेने स्वतः च्या निधीतुन खर्च करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर प्रकल्पामध्ये मुळ मंजुरीनुसार G+8 च्या इमारती (४१३६ सदनिका) बांधण्यात येणार होत्या. परंतु प्रकल्प Insitu असल्यामुळे लाभार्थीना स्थलांतरीत करुन इमारतीच्या कामास सुरुवात करण्यास विलंब झाला आहे. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी उंच डोंगर असल्यामुळे सदर डोंगराची खोदाई करण्यास विलंब झाला आहे. सदर प्रकल्प २३५१ सदनिकासाठी सिमीत केल्यामुळे स्थलांतरीत केल्या लाभार्थीना प्राधाण्याने सामावुन घेण्यासाठी G+16 च्या इमारती बांधण्याचा मा. महासभा दि.१३/०७/२०१५ ठराव क्र.३२ नुसार घेण्यात आलेला आहे. प्रकल्पामध्ये मुळ मंजुरीनुसार G+8 च्या दोन इमारतीचे काम सुरु आहे.उर्वरीत इमारती G+16 बाबतचे सुधारीत नकाशांना नगरचना विभागाची मंजुरी प्राप्त आहे.

संक्रमण म्हणजे भाडे व शिफ्टींग

मा. महासभा, मा. स्थायी समिती सभा तसेच सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये संक्रमण शिबीराची व्यवस्था केलेल आहे.

संक्रमणमध्ये भाडेचे लाभार्थी व शिफ्टींगचे लाभार्थी या दोन्ही चा समावेश आहे. सदर ठरावात २ वर्षाच्या भाडेची तरतुद असली तरी पुढील वाढीव कालावधीसाठी सुध्दा प्रतिपुर्ती करावी लागणार आहे.

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका राबवित असलेला बी एस यु पी प्रकल्प हा In situ प्रकारात मोडत असल्याने जोपर्यंत लाभार्थ्यांसाठी तात्पुरत्या निवासाची व्यवस्था होत नाही तोपर्यंत प्रत्यक्ष इमारत बांधणीच्या कामास सुरुवात करता येत नाही. प्रकल्प प्रस्तावात यासाठी लाभार्थ्यांना रु. ३०००/- प्रति माह प्रमाणे दोन वर्षासाठी घर भाडे देण्याची तरतुद आहे. निविदा बोलावितेवेळी ५०% लाभार्थ्यांसाठी संक्रमण शिबिर व ५०% लाभार्थ्यांसाठी घरभाडे देणे असे प्रस्तावित आहे.

२) काशीमिरा / मिरा रोड परिसरात एवढया मोठया संखेने व तेही ज्यांना मिळणाऱ्या भाडयाच्या रक्कमेत घर मिळणे दुरापस्त वाटत असल्याने संक्रमण शिबिर हाच पर्याय उरत असल्याने १३१७ संक्रमण खोल्या बांधण्यात आलेल्या आहेत.

३) आतापर्यंत भाडेतत्वावर व संक्रमण शिबीरात स्थलांतर केलेल्या लाभार्थीच्या २०४२ झोपड्या तोडण्यात आलेल्या आहेत.

प्रकल्पाची किंमत

बी.एस.यु.पी.योजनेमधील इमारत बांधकामास अपेक्षीत खर्च 1,81,863 X 27,986.40 चौ.मी.=508.96 कोटी एवढा खर्च अपेक्षीत आहे. बी.एस.यु.पी.प्रकल्पाच्या दरानुसार 24.94 कोटी एवढा खर्च वास्तुविशारद, आर.सी.सी.तंज व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार या बाबीसाठी होणार असून एकूण प्रकल्पाची किंमत 533.91 कोटी एवढी होत आहे.

झालेल्या कामाचे मुल्याकन	आतापर्यंत झालेला खर्च	कंत्राटदारास द्यावयाची रक्कम
रु.82.64 कोटी.	72.08 कोटी	10.56 कोटी

मा.विशेष महासभा (दि.१३/०७/२०१५ठराव क्र.३२)

१) सदर योजना केंद्र शासनाच्या मुळ मंजुरी नुसार ४१३६ सदनिका करीता प्रकल्प राबवून प्रकल्प पूर्ण करण्यात यावा.

२) बी.एस.यु.पी. प्रकल्प धोरणानूसार बी.एस.यु.पी. योजना वर्धनक्षम करण्याकरीता शासन निर्णयातील तरतूदीनुसार २.५ चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्याची मुभा मनपास प्रदान करण्यात आलेली आहे. २.५ चटईक्षेत्र निर्देशांक लागू केल्यानंतर त्यामधील प्रथमतः १५ % च.क्षे.नि विक्री घटकाकरीता वापरण्याचे

अधिकार मनपास असून वाढीव १०% च.क्षे.नि. (विक्री घटकाकरीता कमाल २५ %) घटकाकरीता वापरण्यास मा. उपाध्यक्ष म्हाडा यांच्या परवानगीने मुभा देण्यात आलेली आहे. तथापी सदर प्रकल्प पूर्ण करण्यास २५% व्यतिरीक्त २१% वाणिज्य वापराची परवानगी मिळून एकूण ४६% वाणिज्य वापराची परवानगी शासनाकडुन घ्यावी असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

३) संक्रमण शिबीराची व्यवस्था व रेंटल हाऊसींगच्या सदनिकामध्ये लाभार्थींना स्थलांतरीत करण्याची जबाबदारी बाबत खालील प्रमाणे नमुद आहे.

५) मुळ निविदेतील अटी शर्तीनूसार सदर लाभार्थींना भाडे देण्याची जबाबदारी संबधीत ठेकेदाराची आहे. तथापी सदर प्रकल्पास विलंब झाल्याने २ वर्षापेक्षा वाढीव कालावधीसाठी मनपामार्फत भाडे द्यावे लागणार आहे. सदर भाडे महानगरपालिकेकडून देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

वरील ठरावानुसार कंत्राटदाराना सुधारीत कार्यादेश देण्यात आलेले होते.

अतिरिक्त वाणिज्य वापरासाठी शासनास प्रस्ताव

वरीलप्रमाणे सदर योजना राबविताना आलेल्या अडचणी, त्यामुळे कामास झालेला विलंब व काम पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी सदर योजनेस पात्र लाभार्थ्यांच्या झोपड्या तोडून त्यांना स्थलांतर केल्याने त्याचे पुर्नवसन करणे, याबाबत आढावा घेतला असता सदर योजना ही महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देऊन पूर्ण करावा लागणार आहे. शासनाकडून सदर योजना २३५१ सदनिकासाठी सिमीत केल्याने शासन अनुदान देखील मंजूरीपेक्षा कमी मिळणार आहे. त्यामुळे मंजुर ४१३६ सदनिका बांधण्याच्या दृष्टीने शासनाकडून विहीत मर्यादेपेक्षा जादा चटईक्षेत्र वाणीज्य वापरासाठी मंजुर करुन घ्यावा लागेल. सदर योजनेच्या मंजुर नकाशात बदल करुन ४१३६ सदनिका बांधण्यासाठी शासन अनुदान वगळता इतर निधी वाणीज्य वापरातुन उभा करावा लागेल. त्यासाठी शासनाकडे अतिरिक्त ५०% वाणिज्य वापरासाठी परवानगी मागितलेली होती सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही.

विलंबाची कारणे.

१) सदर प्रकल्प हा सरकारी जागेवर करावयाचा असल्याने जागा मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे दि.३१/०८/२००९ रोजी सादर करण्यात आला. सदर जागा ताब्यात मिळविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, मा. विभागीय आयुक्त कोकण भवन, महसुल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठपुरावा व पत्रव्यवहार केल्यानंतर सदर जागेचा आगाऊ ताबा मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी महानगरपालिकेस दि.०५/०४/२०११ रोजी दिला व तद्नंतर शासनाची जागा हस्तांतरणास दि.१६/११/२०११ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झाली.

२) मिरा-भाईंदर महानगरपालिका राबवित असलेला बी एस यु पी प्रकल्प हा In situ प्रकारात मोडत असल्याने जोपर्यंत लाभार्थ्यांसाठी तात्पुरत्या निवासाची व्यवस्था होत नाही तोपर्यंत प्रत्यक्ष इमारत बांधणीच्या कामास सुरवात करता येत नाही. प्रकल्प प्रस्तावात यासाठी लाभार्थ्यांना रु. ३०००/- प्रति माह प्रमाणे दोन वर्षासाठी घरभाडे देण्याची तरतुद आहे. निविदा बोलावितेवेळी ५०% लाभार्थ्यांसाठी संक्रमण शिबिर व ५०% लाभार्थ्यांसाठी घरभाड देणे असे प्रस्तावित होते. सदर तरतुद सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये करण्यात आलेली आहे.

३) सदर प्रकल्पांतर्गत संक्रमण शिबिर ट्रक टर्मिनलच्या आरक्षणावर प्रस्तावित असल्याने सदर आरक्षणाचा काही भाग हा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना, अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक होते. त्या अनुशंगाने मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये मंजूरी घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला. या बाबत सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर

नगरविकास विभाग अधिसुचना क्रमांक टीपीएस-१२११/२४८/प्र.क्र.२९४/११/ नवि-१२ दि. २७/०३/२०१२ अन्वये १२,२३९ चौ.मीटर क्षेत्रावर संक्रमण शिबिराचे आरक्षण मंजूर करण्यात आले आहे.

४) जनतानगर येथील जे-३ व जे-१ पॅकेजमधील झोपडया हटवुन त्याठिकाणी उंच ३० मी. चा डोंगर खोदाई करणे व सदर माती टाकण्यास महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध नव्हती. सदर भागातील खाजगी जमीन मालकाच्या परवानगी नुसार माती भराव करण्यात आला. सदर डोंगर खोदाईच्या कामास झालेल्या विलंबामुळे इमारतीचे काम विलंबाने सुरु झालेले आहे.

५) जे-3 पॅकेजमधील डोंगरखोदाईमुळे इमारतीच्या बाजुस धोकादायक स्थिती झाल्यामुळे भविष्यात कुठलीही दुर्घटना घडु नये या अनुअषंगाने मा. आयुक्त यांच्या मंजुरीने सदर भागात Reatining wall चे काम करण्यात आले आहे.

६) झोपडपट्टी धारकांचा सर्वेक्षणास विरोध असल्याने सर्वेक्षण वहीत वेळेत पूर्ण न होता त्यास अधिक कालावधी लागणे.

७) झोपडपट्टीच्या जवळच संक्रमण शिबीर पाहीजे, अतिरिक्त संक्रमण शिबीराची मागणी करणे. संक्रमण शिबीराची खोली अपूरी आहे म्हणून शिबीरात जाण्यास विरोध करणे.

८) झोपडी खाली करण्याच्या पूर्वी सदनिकाचे लॉटरी व रजिस्ट्रेशन करावे असा आग्रह असणे. रजिस्ट्रेशन झालेनंतरच झोपडी खाली करणे.

९) पात्र झोपडी धारक स्वतःच्या पात्र झोपडीत पार्टीशन, नवीन दरवाजा बसविणे, नवीन बांधकाम करणे व त्यास नवीन नंबर देणे बाबत मागणी करणे व पात्र झोपडी खाली करण्यास नकार देणे .

१) भाडेचे २ वर्ष पुर्ण

प्रकल्पामध्ये लाभार्थींना भाडेचा २ वर्षाचा ३०००/- प्रमाणे रु.७२०००/- देण्याची तरतुद आहे. सदर भाडेचे २ वर्ष पुर्ण झालेले ओहत व सदर लाभार्थींना पुढील कालावधीसाठी भाडेचे धनादेश देण्याची गरज आहे. भाडेतत्वावर गेलेल्या 1044 मधुन लोढा अक्वा इमारतीमध्ये 569 लाभार्थींना स्थलांतरीत केलेले आहे. व जे-3 पॅकेजमधील इमारत क्र.1 मध्ये 75 लाभार्थींना सदनिकाचा ताबा देण्यात आलेला आहे. उर्वरीत 400 लाभार्थींना व झोपडी तोडलेले पण भाडे किंवा शिफ्टींग न मिळालेले 193 असे मिळुन 593 लाभार्थींना भाडे देणे बाकी आहे.

प्रकल्पातील भाडेच्या लाभार्थींचा तपशिल

अ.क्र.	पॅकेज	लाभार्थी संख्या	एकुण रक्कम	प्रदान करण्यात आलेली भाडेची रक्कम	उर्वरित प्रदान करावयाची भाडेची रक्कम
१	जे-१	१५५	९०,८१,०००/-	-	९०,८१,०००/-
२	जे-२	१२६	७५,१२,०००/-	-	७५,१२,०००/-
३	जे-३	२९२	१,७९,२२,०००/-	९६,७८,०००/-	८२,४४,०००/-
४	काशिचर्च पॅकेज	२०	१५,४२,०००/-	-	१५,४२,०००/-
	एकुण	५९३	३,६०,५७,०००/-	९६,७८,०००/-	२,६३,७९,०००/-

भाडेच्या लाभार्थींचा तपशील

अ.क्र.	भाडेचे लाभार्थी	संक्रमण शिबीर लाभार्थी	इमारत क्र.01 मधील ताबा दिलेले	एकुण स्थलांतरीत लाभार्थी	उर्वरित 2 वर्ष पुर्ण झालेले भाडेचे लाभार्थी व भाडे किंवा शिप्टींग न	जुन 2017 पर्यंत होणारी भाडयाची रक्कम (भाडेचे - 400 व भाडे किंवा शिप्टींग न मिळालेले 193

			भाडेचे लाभार्थी		मिळालेले लाभार्थी	लाभार्थी) असे एकुण 593
1	1044	1087	75	2042	593	2,63,79,000/-

रेंटल हाऊसींग स्कीम

सदर प्रकल्पअंतर्गत लाभार्थीना संक्रमण शिबीर व भाडेतत्वावर स्थलांतरीत करुन इमारतीच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. प्रकल्पास विविध कारणामुळे विलंब झालेला आहे. सदर झालेल्या विलंबामुळे भाडे तत्वावरील लाभार्थीचे भाडेचे २ वर्ष पुर्ण झालेले असुन पुढील भाडेसाठी लाभार्थी पाठपुरावा करत आहेत. प्रकल्पाचा कालावधी पुर्ण झालेला असुन यापुढे शासनाकडुन निधी मिळणार नाही. सदर प्रकल्पातील भाडेतत्वावरील लाभार्थीमधील ५६९ लाभार्थीना एम.एम.आर.डी.ए कडुन प्राप्त रेंटल हाऊसींगच्या सदनिकामध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थंलातंरीत केलेले आहे. रेंटल हाऊसींग मधील सदनिका शासनाने परवडणारी घरे या योजनेमध्ये परावर्तीत केलेले आहे. एम.एम.आर.डी.ए. कडुन रेंटल हाऊसीग स्कीम मधुन प्राप्त होणाऱ्या सदनिकामध्ये भाडेतत्वावरील लाभार्थीना स्थलांतरीत करणेबाबत मा. महासभा दि. १३/०७/२०१५ मध्ये ठराव पारित केलेला आहे. भाडेतत्वारील व झोपडया तोडलेल्या ५९३ लाभार्थीना स्थंलातर करण्यासाठी रेंटल हाऊसींग च्या इमारतीची गरज आहे.सद्यस्थितीत डेल्टा गार्डन, मौजे महाजनवाडी येथील इमारती अंतीम टप्प्यात आहेत. सदर इमारतीचा ताबा लवकरात लवकर घेणेबाबत नगररचना विभागास अवगत करण्यात येत आहे.

भाडेचे रक्कम RTGS द्वारे

मा.महासभा दि.२०/११/२००९ ठराव क्र.३६ व मा.स्थायी समिती सभा दि.०५/०८/२०१० ठराव क्र.३१ अन्वये सदर लाभार्थीना संक्रमण म्हणजे संक्रमण शिबीर खोली / भाडे द्यावयाची तरतुद असल्याने सदर लाभार्थींच्या खातेवर महानगरपालिकेमार्फत RTGS द्वारे भाडयाची रक्कम जमा करण्यात आली आहे. सदर लाभार्थीची झोपडी तोडण्यात आली असून सदर लाभार्थी भाडेच्या सदनिका मध्ये राहत आहेत. त्यामुळे सदर लाभार्थी संक्रमण शिबीर खोली अथवा भाडयाची मागणी करत आहेत. सद्यास्थितीत महानगरपालिकेकडे संक्रमण शिबीर खोल्या नसल्याने सदर लाभार्थ्यांना भाडे देणे गरजेचे होते. त्यामुळे भाडेचे २ वर्ष पुर्ण होणाऱ्या १९५ लाभार्थीच्या बॅक खातेवर RTGS द्वारे मार्च २०१६ पर्यंत भाडेची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरीत ५९३ मधील १८४ लाभार्थीचे जुन २०१७ पर्यतच्या भाडेची रक्कम मे. श्रीजी बिटकोन (जेव्ही) यांच्या चालु देयकातुन कपात करुन लाभार्थीच्या बॅक खातेवर RTGS द्वारे जमा करण्यात आली आहे.

योजनेची सद्यस्थिती :-

अ.क्र.	पॅकेज	कामाचा तपशिल	इमारत बांधकामासाठी ठेकेदारास प्रदान करण्यात आलेले देयक	सद्यास्थीतीत ठेकेदारास उर्वरित बाकी प्रदान करावयाचे देयक	पॅकेज मधील 1918 सदनिकाचे काम पुर्ण करण्यासाठी लागणारा खर्च
१	जे-१	1) इमारत क्र.06, 294 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 16 व्या मजल्या पर्यंत पुर्ण झाले आहे.15 व्या मजल्यापर्यंत Brick Work चे काम पुर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. 2) इमारत क्र. 07, 362 सदनिका, सदर इमारतीचे खोदकाम 60% पुर्ण झाले आहे.	रु.14,27,62,223/-	रु.8,25,15,029/-	रु.99,21,54,139/-
२	जे-३	1) इमारत क्र. 01, (179 सदनिका) ची सर्व कामे पुर्ण झाली असुन 171 पात्र लाभार्थीना सदनिकाचा ताबा देण्यात आला आहे. 2) इमारत क्र. 02, 299 सदनिका, सदर इमारतीचे 3 ऱ्या	रु.52,85,42,379/-	रु.2,20,96,945/-	रु.103,60,66,415/-

		मजल्यापर्यंतचे RCC चे काम पुर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. 3) इमारत क्र.03, 299 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 8 व्या मजल्या पर्यंत पुर्ण झाले आहे. 5 व्या मजल्यापर्यंत Brick Work चे काम पुर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. 4) इमारत क्र. 04, 299 सदनिका, सदर इमारतीचे RCC चे काम 1 ला मजल्या पर्यंत RCC चे काम पुर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे. 5) इमारत क्र. 05, 299 सदनिका, सदर इमारतीचे खोदकाम 50% पुर्ण झाले आहे. फुटींग स्टफ कॉलम आणि प्लींथ चे काम पुर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे.			
४	काशिचर्च पॅकेज	काशिचर्च इमारत क्र.04, 129 सदनिका,सदर इमारतीचे 60% RCC चे काम 8 व्या मजल्यापर्यंत पुर्ण झाले आहे. सदर इमारतीचे Brick work चे काम 7 व्या मजल्यापर्यंत पुर्ण झाले आहे. सद्यस्थितीत काम बंद आहे.	रु.4,95,20,068/-	रु.9,93,641/-	रु.9,94,92,554/-
		एकुण	रु.72,08,24,671/-	रु.10,56,05,615/-	रु.212,77,13,108/-

Reatining wall

जनतानगर येथील जे-3 पॅकेज संजय गाधी राष्टीय उद्याना लगत असुन सदर भागात 25 मी. उंचीचा डोंगर होता. इमारतीच्या बांधकामासाठी सदर डोंगर खोदाई करण्यात आली. सदर डोंगर खोदाईमुळे सदर भागात धोकादायक स्थिती निर्माण झाली होती, या स्थितीत डोंगराचा भाग कोसळण्याची शक्यता होती त्यामुळे इमारतीच्या बांधकामाचे काम करणे अत्यंत धोकादायक होते, त्यामुळे सदर ठिकाणी Reatining wall बांधणे गरजेचे होते. त्यानुसार तत्कालीन मा. आयुक्त यांच्या मंजुरीने तांत्रीक सल्लागाराच्या अभिप्रायानुसार सदर Reatining wall चे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर Reatining wall च्या कामामुळे इमारत क्र. 1 चे काम पुर्ण होऊन लाभार्थींना सदर इमारती मधील सदनिकाचा ताबा देण्यात आला आहे. सदर Reatining wall बांधण्याच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

विधी विभागाचा अभिप्राय

As Per clause 21 (a)(Page No.60) of chapter - V Conditions of Contract tender document Engineer - in - Charge shall be entitle (Other than default on the part of Bidder for which the corporation is entitled to rescind the contract) to stop the whole or part of work by giving a notice in writing to bidder of such desire and upon the receipt of such notice the bidder shall forthwith stop the work wholly or in part if required after having due Regards to appropriate stage at which the work should be stopped the Bidder Shall have no claim to any

payment or compensation what so-ever by Reason of in pursuance of any notice as aforesaid on account of any stoppage or curtailment except to the extent specified hereunder sub clause (b) & (C)

As Per the aforesaid clause the contractor shall not be entitle to claim any payment or compensations from corporation for such stoppage.

In case the Contractor raised any Dispute against such notice stoppage he has to refer dispute to Arbitration as per clause 27 (disputes & Arbitration) (page No.44) under Indian Arbitration Act.

Since the said BSUP Project has already been delayed and in case the present Contractor on receiving stoppage notice from the corporation raises any disputes which may cause further delay the corporation can allow the present Contractor (Who are not defaulter & willing to do work as per new policy) to participate in the new contract.

So it is advisable to give prior notice to the Contractors as per the provision of clause 21 (a) of tender document.

विधी अधिकारी यांनी वरिलप्रमाणे अभिप्राय दिल्यानुसार विषयांकित प्रकल्प प्रधान मंत्री आवास योजनेतुन प्रस्तावित करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळल्यानंतर निविदेतील तरतुदीनुसार संबंधीत ठेकेदार यांना नोटीस देऊन पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. विस्थापीत झालेले व विस्थापीत न झालेले बी.एस.यु.पी.प्रकल्पाचे लाभार्थीबाबत प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये प्रस्ताव सादर करणे. जनतानगर व काशिचर्च येथील झोपडी तोडुन स्थलांतर केलेल्या लाभार्थीना व सद्यस्थितीत जागेवर असलेल्या लाभार्थीना प्रधानमंत्री आवास योजनेत सामावुन घेणेसाठी मा. महासभेच्या मंजुरीनंतर मे. पुनित आर्किटेक्ट या सल्लागाराकडून मंजुर दराने सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

प्रधानमंत्री आवास योजना

सदर प्रकल्प वेळेत पुर्ण करता यावा यासाठी मा.महासभेच्या मान्यतेने कंत्राटदारांना सुधारीत दर मंजुर करुन देण्यात आले तथापी शासनाकडून ५०% वाणिज्य वापर परवानगी न आल्याने व योजनेस मुदतवाढ न दिल्याने, महानगरपालिकेची स्वतःचा निधी टाकून योजना पुर्ण करण्याची क्षमता नसल्याने सदर सुधारीत दरानुसार प्रकल्प पुर्ण होणार नाही.

मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दि.१४ जुन २०१७ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी सदर योजना प्रधानमंत्री आवास योजनेतुन पुर्ण करावी असे निर्देश दिले. त्या अनुशंगाने या विभागामार्फत बी.एस.यु.पी.योजनेतंर्गत प्रत्यक्ष झालेले काम, कामावर झालेला खर्च, बी.एस.यु.पी.योजनेत शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान (एक इमारतीचा हिस्सा वगळून) शासनास परत द्यावे लागणार असल्याने, तसेच महानगरपालिकेस भविष्यात स्वतःच्या निधीतुन काही ही खर्च येऊ नये यासाठी प्रत्यक्षात प्रधानमंत्री आवास योजनेतुन काम पुर्ण करण्यासाठी लागणारा चटई क्षेत्र याची माहिती व अभ्यास करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवून मंजुर झाल्यानंतर उर्वरित सर्व कामासाठी नव्याने निविदा प्रसिध्दी करावी लागेल. तत्पुर्वी बी.एस.यु.पी. योजनेतंर्गत सुरु असलेली कामे व कंत्राटे रद्द करावी लागतील. बी.एस.यु.पी. योजना बंद झाल्याने व शासनाकडून प्रकल्पात कोणतही मुदतवाढ, अनुदान, Escalation इ. देण्याबाबत असमर्थता दर्शविल्याने सदर प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजनेतुन करावा लागणार आहे २.५० चटई क्षेत्र फक्त बी.एस.यु.पी.योजने पुरतीच

मर्यादीत होते, तथापी प्रधानमंत्री आवास योजनेतुन प्रकल्प प्रस्तावित केल्यास २.५ ते ४ चटई क्षेत्र पर्यंत परवानगी मिळू शकेल.

शासन निर्णय क्र.प्रआयो.2017/प्र.क्र.4/गृहनिधो-2 दि.14 मार्च 2017 गृहनिर्माण विभाग यांच्या मार्गदर्शन सुचनानुसार विविध अमंलबजावणी यंत्रणानी तयार केलेले प्रस्तावाच्या अनुषंगाने जादा FSI देणे जमिनीचे क्षेत्र व उपलब्ध ते नुसार आरक्षणात बदल करणे स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असलेली वित्तीय तरतुद व नविन तंत्रज्ञान आत्मसात करणे इ. साठी व प्राप्त प्रस्ताव छाननी करण्याकरीता उपसमिती यांचेकडे सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करुन मान्यता घेणे शक्य आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत सदर प्रकल्पासाठी चटई क्षेत्र निर्देशंक जास्तीत जास्त 4.00 FSI लागणार आहे. सदर वाढीव FSI साठी महाराष्ट्र शासनतंर्गत Maharashtra State New Housing Policy & Action Plan, 2015 मध्ये प्रकरण क्र. 3, 3.5 (ii) यानुसार आपण शासनाकडे 4.00 पर्यंत FSI ची मागणी करुन शकतो. व शासन वरील नियमानुसार आपणांस वाढीव FSI ची मान्यता देऊ शकते.

अनुदान तपशिल

प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडून अपेक्षीत अनुदान 3957 x 200000 =79.14 cr. एवढे अनुदान अपेक्षीत आहे. सदर योजना राबविताना बि.एस.यु.पी.प्रकल्पातील प्राप्त अनुदान न परत केल्यास एकुण रु.124.807 कोटी एवढया निधीची आवश्यकता असणार आहे.

लाभार्थी व बांधकाम क्षेत्रफळ

- बी.एस.यु.पी.योजनेतंर्गत जनतानगर व काशिचर्च येथील एकुण पात्र लाभार्थींची संख्या 4136 एवढी आहे.
- सदर योजनेतुन प्रत्यक्ष इमारत क्र.01 मध्ये 179 सदनिका तयार करुन लाभार्थ्यांना ताबा देण्यात आलेला आहे.
- सद्यस्थीतीत एकुण 3957 लाभार्थ्यांना घर देणे बाकी आहे. प्रकल्पातील उर्वरित लाभार्थीसाठी स्वतंत्र योजना करावी लागेल, सदर योजना पुर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेत प्रस्तावित करावी लागेल.
- सदर योजनेमध्ये एकुण बांधकाम क्षेत्र 1,81,863 Sq.mt एवढे आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये होणारे बांधकाम

बी.एस.यु.पी प्रकल्पातील सद्यस्थितीत झालेले बांधकाम सोडुन उर्वरित इमारतीचे काम पुर्ण करण्यासाठी बांधकामाबाबत मा. महासभेच्या मंजुरीनंतर मे. पुनित आर्कीटेक्ट, प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडुन सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात येईल.

पंतप्रधान आवास योजना राबविण्याचा तपशील

सदर योजना पंतप्रधान आवास योजनेतंर्गत राबविल्यास एकुण 4.00 चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन जनतानगर व काशिचर्च येथील जागेवर 2,64,686.08 चौ.मी एवढे चटई क्षेत्र मंजुर होणे शासनाकडून अपेक्षीत आहे. बी.एस.यु.पी योजनेतंर्गत 4136 घरासाठी 1,42,071.33 चौ.मी. एवढा चटई क्षेत्र लागणार असून उर्वरित 1,22,614.75 चौ.मी. एवढे चटई क्षेत्र विक्रीस उपलब्ध होऊ शकते. सदर उर्वरित 1,22,614.75 चौ.मी.चटई क्षेत्र सदर जागेच्या चालू वर्षातील सरासरी रेडी रेक्नर दरानुसार रु.26,910.00 चौ.मी. असे धरल्यास महानगरपालिकेस एकुण 329.96 कोटी एवढे उत्पन्न मिळू शकते. शासनाकडील प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत येणारे रु.79.14 कोटी अनुदान असे एकुण 409.10 कोटी प्रकल्पासाठी निधी उभा करता येऊ शकतो. महानगरपालिकेस स्वत: चा रु.124.807 कोटी एवढा निधी उपलब्ध करावा लागेल. सदर योजना पुर्ण करण्यासाठी जागेची विक्री झाल्यानंतर 36 महिन्याचा कालावधी अपेक्षीत आहे.

केंद्र शासनाने 4136 सदनिकाचा प्रकल्प 2351 सदनिकासाठी सिमित केलेला आहे. सदर 2351 सदनिकासाठीचे इमारतीच्या बांधकामाचे काम विविध टप्प्यावर सुरु असून सदर प्रकल्पातंर्गत पॅकेज निहाय इमारतीच्या बांधकामावर व डोंगर खोदकाम इ. कामासाठी प्राप्त निधी खर्च झालेला असून तो संबंधित ठेकेदारांना वितरीत केला आहे. सद्यस्थीतीत इमारतीचे काम वेगवेगळया टप्प्यावर असून यांची माहिती मुद्दा क्र.03 दर्शविण्यात आलेली आहे. सदर निधी खर्च झालेला असून शासनास अनुदान परत करणे शक्य नसल्याबाबत शासनास कळवावे लागणार आहे. वरील नमुद रुपये 59.60 कोटी इतका निधी BSUP प्रकल्पावरच खर्च झाला असून तो शासनास परत करणे शक्य नाही.

सदर प्रकल्पातंर्गत सुरु असलेल्या जे - 1 पॅकेजमधील 294 सदनिकांची इमारत, जे - 3 पॅकेजमधील इमारत क्र.02 मधील 299 सदनिका, इमारत क्र.03 मधील 299 सदनिका, इमारत क्र.04 मधील 299 सदनिका व इमारत क्र.05 मधील 299 सदनिका तसेच काशिचर्च पॅकेज मधील इमारत क्र.04 मधील 129 सदनिका अशा मिळुन 1619 सदनिकांची कामे सबंधित कंत्राटदाराकडून महानगरपालिकेच्या स्वनिधी अथवा कर्ज निधितुनच पुर्ण करुन घेण्यात यावीत. अथवा सदर इमारतीच्या कामासांठी सदर इमारतीच्या एकुण क्षेत्राच्या 25% क्षेत्र वाणिज्य वापरासाठी अनुज्ञेय असल्याने सदर जागा विकुन सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. सदर कामासाठी सुमारे 150 कोटीपर्यंत कर्ज घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बी.एस.यु.पी. प्रकल्पातील उर्वरित सदनिका हया प्रधानमंत्री आवास योजनेतुन पुर्ण करण्यासाठी सल्लागाराकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पुढील मान्यतेसाठी शासनास सादर करावा. व शासनाच्या मंजुरी नंतर आवश्यक सर्व प्रक्रिया पार पाडून पुढील कालावधीत सदर योजना पुर्ण करण्यास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देऊन प्रशासकीय कार्यवाहीचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देत आहे.

सुचक :- श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे

अनुमोदन :- मीराताई आदक

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

PC-09/VP/DK/2018-19/MT -01

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि.26/07/2018

प्रकरण क्रमांक (43) :- पं.पु.डॉ. केशव बळीराम हेडगेवार भवन (स्थानिक संस्था कर कार्यालय) मधील काही जागा तहसिलदार कार्यालयाकरीता उपलब्ध करून देणेबाबत.

ठराव क्रमांक. (४३) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे भाईंदर सर्व्हे क्र.278/5,6,1ब, 277/7अ,7ब,7क जुना 676/5,6,1ब, 677/7अ,7ब,7क या आरक्षण क्र.97 मार्केट मध्ये समावेशक आरक्षणातून 819.21 चौ. मीटर क्षेत्राचे तळ + एक मजल्याची इमारत बांधून महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेली आहे. सदर इमारतीच्या तळ मजल्यावर मार्केट सुरू करण्याची प्रक्रीया सुरू असून पहिल्या मजल्यावर सद्यस्थितीत पोलिस पथक कार्यालय आहे. सदर पोलिस पथकास इतरत्र जागा देण्यात यावी व पहिल्या मजल्यावर तहसिलदार कार्यालयासाठी तात्पुरत्या स्वरूपात (नविन तहसिलदार कार्यालय होऊन स्थलांतरीत होईपर्यंत) जागा उपलब्ध करून देण्यास ही सभा मंजूरी देत आहे. यापूर्वी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्या मागणी नूसार आरक्षण क्र.249 या जागेतील महानगरपालिकेची इमारत शासकीय कामासाठी देण्यात आलेली आहे. तथापी सदर जागेचा अजूनपर्यंत वापर सुरू करण्यात आलेला नाही. त्याचपमाणे सदर इमारती मधील सर्व जागा जिल्हाधिकारी ठाणे पुरस्कृत कौशल्य विकास व ॲप्रेन्टीसशीप केंद्रासाठी लागत नाही. तरी जिल्हाधिकारी यांनी एक महिन्याची मुदत देऊन सदर इमारती कौशल्य विकास व ॲप्रेन्टीसशीप केंद्र सुरू करण्याबाबत कळविण्यात यावे व सदर मुदतीत काम सुरू न झाल्यास सदर जागेचा ताबा परत घेण्यात यावा. तसेच यापूर्वी तहसिल कार्यालयाकरीता दिलेली जागा रद्द करण्यात यावी व पं.पु.डॉ. केशव बळीराम हेडगेवार भवन या इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर तात्पुरत्या स्वरुपात तहसिलदार कार्यालयास जागा देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- (Rakesh Shah)

अनुमोदन :- श्री० दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि.२६/०७/२०१८

प्रकरण क्रमांक (४२) :- आजारी पक्षांच्या उपचारासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

ठराव क्रमांक (४२) :-

मिरा भाईंदर क्षेत्रात आजारी पक्षी यांच्यावर उपचार करण्यासाठी रुग्णालय उपलब्ध नाहीत. त्यामुळे शहरातील बऱ्याच सेवाभावी, जीवदया संस्था या आजारी पक्ष्यांवर मोफत उपचार करणेकरीता पुढाकार घेत आहेत. परंतु या विविध संस्थांना आजारी पक्षांवर उपचार करणेकामी जागा उपलब्ध नसल्यामुळे उपचार करणे गैरसोयीचे होत आहे.

याकरीता विविध संस्थांनी आजारी पक्षांच्या उपचारासाठी महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे अहिंसा चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेला भाईंदर पश्चिम डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्यालगत असलेल्या अग्निशमन दलाच्या आवारात जागा उपलब्ध करुन दिलेली असून या जागेत सदर सेवाभावी संस्थांमार्फत स्वखर्चाने उपचार केले जात आहेत. परंतु सदर इमारतीची पुर्नबांधणी अंतर्गत सदर शेड काढण्यात येणार असून अहिंसा चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेने मागणी केल्यानूसार पर्यायी भाईंदर (प.) रेल्वे समांतर 100 फीट रस्त्यावर, अग्निशमन कार्यालयातील मोकळ्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात शेड बांधून उपलब्ध करुन देण्यात यावे.

त्याचप्रमाणे मिरारोड येथे आजारी पक्षांच्या उपचाराकरीता जागा उपलब्ध करुन मिळणेकरीता अनेक सेवाभावी जीवदया संस्थांनी अर्ज केला किंवा करतील त्यानुसार त्यांना शांतीनगर येथील एस.टी.पी. प्लान्ट जवळील कोपऱ्यामध्ये शेड बांधून जागा उपलब्ध करुन देणेबाबत मा. आयुक्त यांनी प्राप्त झालेले अर्ज मा. स्थायी समिती पुढे ठेवून मंजुरी घेवून त्यांना जागा उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर जागेचा मालकी हक्क महानगरपालिकेकडे राहील व आजारी पक्षांच्या उपचारासाठी मागणीनूसार आवश्यक प्रक्रीया व करारनामा करून जागेचा ताबा देण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

Manoj R. Dubey

सुचक :-

अनुमोदन :-

हेतल परमार

ठराव सर्वानूमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

Dmehta

पिठासन अधिकारी

PC-6/JP/2018-19/DK/MT-3

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

			चौ.मी.)		गरजा पूर्ण करण्यास 10 वर्षापर्यंत मदत करेल
					• सुविधेचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी, पार्कींग फीमध्ये लवचिकता (तासाचे आधारे) देणे आवश्यक आहे.
					• पूनम गार्डन रोड रस्त्यावर पार्कींग प्रतिबंधित करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करणे.
3	रामदेव पार्क रोड		263 दुचाकी वाहने (4737 चौ.मी.)	अतिरीक्त 82 दुचाकी वाहने (1476 चौ.मी.)	• या रस्त्यासह व्यावसायिक संकुले असल्याने ग्राहकांसाठी पार्कींगची जागा तरतूद करावी लागेल. • या संकुलांच्या पुढे नो पार्कींगची स्थापना करणे आवश्यक आहे.
					प्रत्येक चौकापूर्वी आणि नंतर 50 मीटर पर्यंत नो पार्कींग क्षेत्र: • मिरा भाईंदरशी जोडणारा रामदेव पार्क रोड आरंभ • क्वीन्स रोडला जोडणारा चौक • रामदेव पार्क चौक • साई अंगणला जोडणारा चौक • जी.एल. पटेल रोडला जोडणारा चौक • नर्मदा हेरिटेज जवळ चौक • रामभाऊ म्हाळगी उद्यान जवळील चौक • राम नगर बस स्टॉप जवळील चौक
					खालील बस स्थानकांजवळ 50 मीटर पर्यंत नो पार्कींग झोन • क्वीन्स पार्कच्या बस स्टॉप • रामदेव पार्क चौक • ओम संगम प्लाझा • रामदेव पार्क • रामनगर 2 ऑटो रिक्षा स्टँन्ड या रस्त्यावर प्रस्तावित केल्या आहेत. (प्रत्येक दिशा आणि 500 मीटरने विभक्त केलेले स्थान) जास्तीत जास्त क्षमता असलेल्या 7 ऑटो रिक्षांसह
					निवासी सोसायट्यांना पार्कींगची तरतूद करण्यास कळविणे.
					• दोन्ही बाजंना रस्त्यावर पार्कींगचे (कारसाठी एक बाजू आणि

					दुचाकीसाठी एक बाजू) योग्य सीमांकनेसह पार्कींग क्षेत्र रामदेव पार्क जवळील कार आणि दुचाकी प्रस्तावित करणे आवश्यक आहे. • कारला केवल समांतर पार्कींगची परवानगी आहे.
4	संत तुकाराम रोड	पार्कींग सुविधा नाही	188 दुचाकी वाहने (3378 चौ.मी.)	अतिरीक्त 58 दुचाकी वाहने (1044 चौ.मी.)	100 मीटरसाठी नो पार्कींग क्षेत्र: • संत तुकाराम मार्गासह गोल्डन नेस्ट सर्कल जवळ • स्पोर्ट्स कॉम्पलेक्स जवळ
					खालील बस स्थानकांजवळ 50 मीटर नॉन-पार्कींग झोन • नवीन गोल्डन नेस्ट बस स्टॉप • सुखरंजनी बस थांबा • 3 इंद्रलोक टप्पा 2 बस स्टॉप्स
					• या रस्त्यासह व्यावसायिक वापर असलेल्या क्षेत्राजवळ पर्यायी दिवशी ऑन स्ट्रीट पार्कींग पुरविले जाऊ शकते. • समांतर पार्कींगची परवानगी पाहिजे आणि पार्कींग क्षेत्र रस्त्यावरील चिन्हे आणि खुणासह मर्यादा असणे आवश्यक आहे.
					• ऑटोमोबाईल शोरुम आणि गॅरेज पदपथावर/ कॅरेजवेवर जागा लक्षणीय वापरात आहेत. त्यामुळे वाहतूक अडथळा आणि पादचारी पादचार्यांना हलणे अवघड होते. म्हणूनच अतिक्रमण टाळण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
5	सृष्टी रोड	पार्कींग सुविधा नाही	243 दुचाकी वाहने (4365 चौ.मी.)	अतिरीक्त 75 दुचाकी वाहने (1350 चौ.मी.)	निवासी इमारती मध्ये परीसरातील रहिवाशांसाठी पार्कींगची जागा सुनिश्चित करण्यासाठी धोरण गरजेचे पर्यायी दिवस (पी 1-पी 2) ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (समांतर फक्त) या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी प्रस्तावित केले जाऊ शकते कारण रस्ता पुरेसा रुंद आहे.
					वाहने लोडिंग आणि अनलोडिंगसाठी फक्त दिवसाच्या ठराविक तासांमध्ये जागेची सीमारेषेवर व्यवस्था करणे आवश्यक आहे.

					50 मीटर पर्यंत नॉन-पार्कींग क्षेत्र: • सृष्टी शॉपिंग सेंटर बस स्टॉप • ओम शांती चौक • जांगीड सर्कल • मिरा भाईंदर रोडला जोडणारा चौक
6	लोढा रोड	पार्कींग सुविधा नाही	310 दुचाकी वाहने (5579 चौ.मी.)	अतिरीक्त 96 दुचाकी वाहने (1728 चौ.मी.)	ऑन-स्ट्रीट पार्कींग कार आणि दुचाकीसह व्यवसायिक वापर असल्याने पुरविणे. केवळ कारसाठी समांतर पार्कींग करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे आणि पार्कींग क्षेत्र, रस्त्यावर पट्टे मारणे.
7	भक्ती वेदान्त रोड	पार्कींग सुविधा नाही	294 दुचाकी वाहने (5297 चौ.मी.)	अतिरीक्त 92 दुचाकी वाहने (1656 चौ.मी.)	• या रस्त्यावरील मुख्य केंद्र हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था आणि निवासी सोसायटीज आहेत. • म्हणूनच या केंद्रांना त्यांच्या संबंधित आवारत ऑफ-स्ट्रीट पार्कींग सुविधा देण्याचा निर्देश देणे आवश्यक आहे. • दुचाकी आणि कारसाठी ऑन-स्ट्रीट सशुल्क वाहनतळ सुविधा या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पुरवली जावी. • कारला समांतर पार्कींग परवानगी द्यावी आणि पार्कींग क्षेत्र चिन्ह आणि खुणा सह निर्धारीत करणे आवश्यक आहे. भक्ती वेदांत बस स्टॉप आणि रॉयल कॉलेज बस स्टॉप जवळ 50 मीटर नॉन-पार्कींग क्षेत्र
8.	मिरा रेल्वे स्टेशन रस्ता	मोकळी जागा ऑफ-स्ट्रीट पार्कींग सुविधा	194 दुचाकी वाहने जागा (3495 चौ.मी.)	अतिरिक्त 61 दुचाकी वाहने (1098 चौ.मी.)	• मिरा स्टेशनजवळ उपलब्ध असलेली ओपन स्पेस सशुल्क वाहनतळसुविधा दुचाकी आणि कार दोन्हीसाठी मल्टीस्तरीय पार्कींग सुविधा अद्यावत केली पाहिजे. • या रस्त्याजवळ ज्यात पार्कींगची जागा नाही अश्या सोसायटीच्या रहिवाश्यांसाठी या सुविधेचा विस्तार केला जाऊ शकतो. • अशा रहिवाशांसाठी मासिक पास प्रणाली प्रदान केली जाऊ शकते.

		स्काय वॉक खाली रेल्वे स्टेशन जवळ पार्कींग			• मिरा रेल्वे स्टेशनपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक. • रसाझ सर्कलच्या जवळ 50 मीटर पर्यंत नो-पार्कींग झोन म्हणून घोषित करणे. • रसाझ सर्कल ते होली क्रॉस कॉन्वेंट स्कुल बस स्टॉप नो-पार्कींग झोन म्हणून घोषित करणे. • बस स्टॉपच्या 50 मीटर पर्यंत पार्कींगची परवानगी देऊ नये. • मिरा स्टेशन जवळील ऑटो रिक्शा स्टेशनाशिवाय रसाझ सर्कलजवळ 50 मीटरवर जास्तीत जास्त 7 ऑटो रिक्षासाठी एक अजून रिक्षा स्टॅन्ड प्रस्तावित आहे. • मिरा स्टेशन जवळ 10 टॅक्सीची क्षमता असलेला स्टँड करणे.
					• डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड ते रसाझ सर्कल पर्यंत मिरा स्टेशन येथे पार्कींग क्षेत्र (दुचाकी आणि कारसाठी दोन्ही बाजूंनी) उपलब्ध करावे. • तथापि, 50 मीटर चौकमध्ये सर्व बाजूंनी नो-पार्कींग झोन कार्यान्वित करणे आवश्यक आहे.
9.	पुनम सागर रस्ता	पर्यायी ऑन-स्ट्रीट पार्कींग प्रदान केले आहे	264 दुचाकी वाहने जागा (4752 चौ.मी.)	अतिरिक्त 82 दुचाकी वाहने (1476 चौ.मी.)	पार्कींग क्षेत्र नाही.
					• स्टेशनपासून ते सेक्टर 10 पर्यंत शांती नगर बस थांबा. • जवळजवळ 50 मीटर नॉन-पार्कींग क्षेत्र • पुनम सागर बस स्टँड • कॅसेडेला बस स्टँड • शांती नगर सेक्तर 10 बस स्टॉप • मिरारोड मार्केट • इंदीरा गांधी हॉस्पीटल • पर्यायी पार्कींग व्यवस्थेच्या बरोबरीने अंमलबजावणी कार्यान्वित करणे.
10.	गोल्डन नेस्ट ते सृष्टी	पार्कींग सुविधा नाही.	222 दुचाकी वाहने	अतिरिक्त 79 दुचाकी वाहने (1422 चौ.मी.)	बस स्टॉपच्या जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग नाही. • सावरकर बस स्टॉप

	छत्रपती शिवाजी महाराज मार्ग		जागा (3996 चौ.मी.)		• श्रीनाथ कॉम्पलेक्स बस स्टॉप • टाटा इंडिकॉम बस स्टॉप • शिवार गार्डन बस स्टॉप • कनाकिया जंक्शन • एस. के. स्टोन बस स्टॉप चौकपासून 50 मीटर पर्यंत कोणतेही पार्कींग क्षेत्र नाहीत. • गोल्डन नेस्ट सर्कलच्या सर्व दिशांना जाणारे रस्ते. • नयानगर चेकपोस्ट जंक्शन. • सिल्व्हर पार्क सृष्टी रोडला जोडणारा चौक.
					• या रस्त्यावर व्यावसायिक उपक्रम दृष्टीने दोन्ही बाजूंनी ठराविक ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (केवळ समांतर) प्रस्तावित करणे. • ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा रस्त्यावर स्पष्ट मार्कींग करून करू शकतात.
					ऑन-स्ट्रीट पार्कींग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे.
11.	सिल्व्हर पार्क ते राष्ट्रीय महामार्गावर (छत्रपती शिवाजी महाराज मार्ग)	पार्कींग सुविधा नाही.	194 दुचाकी वाहने जागा (3492 चौ.मी.)	अतिरिक्त 60 दुचाकी वाहने (1080 चौ.मी.)	बस स्टॉपच्या जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग नाही. • सिल्व्हर पार्क बस स्टॉप. • हिट्को कंपनी बस स्टॉप. • हटकेश बस स्टॉप. • ग्रीन अकादमी, जेत इन्फोसिस बस स्टॉप. • प्लेझंट पार्क बस स्टॉप. • पंजाब फाऊंड्री.
					काशिमिरा जंक्शनपासून पंजाब फाऊंड्री बस स्टॉपपर्यंत कोणतेही पार्किंग सुविधा देऊ नये.
					• मार्गाच्या उर्वरित भागांमध्ये व्यावसायिक उपक्रमांचा विचार करुन ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (केवळ समांतर) प्रस्तावित केली जाऊ शकते. • या रोडवर भरपूर औद्योगिक उपक्रम असल्याने, गाड्या चढवणे

					आणि उतरवणे नियमन आवश्यक आहे. • व्यावसायिक वाहने चढवणे आणि उतरवणे यासांठी कारखान्यांच्या जवळ आणि त्यांच्या आवारामध्ये ठराविक भाग ठेवणे आवश्यक आहे.
12	गोल्डन नेस्ट ते फाटक रोड	पर्यायी ऑनस्ट्रिट पार्कींग	326 दुचाकी वाहने (5862 चौ.मी.)	अतिरिक्त 101 दुचाकी वाहने (1818 चौ.मी.)	ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे.
13	बाळाराम पाटील रोड	रस्त्यांवर (विषम सम) पार्कींग योग्यरितीने होत नाही	144 दुचाकी वाहने (2594 चौ.मी.)	अतिरिक्त 45 दुचाकी वाहने 810 चौ.मी)	• स्टेशन रोड पासून प्रवेश प्रतिबंधित करुन बी.पी. रोड एकेरी रस्त्यावर रुपांतरीत केला जावा.
					• जरी प्रणाली योग्यरित्या अंमलात आणली जात नाही, तरी पर्यायी दिवसांची (सम-विषम) पार्कींगची तरतूद आहे.
					• तुलनेने कमी व्यावसायिक उपक्रममध्ये पार्कींग क्षेत्राची मर्यादा स्पष्ट असली पाहिजे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही. • अंमलबजावणी कडक केली पाहिजे.
					• किमान गर्दीच्या वेळी व्यावसायिक वाहनांची हालचाल नियंत्रित करणे आवश्यक आहे.
					• रस्ता अरुंद असल्याने रस्त्यावर शक्यतो ऑटो - रिक्षा चालवण्याचे नियमन करणे अत्यावश्यक आहे. • शक्यतो हया रस्त्यावर रिक्षा स्टँड अनुज्ञेय करु नये.
					या रस्त्यावर बसेसची देखील वाहतूक सुरु आहे, म्हणून व्यावसायिक वाहनांचे चढवणे आणि उतरवणे यांचे काटेकोरपणे नियमन करणे अत्यावश्यक आहे.
14	केबिन रोड	पार्कींग सुविधा नाही	113 दुचाकी वाहने जागा (2031 चौ.मी.)	अतिरिक्त 35 दुचाकी वाहने (630 चौ.मी.)	रस्ता अरुंद असल्यामुळे , हा रस्ता केबिन रोड पोलीस चौकीपासून एकेरी वाहतुकीमध्ये रुपांतरीत केला जाऊ शकतो.
					रेल्वे रुळाच्या बाजुने दुचाकी आणि कार साठी सशुल्क वाहनतळ दयावा

					ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे.
15	गोडदेव फाटक रोड	पार्कींग सुविधा नाही	209 दुचाकी वाहने जागा (3759 चौ.मी.)	अतिरिक्त 65 दुचाकी वाहने (1170 चौ.मी.)	• रस्ता अरुंद आहे आणि म्हणून रस्ता नो- पार्किंग झोन म्हणून घोषित करणे आवश्यक आहे. • ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे. जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतुक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. • किमान गर्दीच्या वेळी व्यावसायिक वाहनांची हालचाल नियंत्रित करणे आवश्यक आहे.
16	मॅक्सेस मॉल शेजारील रस्ता.	मॉल गोव्हर्ससाठी मॅकसेस मॉल रोड येथे खासगी पार्कींगसाठी सुविधा आहे.	198 दुचाकी वाहने (3572 चौ.मी.)	अतिरिक्त दुचाकी वाहने 62 (1116 चौ.मी.)	मेक्सस मॉल रस्त्यावर नो-पार्किंग लागू करण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, कारण सुविधा मॉल गोव्हर्ससाठी उपलब्ध आहे आणि ऑफ - स्ट्रीट पार्कींग सुविधा कल्याण ज्वेलरी सर्व्हिस सेंटरमागे आहे.
17	पंडीत भिमसेन हॉस्पीटल रस्ता				• या ररस्त्यावर नो-पार्कींगची कठोर अंमलबजावणी. • वाहतूक सदर रस्त्यावर एकेरी मार्ग (मांडली तलाव ते भिमसेन जोशी हॉस्पीटल) करावा.
18	मिरा भाईंदर मुख्य कार्यालय समोरील रस्ता (स्टेशन रोड)	100 दुचाकी आणि 35 कार क्षमता असलेले ऑफ स्ट्रीट पार्कींग महानगरपालिका मुख्य कार्यालय मध्ये दिले गेले आहे.	179 दुचाकी वाहने (3213 चौ.मी.)	अतिरिक्त दुचाकी वाहने 55 (990 चौ.मी.)	- पोलिस स्टेशन ते महानगरपालिका कार्यालयासमोर नो-पार्कींग क्षेत्र म्हणून अंमलबजावणी करावी. - बस स्टॉप जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग मंजूर करु नये.
					• क्रॉस गार्डन बस स्टॉप • जैन मंदिर बस स्टॉप • बॉम्बे मार्केट • बालाजी नगर बस स्टॉप
					• उर्वरित रोड पर्यायी दिवशी पार्किंग (पी1 - पी 2) उपयोगात आणला जाऊ शकतो • या रस्त्यावरील रहदारीचा प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी अतिक्रमणे हटवावे लागतील.
					• खेतेश्वर चौकाजवळ 100 मीटर 7

					ऑटो-रिक्षा क्षमता असलेले रिक्षा स्टॅन्ड देणे आवश्यक आहे. • महानगरपालिका समोरील बस स्टॉप जवळ 100 मीटरवर 7 ऑटो - रिक्षा क्षमता असलेले रिक्षा स्टॅन्ड देणे आवश्यक आहे.
					• महापालिका कार्यालया समोरील रघुनाथ म्हात्रे मार्ग ते नगरभवन इमारतीपर्यंत एकेरी वाहतूक रस्ता म्हणून अमलात आणावा.
19	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (60 फुट व 90 फुट रस्ता)	पार्कींग सुविधा नाही	174 दुचाकी वाहने जागा (3132 चौ.मी.)	अतिरिक्त दुचाकी वाहने 54 (972 चौ.मी.)	• पर्यायी दिवशी (पी 1 - पी 2) दुचाकी आणि कार साठी ऑन-स्ट्रीट पार्कींग.
					• जानकी रेसिडेन्सी बस स्टॉपच्या जवळ 50 मीटरवर नो-पार्कींग क्षेत्र कार्यान्वित केले जावे.
					• जानकी रेसिडेन्सी बस स्टॉपच्या जवळ 100 मीटरवर ऑटो रिक्षा स्टॅन्ड केले जावे
					• शक्यतो या रोडवरील सोसायटी आणि व्यावसायिक संकुल याना ग्राहकांसाठी पार्कींग सुविधा देण्याची सुचना देणे आवश्यक आहे. • फेरीवाल्यानी महत्त्वाचा 60 फुट रस्त्याचा भाग व्यापला आहे, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. • या रस्त्यावर पार्कींग करण्यास अनुमती दिली गेल्यामुळे वाहतूक समस्या होऊ शकते, म्हणुनच खेतेश्वर चौकापर्यंत 60 फुट रस्त्यावर नो पार्कींग झोन असणे आवश्यक आहे. • 60 फीट रोड ते उड्डाणपूल चौकापर्यंत वैकल्पिक दिवशी पार्किंग प्रदान केले जावे.

सन्माननीय सदस्य यांनी खालीलप्रमाणे पार्कींग व नो पार्कींगची ठिकाणे सुचविलेली आहेत.

प्रभाग क्रमांक	पार्किंग	नो-पार्किंग
1	भाईंदर (प.) स्टेशन स्कायवॉक खाली	बालाजी नगर विनायक नगर मोदी पटेल रोड

		रेल्वे समांतर रस्ता बसडेपोवर बसशिवाय पार्कीग होऊ नये.
		गणेशनगर आनंदनगर क्षेत्र
2	1) अंबे माता मंदीर पासून (जेसलपार्क) ते पाण्याची टाकीपर्यंतचा रस्ता वन वे पी-1 व पी-2 करणे 2) अंबे माता मंदीर पासून (जेसलपार्क) च्या समोरुन ते कपूर टॉवर पर्यंत वन वे पी-1 व पी-2 करणे	जय अंबेनगर राजश्रीपार्क ते गणेश आनंद नगर.
		1) बंदरवाडी रेल्वे समांतर रस्ता आशिर्वाद हॉस्पीटल अंबे माता मंदीर पासून जैन मंदीर पासून सब वे पर्यंत 2) सागर बिल्डींग 1 जेसलपार्क से अक्षिता (आरएनपी पार्क) पर्यंत 3) मयुरपंख (नवघर रोड) तलाव रोड तुलसी महल पर्यंत 4) संम्पुर्ण जेसलपार्क जैन मंदीर राहुल पार्क आर एनपी पार्क पासून काशि विश्वनाथ मंदीर पर्यंत
		तलावरोड,बी.पीरोड, नवघर रोड, एक बाजु स्टेशन रोड समांतर
3		1) एसव्ही रोड ते आर एन पी पार्क मार्ग 2) कस्तुरी पार्क प्रवेशदवार फादर जोसेफ शाळा ते टिनी टॉइज शाळेकडील मार्ग 3) आरएनपी पार्क येथील अरविंद पार्क इमारत ते पवन पॅलेस 4) सरस्वती नगर ते भारतरत्न श्री सचिन तेंडुलकर मैदान 5) सुदर्शन बिल्डींग ते साई पार्क बिल्डींग नवघर रोड मार्ग
	1) सचिन तेंडुलकर मैदानाच्या बाजुला (आरक्षण क्र.110 तात्पुरते पे ॲन्ड पार्क) 2) आनंद दिघे मैदान, पाण्याच्या टाकी जवळ नवघर 3) आरएनपी पार्क अरविंद इमारतीच्या समोरील मोकळी जागा	
4	हिरापन्ना ते गोडदेव नाका पार्कीग समोरची जागा. गोडदेव नाका ते हनुमान मंदीर पी/1,पी/2	प्रभाग क्र.04 मधील नवघर रोड, तलाव रोड, बी.पीरोड गोडदेव नाका,येथील क्षेत्राचे नो पार्कीग.
	खारीगांव नाका ते गोडदेव नाका	नवघर पोलीस स्टेशनची गल्ली. प्रभात पाटील गल्ली वन वे करणे.
	गोडदेव नाका ते हनुमान मंदीर	भाईंदर (पूर्व) तलाव रोड परिसर
		भाईंदर (पूर्व) तलाव रोड परिसर
5		नर्मदा स्मृती इमारत ते साईरत्नम इमारत पर्यंत तसेच संपुर्ण केबीन रोड पासून ते स्टेशन रोड पर्यंत
		केबीन रोड

		बी.पीरोड विजय पंजाब
		जिथे गाडी पार्क करु शकतो तिथे पट्टे मारणे.
6		60 फुटी पार्कींग पट्टा, कमला पार्क समोरील एन्ट्रीमधील दोन्हीबाजूस नो पार्कींग झोन करणे. भाईंदर (प) 60 फुटी रोड गणेश मंदीर समोरील क्रॉस रोड, डॉ.दिंगबर केशव कुलकर्णी रस्त्यावरील उमा निवास ते शैलेश निवास इमारती लगत नो पार्कींग झोन तसेच साई छाया ते पार्श्व पुजा इमारती लगत व पर्ल सोसायटी लगत नो पार्कींग झोन.
7		राजेश हॉटेल गल्ली.
		शिवसेना गल्ली ते स्टेशन रोड जे.एच.पोद्दार स्कूल क्रॉस रोड कोबडीगल्ली नगरभवन वन वे अमरपॅलेस ते हनुमान मंदीर
8	1) अमृतवाणी सत्संग मार्ग 2) जे पी ठाकूर मार्ग मोटार सायकली रस्त्यावर उभ्या केल्या जातात 3) फाटक मार्गावर ठाकूर गल्ली ते गीता नगर पर्यंत अवजड वाहने उभी केली जातात 4) मॅक्सस मॉल ते मांडली तलाव मार्ग जड वाहनांना व खाजगी/सरकारी बसेसना नो एन्ट्री असून देखील तेथून ये जा करतात	राव तलाव वन वे नो पार्कींगचे पट्टे मारले बेकरी गल्ली / ठाकुर गल्ली एक बाजु
	पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल रस्ता एक बाजु क्रोमा रोड एक बाजु 150 रोड क्रोमाची लेन - नो पार्कींग	प्रभागातील हॉस्पिटल व शाळा परिसर नो पार्कींग असावेत. 1. टेंबारोड एक बाजू पी1/पी2 2. क्रोमाची गल्ली पी1/पी2 3. अमृतवाणी रोड पी1/पी2 4. गीतानगर पी1/पी2.
	1. क्रोमा शोरुम ते बँक ऑफ बडोदा पर्यंत (पी-1/पी-2) 2. ठाकुरगल्ली (पी-1/पी-2) 3. बेकरी गल्ली (पी-1/पी-2) 4. स्वामी सत्यानंन्द महाराज मार्ग, (पी-1/पी-2)	1. डॉन बॉस्को स्कूल रोड 2. वालचंन्द कॉम्पलेक्स ते टीना टॉवर.

9		1. सोनाली हॉटेल कडे जाणा-या रस्त्यावर ते आला हजरत मैदानासमोर 2. हिना अवेन्यु इमारत पासून ते व्हिनस बिल्डींग पासून ते हैदरी चौक (मुख्य रस्ता) 3. बानेगर शाळेपर्यंत रस्त्यावर डाव्या बाजूस 4. लोधा कॉम्पलेक्स ते राम रहिम बगीचा समोर 5. गीता नगर फेज 7 उडाण पुलाखाली मायरा मेंन्डोसा बगीचा दोन्ही बाजूस 6. आझाद नगर सिग्नल रहिमिया मस्जिद पासून भाईंदर फाटक पोलीस चौकी पर्यंत सम-विषय रस्त्यावर दोन्ही बाजूस 7. गिता नगर फेस 7 नर्मदा पॅराडाईस समोर पासुन ते गिता सरोवर इमारती पर्यंत दोन्ही बाजुस 8. गोल्डन नेस्ट सर्कल नयानगर कडे जाणारा रस्त्याच्या सर्कल्वर दोन्ही बाजूस
	1. एन एच शाळा मुख्य रस्ता सम विषम रस्त्याच्या दोन्ही बाजुस	1. सोनाली हॉटेल जाणा-या रस्त्यावर हजरत मैदानासमोर. 2. हिना ॲवेन्यु इमारतीपासून ते व्हिनस इमारतीपासून ते हैदरी चौक (मुख्य रस्ता) 3. बानेगर शाळेकडे जाणा-या रस्त्यावर डाव्या बाजूस 4. लोधा कॉम्पलेक्स येथे राम-रहिम बगीच्यासमोर 5. गीता नगर फेज 7 उड्डाणपुलाच्या खाली मायरा मेंन्डोसा बगीच्या दोन्ही बाजुस 6. आझाद नगर सिग्नल, त रेहमानिय मस्जिद पासून ते भाईंदर रेल्वे फाटक (पोलीस चौकी) पर्यंत सम विषम रस्त्याच्या दोन्ही बाजुस 7. गीता नगर फेस 7 नर्मदा पॅराडाईस समोर ते गीता सरोवर इमारती पर्यंत
10	1) गोल्डन नेस्ट सिग्नल ते इंद्रलोक (स्व. प्रफुल्ल पाटील चौक) सम विषम पार्किंग करणे 2) हनुमान मंदीर (न्यु गोल्डन नेस्ट) ते सेवन इलेवन चौक सम विषम पार्किंग करणे 3) विमल डेरी ते इंद्रलोक नाका (स्व. प्रफुल्ल पाटील चौक) पर्यंत नो पार्किंग करणे अथवा सम विषम पार्किंग करणे 4) गुरुजी चौक ते सेवन इलेवन चौक पर्यंत सम विषम पार्किंग करणे 5) इंद्रलोक नाका ते ओमशांती चौक सम विषम पार्किंग करणे 6) फाटक ते विमल डेरीपर्यंत सम विषम पार्किंग करणे 7) फाटक ते गोल्डन नेस्ट सिग्नल पर्यंत सम विषम पार्किंग करणे 8) अभिनव नाका ते मनपा शाळा क्र.8 पर्यंत नो पार्किंग करणे 9) स्व. विनायक घरत मार्ग (गोडदेव नाका ते शिवहरी फरसाण मार्ट पर्यंत) नो पार्किंग करणे	विमलडेरी इंद्रलोककडे येणार रस्ता गोल्डन नेस्ट ते सरळ गावात जाणारा रस्ता.

11		1. न्यु गोल्डन नेस्ट पुर्ण रस्ता 2. रामदेव पार्क 3. बाळासाहेब ठाकरे उद्यान क्षेत्र 4. ऑरेंज हॉस्पिटल परिसर
14		1) गावदेवी जरीमरी मंदीर मार्ग 2) जनता नगर (धारावी मंदीर मार्ग) नीलकमल प्रवेशद्वार ते लिबर्टी तबेला पर्यंत 3) मनाली विलेज ते ग्रीन विलेज येथील रस्ता
		राष्ट्रीय महामार्ग क्र.8
15		1) नताशा पार्क ते भक्तीवेदांत 2) अजित पॅलेस हॉटेल ते गणेश मंदीर 3) भक्तीवेदांत हॉस्पीटल ते डेल्टा 4) अमर पॅलेस हॉटेल ते अभित पटेल अपार्टमेंट 5) प्लेझंट पार्क डॉन बॉस्को शाळेसमोर 6) अजित पॅलेस ते काशिमिरा नाका सर्विस रोड
	डेल्टा गार्डन पासून पांडुरंगवाडी ते लोढा नो पार्कींग डेल्टागार्डन पासून ते हरिकृष्णमंदीर - नो पार्कींग	1. हरेकृष्ण मंदिर ते डेल्टा गार्डन संकुलपर्यंत 2. हरिओम सोसा ते पांडुरंग वाडी पर्यंत 3. पांडुरंग वाडी ते लोढा हायवे पर्यंत 4. अजित पॅलेस ते काशीमिरा शिवाजी पुतळायापर्यंत हायवे (सर्व्हिस रोड) 5. शिवाजी पुतळा ते सिल्वर पार्क भाईंदर रोड पर्यंत फुटपाथ वरील पार्कींग 6. मिरागांव हनुमान मंदिरा समोरील पार्कींग. 7. मिरागांव ते मुंन्शी कम्पाऊण्ड रोड वरील पार्कींग 8. मिरागांव अमर पॅलेस हॉटेल ते अबिद पटेल 9. प्लेझंट पार्क (डॉन बॉस्को स्कुल) ते काशीमिरा रोड अग्रवाल कम्पाऊण्ड डायमंड टॉवरच्या नाक्यापर्यंत 10. अंबरप्लाझा हॉल समोर व संघवी नगर ते अंबल प्लाझा हॉलपर्यंत 11. श्रीश्वाश्वत कॉमपलेक्स ते मानस सरोवर ते खोडीयार कुंज बिल्डींग समोरील रस्ता.

		1) मिरागाव हनुमान मंदीर समोर 2) अमर पॅलेस बाजुचा रोड 3) अजित पॅलेस ते चेकनाका रोड 4) चेकनाका ते शिवाजी पुतळा पर्यंत 5) काशिमिरा नाका ते संघवी नगर हायवे फुटपाथ रोड 6) प्लेजंट पार्क डॉन बॉस्को रोड ते डायमंड टॉवर 7) अंबर प्लाझा हॉल समोर ते संघवी गार्डन रोड 8) श्री शाश्वत कॉम्प्लेक्स आतील रोड जुना प्लेजेंट पार्क रोड
16		1. अजित पॅलेस हॉटेल ते गणेश मंदीर स्टॉप पेणकरपाडा नो पार्कीग झोन 2. सृष्टी से - 1 व 2 रॉयल कॉलेज भक्तीवेन्दांत हॉस्पिटल व डालमिया कॉलेज 3. शांतीधाम, शांतीपार्क, ते न्यु म्हाडा व सुर्या शॉपिंग सेंटर पर्यंत परिसर नित्यानंद नगर सेंट पॉल स्कूल पर्यंतचा परिसर.
		1) पुनम क्लस्टर 1 ते हायनेस पार्क पर्यंत 2) म्हाडा प्रेम नगर शांती गार्डन ते शांती धाम पर्यंत 3) सुर्या शॉपिंग सेंटर समोरील पुनम क्लस्टर 3 ते सृष्टी सेक्टर 2 पर्यंत 4) म्हाडा राजमुद्रा ते शिवसेना शाखेपर्यंत
		1) म्हाडा शांती गार्डन ते शांती धाम पर्यंत 2) पुनम क्लस्टर 1 ते हायनेस पार्क पर्यंत 3) एमआयडीसी रॉयल पार्क ते इस्कॉन, रॉयल कॉलेज पर्यंत 4) गुरुदेव बिल्डींग ते हेतल पार्क
17		1. सेंट झेवियर स्कूल जवळ शांतीपार्क. 2. संघवीनगर ते अंबरप्लाझा पर्यंत (हायवे)
18		सिनेमॅक्स समोरील ईडन रोझ कॉम्पलेक्स. पुनम गार्डन ते सालासर गार्डन.
		पुनम गार्डन युनिक हाईटस ते साई सरस्वती धाम हरिया ड्रीम पार्क अशोका हॉटेल्ते रुतू पॅराडाईस पर्यंत. अशोका हॉटेल हरिया पार्क ते वेदांत हायस्कुल
19	1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी	1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस 2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग

	हलकी वाहने पार्किंग 5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग 6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग	
	1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग 5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग 6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग	1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस 2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग
	एस.के.स्टोन ते मिरारोड स्टेशन शांतीनगर व नयानगर रस्ता एक बाजू पार्कींग	
	1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम 4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग 5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग 6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग	1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस 2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग
20		ईशा वाईन ते सेक्टर 10 च्या कोप-या पर्यंत.
21	1) मिरारोड स्टेशन स्काय वॉल्क च्या खालील जागेत मिरारोड पोलिस चौकीच्या बाजुस रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्किंग झोन करणे 2) टीएमटी बस स्टँडच्या बाजुला मोकळ्या जागेवरील पार्किंग झोन करणे	1) शांतीनगर सेक्टर क्र.1 बि.क्र.ए-64 ते शरयु माता चौक पर्यंत आणि शांती एन्क्लेव्ह बिल्डींग पासुन ते शांती विहार ए-8 पर्यंत सम विषय दिवस पार्किंग करणे. 2) न्यु इंडीया बँक सेक्टर क्र.1 ते टीएमटी बस थांबा पर्यंत नो-पार्किंग झोन करणे 3) शांती शॉपिंग सेंटर रिक्षा स्टँड रस्त्याच्या दोन्ही बाजूस व स्टेशन मुख्य गेट समोर नो-पार्किंग झोन करणे 4) मिरारोड रेल्वे टीकीट काऊंटर रिक्षा स्टँड (दहिसर साईड) ते साई कॉम्प्लेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊंड भिंतीची

		साईडला नो पार्किंग झोन करणे 5) मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयु माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस नो पार्किंग झोन करणे 6) शरयु माता चौक ते गणेश चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम दिवस पार्किंग झोन करणे 7) सृष्टी सेक्टर क्र.3 व सुर्या शॉपिंग सेंटरच्या समोरच्या बाजुस नो पार्किंग झोन करणे 8) शांती शॉपिंग सेंटर व शांती इनकेव्ह रोड वरील दोन्ही बाजू पार्कींग करणे.
	1) मिरारोड स्टेशन स्काय वॉल्क च्या खालील जागेत मिरारोड पोलिस चौकीच्या बाजुस रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्किंग झोन करणे 2) टीएमटी बस स्टँडच्या बाजुला मोकळ्या जागेवरील पार्किंग झोन करणे	1) शांतीनगर सेक्टर क्र.1 बि.क्र.ए-64 ते शरयु माता चौक पर्यंत आणि शांती एन्क्लेव्ह बिल्डींग पासुन ते शांती विहार ए-8 पर्यंत सम विषय दिवस पार्किंग करणे. 2) न्यु इंडीया बँक सेक्टर क्र.1 ते टीएमटी बस थांबा पर्यंत नो-पार्किंग झोन करणे 3) शांती शॉपिंग सेंटर रिक्षा स्टँड रस्त्याच्या दोन्ही बाजूस व स्टेशन मुख्य गेट समोर नो-पार्किंग झोन करणे 4) मिरारोड रेल्वे टीकीट काऊंटर रिक्षा स्टँड (दहिसर साईड) ते साई कॉम्प्लेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊंड भिंतीची साईडला नो पार्किंग झोन करणे 5) मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयु माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस नो पार्किंग झोन करणे 6) शरयु माता चौक ते गणेश चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम दिवस पार्किंग झोन करणे 7) सृष्टी सेक्टर क्र.3 व सुर्या शॉपिंग सेंटरच्या समोरच्या बाजुस नो पार्किंग झोन करणे
	1. मिरारोड स्टेशन स्काय वॉकच्या खालील जागेत मिरारोड पोलीस चौकी बाजुच्या रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्कीग झोन. 2. टी.एम.टी बस स्टॅण्ड बाजुला मोकळ्या जागेवर पार्कीग झोन 3. से 1 गणेश चौक ते झुलेलाल चौकपर्यंत पी1/पी/2	1. शांती नगर से - 1 बि.क्र.ए/64 ते शरयू माता चौक पर्यंत आणि शांती शॉपिंग सेंटर पासून ते शांती विहार ए/8 पर्यंत सम विषम दिवस . 2. न्यु इंडिया बँक सेक्टर क्र 1 ते टी.एम.टी. बस थांबा पर्यंत 3. शांती शॉपिंग सेंटर रिक्षा सॅण्डा रस्त्याच्या दोन्ही बाजुस व स्टेशन मुख्य गेट समोर 4. मिरारोड रेल्वे टिकिट काऊटर रिक्षा स्टॅण्ड (दहिसर साईड) ते साई कॉम्पलेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊड भिंतीची साईडला नो पार्कीग 5. मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयू माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस 6. शरयु माता चौक ते गेणेश चौ परंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम-विषम दिवस 7. सुष्टी से - 3 व सुर्या शॉपिंग सेंटर समोर बाजुस नो-पार्कीग झोन
22	1. मिरारोड नयानगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत (रस्त्याची उजवी बाजू) 2. मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नयानगर पोलीस ठाणे ते लोढा एफ ओ.बी पर्यंत.. 3. मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाकापर्यंत (शम	मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत (दोन्ही बाजू)

	विषम दिवस) 4. मिरारोड निहाल हॉटेल ते हैदरी चौक पर्यंत (शम विषम दिवस) 5. हैदरी चौक ते एन.एच शाळा पर्यंत (सम विषम दिवस)	
		मिरारोड रेल्वे स्थानक शेजारी अझीजीया मस्जीद जवळ नोपार्किंग
	1) मिरारोड नया नगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत रस्तयाची उजवी बाजू 2) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नया नगर पोलिस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत सम विषम 3) मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत सम विषम 4) हयद्री चौक ते एनएच शाळा पर्यंत सम विषम	1) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत 2) मिरारोड निहाल हॉटेल ते हयद्री चौक पर्यंत 3) एनएचचौक ते रसाज चौक पर्यंत
	1) मिरारोड नया नगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत रस्तयाची उजवी बाजू 2) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नया नगर पोलिस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत सम विषम 3) मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत सम विषम 4) हयद्री चौक ते एनएच शाळा पर्यंत सम विषम	1) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत 2) मिरारोड निहाल हॉटेल ते हयद्री चौक पर्यंत 3) एन.एच. चौक ते रसाज चौक पर्यंत
23		भाईंदर (प.) डी मार्ट माहेश्वरी भवन रोड एस व्ही रोड आणि सुभाषचंद्र बोस मैदान रोड.

ठराव क्र. :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मे. सी.आय.आर.टी. च्या अहवालाची अंमलबजावणी करणे व प्रस्तावित केल्यानूसार धोरण निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. नो पार्कींग क्षेत्रात तातडीने फलक लावण्यात यावे. पार्कींग क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी निविदा मागवून कंत्राटदार नेमण्यात यावा. तसेच प्रशासकीय कार्यवाहीचे सर्व अधिकार व धोरणात बदल करण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हसमुख गेहलोत **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

From SK Stone Police chaokl to Geeta Arcade CHS. (For Private Buses & Vahicle) All internal roads of residential complexes.

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

अ.क्र.	स्थळ	पार्किंग	नो पार्किंग
१	मिरा रोड नयानगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत	रस्त्याची उजवी बाजु	
२	मिरारोड श्रीकांत धावडे मार्ग शम्स मस्जिद पर्यंत	नाही	दोन्ही बाजु
३	मिरारोड श्रीकांत धावडे मार्ग नया नगर पोलीस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत	सम विषम दिवस	
४	मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत	सम विषम दिवस	दोन्ही बाजु
५	मिरारोड निहाल हॉटेल ते हैदरी चौक पर्यंत	नाही	नाही
६	हैदरी चौक ते एन एच शाळा पर्यंत	सम विषम दिवस	दोन्ही बाजु
७	एन एच चौक ते रसाज चौक पर्यंत	नाही	नाही

सिंगापूर प्लाझा ते कॉर्पोरेशन बँक प्रवेश बंद रात्री १०pm ते ६ am करण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

जुबेर अ. इनामदार

नगरसेवक

गटनेता - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

मिरा-भाईंदर महानगरपालिका

कार्यकरी अभियंता

सार्वजनिक बांधकाम विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

जिल्हा ठाणे

आमारसदनिन नो पार्किंग
18/4/2018

विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्रं २२ अंतर्गत वाहने पार्किंग नो पार्किंग मा महासभा दि 02/05/2018 ठरवा साठी सूचना

महोदया,

उपरोक्त विषयी मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात प्रभाग निहाई पार्किंग नो पार्किंग नियोजनासाठी सूचना.

तरी सूचना खालील परिष्टप्रमाणे.

पार्किंग नो पार्किंग

अनू	स्थळ	पार्किंग	नो पार्किंग
१	मिरा रोड नया नगर कार्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत	रस्त्याचा उजवी बाजू	
२	मिरा रोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत	नाही	दोन्ही बाजु
३	मिरा रोड श्रीकांत धाडवे मार्ग नया नगर पोलिस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत	शम विषम दिवस	
४	मिरा रोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत	शम विषम दिवस	दोन्ही बाजु
५	मिरा रोड निहाल हॉटेल ते हयद्री चौक पर्यंत	नाही	नाही
६	हयद्री चौक ते एन एच शाळा पर्यंत	शम विषम दिवस	दोन्ही बाजु
७	एन एच चौक ते रसाज चौक पर्यंत	नाही	नाही

मि. भा. म. न. पा.
सा. बां. विभाग
१९५
18/4/18

18/4/18

PTO

निवास : १०१, मिरा स्मृती अपार्ट., नयानगर, मिरा रोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.

मुख्य कार्यालय : सेंटर काँग्रेस कार्यालय, नयानगर, मिरा रोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.

भ्रमणध्वनी : 98203 18999 E-mail ID : inamdarzub@yahoo.com

जुबेर अ. इनामदार

नगरसेवक

गटनेता - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

मिरा-भाईंदर महानगरपालिका

सिंगापूर प्लाझा ते कार्पोरेशन बँक प्रवेश बंद रात्री १० pm ते ६ am करण्यात यावे वरील सूचना प्रभागाचे सकोळ अभ्यास करून करण्यात आलेले आहे तरी त्याला मान्यता देण्यात यावे ही विनंती

आपला विनंतीकारी

निवास : १०१, मिरा स्मृती अपार्ट., नयानगर, मिरा रोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.

मुख्य कार्यालय : सेंटर काँग्रेस कार्यालय, नयानगर, मिरा रोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.

भ्रमणध्वनी : 98203 18999 E-mail ID : inamdarzub@yahoo.com

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.०२/०५/२०१८

(दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्रमांक (११) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भूखंड वितरीत व विकसित करण्यासाठी धोरण निश्चित करणे.

ठराव क्रमांक ( ) :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकसित करण्यासाठी दि.२६/०२/२०१८ रोजीच्या महासभेत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. मा.महासभेने ठराव क्र.७९ अन्वये तदर्थ समिती गठीत करण्याबाबत निर्णय घेतला. मा. महासभा दि.२६/०२/२०१८ ठराव क्र.७९ अन्वये गठीत समितीची बैठक महापौर यांच्या दालनात दि.१५/०३/२०१८ रोजी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खालील पदाधिकारी / अधिकारी उपस्थित होते.

श्रीम. डिम्पल मेहता	महापौर
श्री. चंद्रकांत वैती	उपमहापौर
श्री. ध्रुवकिशोर पाटील	सभापती, स्थायी समिती
श्री. रोहिदास पाटील	सभागृह नेता
श्री. राजु भोईर	विरोधी पक्ष नेता
श्री. हसमुख गेहलोत	गटनेता, भाजपा
श्री. हरिश्चंद्र आमगांवकर	गटनेता, शिवसेना
श्री. जुबेर इनामदार	गटनेता, राष्ट्रीय काँग्रेस
श्री. शिवाजी बारकुंड	शहर अभियंता
श्री. श्रीकांत देशमुख	सहाय्यक संचालक नगररचना
श्री. दिपक खांबित	कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्री. भास्कर बाबर	शिक्षण अधिकारी
श्री. सुरेश देशमुख	प्रशासन अधिकारी
श्रीम. सई वडके	विधी अधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकास करण्यासाठी उपस्थितासमोर प्रशासनामार्फत सविस्तर माहिती सादर करण्यात आली. सदर बैठकीत चर्चा होऊन ठरविलेल्या धोरणाचा मसूदा आयुक्त त्यांच्या अभिप्रायासह गोषवाऱ्यात नमूद करून सादर केलेला आहे.

<u>प्रस्तावना</u> :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असून शहराची सन २०११ च्या जनगणनेनूसार लोकसंख्या ८.१४ लक्ष एवढी आहे. सद्यस्थितीतील लोकसंख्या सुमारे १२ लक्ष एवढी असून लोकसंख्या वाढीच्या दरानूसार सन २०३६ या वर्षात सुमारे २८.५० लक्ष एवढी लोकसंख्या होण्याचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. सद्यस्थितीमध्ये मिरा भाईंदर शहरामध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने महानगरपालिकेमार्फत व खाजगी संस्थामार्फत विकसित करण्यात आल्या आहेत. अस्तित्वातील शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने प्राथमिक, माध्यामिक व उच्च माध्यामिक शिक्षणासाठी आहेत. शहराची सध्याची लोकसंख्या व भविष्यातील वाढणाया लोकसंख्येचा विचार करता प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यामिक, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षणाच्या दर्जेदार व पुरेशा शैक्षणिक सुविधा विकसित होणे शहराचे सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जरूरीचे आहे. त्यामुळे शिक्षणाच्या सुविधा करणेसाठी सर्वकष असे शैक्षणिक प्रयोजनाचे आरक्षित भूखंड / बांधिव सुविधा वितरीत व विकसनाचे धोरण असणे जरूरीचे झाले आहे. मा. महासभा खालीलप्रमाणे धोरण निश्चित करीत आहे.

१) शैक्षणिक प्रयोजनाचे भुखंड / बांधिव सुविधा वितरण व विकसनासाठीचे प्रस्तावित धोरणाची आवश्यकता

मिरा-भाईंदर महानगरपालिका परिक्षेत्रातील शैक्षणिक प्रयोजनार्थ आरक्षित भूखंड/ बांधीव सुविधा वितरण व विकसनाकरिता सद्यस्थितीत असलेल्या धोरणातील नमुद तरतूदी व्यवहार्य, प्रभावी व परिपूर्ण नसल्याने शहरामध्ये शैक्षणिक सुविधा अपेक्षित प्रमाणात विकसित होऊ शकल्या नाहीत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शैक्षणिक संस्थाना शहरामध्ये शैक्षणिक सुविधा विकसित करणेसाठी आकर्षित करणे जरूरीचे आहे. दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित होणेकरिता पुढील मुलभूत बाबी अंतर्भूत असलेले सर्वकश व प्रभावी धोरण असणे जरुरीचे आहे.

१.१ निकोप व वाजवी स्पर्धात्मक भूखंड/सुविधा वितरणाकरीता, व्यापक प्रसिध्दीव्दारे दर्जेदार व अनुभवी शैक्षणिक संस्थाना संधी देणे.

१.२ शैक्षणिक संस्थाना सुविधा विकसित करणे व शाळा/महाविद्यालय चालविणे आर्थिक दृष्ट्या सुसह्य व्हावे म्हणून अधिनियमातील तरतुदीनुसार भुखंड वितरीत करणे.

१.३ मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले भुखंड शैक्षणिक संस्थाना भाडेपट्टीने न देता सदर संस्थासोबत संयुक्त उपक्रम करून (Joint Venture) शाळांची बांधकामे शैक्षणिक संस्थाच्या खर्चाने करुन घेणे व सदर शाळेत महानगरपालिकेमार्फत एकुण विद्यार्थी संख्येच्या २५% प्रवेश महानगरपालिकेने शिफारस केलेल्या गरीब विद्यार्थ्यांना देऊन त्यांना निशुल्क शिक्षण देणे, (सदर विद्यार्थ्यांना गणवेश, दफ्तर, बुट, पुस्तके, वह्या, इ. वर शैक्षणिक वर्षात लागणारा इतर सर्व खर्च हा पालकांनी करावा) व गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे.

१.४ सदर भुखंड १० वी पर्यंतच्या शिक्षणासाठी शाळा बांधण्यासाठी तसेच उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय बांधणेसाठी वितरीत करणे.

२) शैक्षणिक प्रयोजनाचे भुखंड/बांधीव सुविधा वितरण व विकसनासाठीचे प्रस्तावित धोरण

१.१ वितरणाची कार्यपध्दती

नगररचना विभागाकडुन शैक्षणिक प्रयोजनासाठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान तसेच माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणातील एकुण आरक्षण क्षेत्राच्या ५०% च्या जवळपास ताब्यात आलेल्या भुखंडाची यादी उपलब्ध करुन सदर भुखंडाचा विकास व बांधिव सुविधाबाबत सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव तयार करण्यात येईल. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील शाळा व खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी आरक्षणाच्या एकुण क्षेत्राच्या ५०% पेक्षा जास्तीच्या क्षेत्राचे आरक्षण मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार मंजूरीबाबत कार्यवाही करावी.

१.१.१ नगररचना विभागाकडून शैक्षणिक प्रयोजनाच्या आधारित भुखंडाची व बांधीव सुविधांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१.१.२ प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध असलेले व शिक्षण विभाग यांना आवश्यक नसलेले भुखंड/सुविधा तसेच माध्यमिक शाळा, महाविद्यालय व व्यावसायिक शिक्षणांकरिता राखीव भूखंड/सुविधा यांची यादी जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त किमान तीन वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. यापैकी एक वृत्तपत्र स्थानिक व दोन राज्यस्तरिय असेल. इतर भाषिक शाळांकरिता राखीव भूखंड/सुविधा करिताची जाहिरात संबंधीत भाषेतील एका वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त खासगी नोंदणीकृत शैक्षणिक संस्थाकडून अर्ज मागविले जातील. असे अर्ज आयुक्तांनी मंजूर केलेल्या विहित नमुन्यात असतील. सदर कामासाठी संगणक प्रणाली व ऑनलाईन वर प्रसिध्दी देण्यात येईल.

१.१.३ नमुद केलेले पात्रतेचे निकषांची पूर्तता करणाऱ्या शैक्षणिक संस्था असे अर्ज करण्यास पात्र राहतील.

१.१.४ आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (मु.), शहर अभियंता, सहा.संचालक नगररचना, शिक्षण अधिकारी, प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, विधी अधिकारी, मुख्यलेखापरीक्षक, मुख्यलेखाधिकारी असे सभासद असलेली समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करतील. या समितीचे सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे काम पाहतील.

१.१.५ समितीचे सचिव या नात्याने कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे समितीचे निर्णय नमुद करतील, आयुक्तांची मंजूरी घेतील व महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी सादर करण्याचा योग्य प्रस्ताव तयार करतील. सदर प्रस्तावात विशिष्ट शिफारशी असतील.

२.२ शैक्षणिक संस्थाचे पात्रता निकष

२.२.१ भुखंड उपलब्ध होणेसाठी अर्ज करणारी संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५०) आणि किंवा संस्था नोंदणी अधिनियम (सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६०) खाली नोंदणीकृत असावी.

२.२.२ संस्थेकडे शैक्षणिक उपक्रम चालविण्याचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

२.२.३ आवश्यक फर्निचर, साधने यासह शाळेची इमारत बांधण्याकरीता संस्थेचे आर्थिक स्थिती चांगली असावी. संस्थेने आपली आर्थिक स्थिती दर्शविणेकरीता अगोदरच्या तीन वर्षातील कामगिरीचे परिक्षित आर्थिक ताळेबंद (Audited Financial Results) सादर करावेत.

२.२.४ संस्थेकडे शाळा चालविण्याकरीता होणारा खर्च करण्याची क्षमता असावी.

२.२.५ संस्थेची अगोदरच्या तीन वर्षाची शैक्षणिक कामगिरी समाधानकारक असावी. सदर शैक्षणिक कामगिरी शालांत परिक्षा, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा, विद्यापिठ परिक्षांच्या निकालानुसार पाहिली जाईल व संबधित निकाल हा मागील तीन वर्षाकरीता किमान ८० टक्के इतका असणे आवश्यक राहील. एका संस्थेला जास्तीत जास्त १ भूखंडाचे वितरण केले जाईल.

३) अटी व शर्ती

३.१ महानगरपालिकेच्या शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात येणाया भुखंडाबाबत इच्छुक व पात्र संस्थेसाबत संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने करारनामा करण्यात येईल.

३.२ शैक्षणिक संस्थेला भूखंड स्वखर्चाने विकसित करावा लागेल.

३.३ संस्थेला शैक्षणिक उपक्रम सुरू करण्याकरिता राज्य शासनाची, केंद्र शासनाची मंजूरी मिळवावी लागेल व शिक्षण संचालकांनी अथवा तंत्रशिक्षण संचालक अथवा विद्यापिठाने मंजूर केलेल्या शिक्षण संहितेचे पालन करावे लागेल.

३.४ शैक्षणिक उपक्रमाच्य इमारतीचे बांधकामांकरीताचे नकाशे मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार सुसंगत असावेत व त्याकरिता नियमावलीत नमूद सर्व परवानग्या घेणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे बांधकाम करणे आवश्यक राहील.

३.५ शैक्षणिक उपक्रमाच्या इमारतीचे बांधकाम आराखडे मंजूर झालेल्या व काम सुरू करण्याचे प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून ३ (तीन) वर्षाच्या आत पूर्ण करणे.

३.६ विशिष्ट तीन वर्षाच्या कालावधीत अथवा आयुक्तांनी मंजूर केलेल्या सुधारीत कार्यक्रमानुसार वाढविलेल्या कालावधीत संस्थेने इमारत बांधली नाही तर संस्थेबरोबरचा करार तीन वर्षानंतर आपोआप रद्द होईल व भूखंडाचा/सुविधेचा ताबा संबधितांना कोणताही खर्च न देता महानगरपालिका घेईल.

३.७ प्रत्येक वर्षी शाळेत द्यावयाचे प्रवेश शासनाच्या नियमानुसार असावेत. राज्य व केंद्र शासनाचे सर्व नियमांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३.७.१ जात, वर्ण, लिंग, धर्म तसेच ज्या परिसरातून विद्यार्थी येतात हे विचारात न घेता, सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना प्रवेश खुला राहील.

३.७.२ स्थानिक अथवा इतर सर्व कर संस्थेने नियमित व विहीत मुदतीत अदा करणे बंधनकारक आहे.

३.७.३ संस्थेला देण्यात आलेला भुखंड / बांधीव सुविधा या करीता आयुक्तांनी विहीत केलेले महानगरपालिकेचे सर्व कर / आकार/ शुल्क संस्थेकरिता लागू होतील. ते वेळेत भरणे भरणा करणे बंधनकारक राहील.

३.७.४ बांधलेल्या शाळेतील शिकविण्याचे माध्यम मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दु अथवा दुसया कोणत्याही मान्यताप्राप्त भाषा असतील. शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये मराठी विषय अनिवार्य असेल.

३.७.५ वरील अटी व शर्तीत काहीही अंतर्भूत असले तरीही आयुक्तांना भुखंडावर, इमारतीत पाहणी करणेकरीता प्रवेश व हक्क असेल. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्दीष्टाकरीता भुखंड वापरण्याचा हक्क राहील. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्दीष्टांकरीता जागा, भुखंड वापरला गेल्यास संस्थेने महानगरपालिकेला कोणतेही शुल्क/भाडे/किंमत आकारू नये.

३.७.६ ज्या संस्थेस भुखंड देण्यांत आलेला आहे अशा संस्थेस जामिन विकसित करणे शक्य न झाल्यास सदर जमिन दुसया शैक्षणिक संस्थेस हस्तांतरीत करण्यास परवानगी मिळणार नाही व मुळ भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात परत करावा लागेल.

३.७.७ ज्या संस्थेला अनुज्ञप्तीधारक म्हणुन भुखंड/इमारत दिली आहे अशा संस्थेला भुखंड/इमारत दुसया कोणत्याही संस्थेस कोणत्याही पध्दतीने अंशतः अथवा पुर्णपणे पोटभाडेपट्टीने देता येणार नाही किंवा हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच त्याच्या वतीने कोणत्याही पध्दतीने शैक्षणिक उपक्रमाची व्यवस्था पाहण्याकरीता दुसया संस्थेला नेमता येणार नाही.

३.७.८ मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शैक्षणिक वापरासाठी दिलेले भुखंड त्याच संस्थेला त्याच कारणासाठी वापरता येईल. त्या वापरात बदल केल्यास भाडेकरार आपोआप रद्द होऊन जागा आहे त्या स्थितीत मनपाच्या ताब्यात आली आहे, असे समजण्यात येईल व मनपा तातडीने अशी जागा / मालमत्ता ताब्यात घेईल.

३.७.९ करारनाम्याचा कोणत्याही अटीचा भंग झाल्यास, कोणतीही गैरकृती केल्यास महानगरपालिका आयुक्तांनी आदेश दिल्यानुसार संस्थेला दिलेली जमिन रद्द करण्यात येईल व सदर जागेतून संस्था रिक्त करून भुखंडाचा/इमारतीचा अथवा दोन्हींचा ताबा घेण्याचे स्वातंत्र्य आयुक्तांस राहील. तसेच याबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

३.७.१० शैक्षणिक संस्थाना भुखंड वितरीत करताना बांधकाम पुर्ण होऊन शाळा सुरु होईपर्यंत कामासाठी घ्यावयाची बँक गॅरंटीची रक्कम ही १ चटईक्षेत्रात सदर शाळा इमारत बांधकामासाठी येणाऱ्या खर्चाच्या ५०% रक्कम घ्यावी. सदर रक्कम काम पुर्ण झाल्यावर टप्प्याटप्प्याने परत करण्यात यावी.

३.७.११ मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेत शाळासाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर विकासकास परवानगी देण्यापुर्वी महानगरपालिकेची परवानगी घेण्यात यावी व तद्नंतरच बांधकाम परवानगी देण्यात यावी.

३.७.१२ आरक्षणांवर बांधकाम नकाशा मंजुरीनुसार एक चटई क्षेत्रात उपलब्ध होणा-या एकुण पटसंख्येच्या २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे.तथापि नवीन शाळा असल्याने प्रथमत विद्यार्थ्यी उपलब्ध झाले नाहीत तरी मंजुर नकाशानुसार उपलब्ध होणा-या एकूण पटसंख्येच्या किमान १० टक्के विद्यार्थ्यांना मनपाच्या शिफारशीवरुन प्रवेश देणे बंधनकारक राहील.

३.७.१३ सदर शाळा, महाविद्यालय बांधकाम पुर्ण होऊन झाल्यावर ५ वर्षानंतर एकुण मंजुर नकाशानुसार उपलब्ध होणा-या पटसंख्येच्या २५% प्रवेश महानगरपालिकेने शिफारस केल्यानुसार देणे बंधनकारक राहील.

३.७.१४ एखादया संस्थेने काम सुरू केल्यानंतर मध्येच बंद केल्यास अथवा बांधकाम सुरू केलेले नाही, तर महानगरपालिकेकडून प्रवेशासाठी दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्याचे आर्थिक नुकसान होणार असल्याने सदर संस्थेची बॅक गॅरंटी जप्त करून जागा ताब्यात घेण्यात यावी.

३.७.१५ सदर शाळा, महाविद्यालय बांधकामासाठी संस्थेने बँकेतून कर्ज घेतल्यास सदर कर्जासाठी महानगरपालिकेने दिलेला भुखंड, इमारत, फर्निचर तारण म्हणुन ठेवता येणार नाही.

३.७.१६ सदर शाळा, महाविद्यालय संदर्भात सदर संस्थेने इतरांसोबत करारनामे करावयाचे असल्यास आयुक्त, महानगरपालिका यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

खाजगी संस्था/विकासकामार्फत आरक्षण विकसित करण्याबाबतची कार्य पध्दती

४.१ मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी आहे. सदर शिक्षणासाठी उपलब्ध असलेली आरक्षणे विकसित करण्याचा पहिला अधिकार महानगरपालिकेचा आहे.

४.२ खाजगी संस्था / विकासक यांच्याकडे एकुण आरक्षण क्षेत्राच्या ५० % पेक्षा जास्त जागा ताब्यात असल्यास व त्यांची आरक्षण विकसित करावयाची इच्छा असल्यास महानगरपालिकेची (महासभा) पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

४.३ एखादा जागा मालक / विकासक खाजगी संस्था यांच्याकडे एकुण आरक्षण क्षेत्राच्या ७०% पर्यंत जागा ताब्यात असल्यास व त्यांनी सदर आरक्षण विकसित करण्याची महासभेची परवानगी घेतली असल्यास सदर आरक्षणाची उर्वरित जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असेल तर खालीलप्रमाणे जागा देण्याची कार्यवाही करावी.

४.३.१ आरक्षणाची ७०% पेक्षा जास्त जागा मालकाच्या ताब्यात असेल तर सदर संपुर्ण आरक्षण विकसित करण्यासाठी सदर आरक्षणातील महानगरपालिकेच्या ताब्यातील उर्वरीत जागा सदर जागा मालकास द्यावयाची असल्यास रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराच्या १२५% नुसार रक्कम घेऊन अथवा ज्या क्षेत्राचा भुखंड द्यावयाचे तेवढ्या रक्कमेचा मनपा क्षेत्रात भुखंड व २५% रक्कम रेडी रेकनर नुसार घेऊन देण्याची कार्यवाही करावी.

४.३.२ सदर बदली जागा ही ज्या क्षेत्रात बांधकामास बंदी आहे, सी.आर.झेड क्षेत्र आहे. त्या ठिकाणी घेण्यात येऊ नये, तसेच जागा मालकास ज्या ठिकाणी उर्वरीत शाळेचा भुखंड देण्यात येणार आहे. त्या ठिकाणी असलेले रेडी रेकनरचे दर व नविन बदली जागेचे रेडी रेकनर दर यांची तुलना करुन त्यानुसार रक्कम जमा करुन घ्यावी.

४.३.३ शाळा, महाविद्यालय आरक्षण विकसित करण्याचा प्रथम अधिकार हा महानगरपालिकेचा राहील.

४.३.४ ७०% पेक्षा कमी क्षेत्राचे शाळा भुखंड असल्यास व जागा मालकास सदर आरक्षण विकसित करावयाचा असल्यास सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

५) किमान अर्हतांची पुर्तता केलेल्या व स्पर्धात्मक वितरण निविदेंमध्ये सहभागी झालेल्या एकापेक्षा अधिक शैक्षणिक संस्थाचे प्रस्ताव सारखेच असल्यास तर खालील निकषानुसार संस्थेची निवड करण्यात येईल.

(अ) ज्या संस्थेच्या नोंदणीचा दिनांक अगोदरचा असेल.

(ब) जी संस्था स्थानिक असेल.

(क) ज्या संस्थेचे वार्षिक आर्थिक ताळेबंद नियमित असतील व मालमत्ता चांगली असेल.

(ड) ज्या संस्थेचे अधिक शैक्षणिक उपक्रम असतील.

६) भुखंड वितरित करण्यांसाठी प्रशासकीय मंजुरी

निवड झालेल्या शैक्षणिक संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा देणकरीता मा. महासभेची मंजुरी प्राप्त झाल्यावर संबंधित संस्थेने विभाग प्रमुख (मिळकत व्यवस्थापक विभाग) यांचे समन्वयाने महानगरपालिकेसोबत विहित नमुन्यातील करारनामा करणे बंधनकारक राहील. करारनामा केल्यानंतर सदर संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा महानगरपालिकेमार्फत हस्तांतरीत करणेत येतील.

७) शैक्षणिक संस्थाना संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने भुखंड वितरीत करताना ३० वर्ष मुदतीसाठी करारनामा करण्यात यावा, पुढील कालावधी हा महानगरपालिकेच्या मान्यतेने वाढविण्याची अट राहील. महानगरपालिकेने मुदतवाढ न दिल्यास इमारतीसह जागा ताब्यात घेण्यात यावी.

८) सदर धोरणानुसार विकसित होऊन सुरु झालेल्या शाळा मधील प्रवेशाबाबत व शिक्षणाच्या दर्जाबाबत महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे नियंत्रण राहील.

९) सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याचे सर्व प्रशासकीय अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत असून त्यांनी धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व आवश्यक पुढील कार्यवाही पार पाडावी.

१०) वरील धोरणानुसार संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने शाळा विकसित केल्यास त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाच्या शिफारशीनुसार प्रवेश दिल्याने सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळामध्ये विद्यार्थ्यांवर होणाऱ्या खर्चात बचत होणार असून गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळुन त्यांच्या शिक्षणाचा दर्जा हा उंचावणार आहे. सदर शाळेचे भुखंड संस्थांना भाडयाने दिले असते तर त्याचे चालु बाजारभावानुसार मिळणारे भाडे व सदर संस्थामार्फत महानगरपालिकेने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांवर केला जाणारा खर्च पहाता (महानगरपालिकेच्यामार्फत सदर विद्यार्थ्यांवर खर्च केला जातो तो पहाता) महानगरपालिकेचा आर्थिक फायदा व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार आहे.

वरील धोरणास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :- हसमुख गेहलोत ..... अनुमोदक :- डॉ. रवि व्यास

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

महापौर

मा.महासभा दिनांक:-१८.४.२०१८

प्रकरण क्रमांक:- ११:-मीराभाईन्दर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भूखंड वितरीत व विकसित करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत .

ठराव:

मीराभाईन्दर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भूखंड वितरीत व विकसित करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषव-यामध्ये असंख्य तृटी असून या मध्ये शहराच्या हिताच्या दृष्टीने सखोल विचार करण्यात आलेला नाही.या बाबत गठीत करण्यात आलेल्या समितीने दिलेल्या आहवाला तील शिफारशीनुसार हे भूखंड वितरीत केल्यास मोठया प्रमाणावर अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.यातील ठळक बाबी खालील प्रमाणे.

१)भूखंड शैक्षणिक संस्थांना भाड्याने न देता फक्त २५% मुलांना प्रवेश व त्यांचा खर्च करण्याची अट घालण्यात आलेली आहे २५० मुले प्रत्येक शाळेला प्रत्येक वर्षी मिळतीलच याची शास्वती काय मग पालिकेचे नुकसान होणार.

२)गरीब विद्यार्थ्यांची व्याख्या काय? अशी किती कुटुंबे मनापा क्षेत्रात आहेत व दरवर्षी किती मुले या शाळांमध्ये जाणार आहेत.याचा उल्लेख अहवालात नाही पालिकेजवळ याची माहिती आहे का?.

३)महापालिकेची कोणतीही वस्तू/जागा भाड्याने देतेवेळी प्रचीलीत बाजारभाव मूल्याप्रमाणे भाड्याने देता येते परंतु हे भूखंड भाडेतत्वावर न देण्याची शिफारस अहवालात केलेली आहे त्यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे.

४)शहरामध्ये असे किती भूखंड आहेत जे वितरीत करण्यात येतील याची यादी देण्यात आलेली नाही.

५)मीराभाईन्दर महानगरपालिकेचा विकास आराखडा तयार करण्याचे काम चालू असुन त्याबाबत असंख्य तक्रारी आल्यामुळे सरकार

विकास आराखडा रद्द केल्याची घोषणा नगरविकास राज्यमंत्री डा.रणजीत पाटील यांनी विधानसभा अधिवेनात केली आहे.

६) नवीन विकास आराखड्यात शैक्षणिक प्रयोजनासाठी कोणते भूखंड आरक्षित आहेत याची माहिती गुलदस्त्यात आहे. काही लोकांना ती अगोदरच कळली असल्याची दाट शक्यता या प्रस्तावामुळे येते.

७)मीरा-भाईन्दर महानगरपालिकेचा नवीन विकास आराखडा तयार करण्यासाठी सक्षम अधिका-याची नेमणूक राज्यशासन करणार आहे.

८)मीरा-भाईन्दर महानगरपालिका क्षेत्रामध्ये किती शाळा आहेत?,त्या कुठे आहेत?,कोणत्या माध्यमाच्या आहेत?, कोणता बोर्ड आहे? याचा काहीच उल्लेख गोषवा-यात नाही.

९)मीराभाईन्दर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्या शाळांची गरज आहे?,हि गरज कुठे आहे?,उच्च शिक्षणाच्या कोणत्या माध्यमानची गरज आहे?,याचा काहीच उल्लेख गोषवा-यात नाही.

१०)५०% ताब्यात आलेले आरक्षित भूखंड देण्याची तरतूद विकास आराखडा नियमावलीत आहे का?.

११)पुढील १० वर्षात या शहराची लोकसंख्या २५ ते ३० लाखा पर्यंत जाणार आहे..त्यावेळी या शहराला कशाची गरज आहे.प्राथमिक शाळा,तांत्रिक शाळा,विध्यालये,इंजिनिअरींग कि मेडिकल विध्यालये याचा विचार कोण करणार? याचा कोणताही उल्लेख अहवालात नाही.

१२)सदर अहवाल पूर्वीच्या विकास आराखड्याला लागू असणार कि नव्या विकास आराखड्याला लागू होणार याचा उल्लेख अहवालात नाही.

१३) या पूर्वी २००७ याली या विषयी समिती गठीत करण्यात आली होती त्या समितीने शिफारस केल्याप्रमाणे ४ आरक्षणे भाडे तत्वावर देण्यात आली होती.त्याचे पुढे काय झाले.? ती समिती अस्तित्वात आहे का.याचा उल्लेख अहवालात नाही.

तरी या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून मीराभाईन्दर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भूखंड वितरीत व विकसित करण्यासाठीच्या धोरनाला स्थगिती देण्यात यावी व नवीन विकास आराखडा तयार व मंजूर झाल्यानंतर सदर विषय सविस्तरपणे मा.महासभे समोर आणावा असा मी ठराव मांडत आहे.

